मूल्य ३० रु. / पृष्ठे १०४ । डिसेंबर २०१९ । वर्ष १२ वे / अंक १२

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## अनुक्रमणिका


**4**



सुरुवातीचे–
कार्यकर्त्याला कामच तारेल
– जयंत पाटील

**5**




प्रबंध संपादकीय–
कार्यकर्त्याची भूमिका जागल्याची..
– दिलीप वळसे पाटील

**6**



संपादकीय–
शरद पौर्णिमेचे चांदणे शुभ्र
उद्धवाच्या भाळी सत्तेचा चंद्र
– डॉ. सुधीर भोंगळे

**12**



कायद्याच्या चौकटीत श्रद्धा? न्यायाचे काय?
अवलोकितेश्वर

**42**

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त लेख
१) शरद पवार : सकारात्मक संवादी नेतृत्व
– डॉ. विद्युत भागवत
२) शरद पवार : दिवसभर बांधावर न थकले, ना थांबले
– उज्वल भोयर
३) सह्याद्रीच्या भेटीला 'सह्याद्री'
– विलास शिंदे
४) युवकांचे स्फूर्तीस्थान
– प्रदीप सोळुंके
५) शरदाचे चांदणे
– डॉ. सुधीर भोंगळे



**54**



राजकारणाचे बदलते वारे?
– आकाश (दिल्ली वार्तापत्र)


**62**



प्रा. एन.डी. पाटील यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार प्रदान समारंभ, भाषणे...
१) एन.डीं.चे आयुष्य लोकांच्या सेवेसाठी..
– शरद पवार
२) एन.डी. पाटील यांना देण्यात आलेले मानपत्र
३) इजा करणाऱ्यांसाठीही मार्ग काढण्याची यशवंतरावांची वृत्ती
– एन. डी. पाटील
४) यशवंतराव–नरसिंहराव यांच्या छत्रछायेमुळे आयुष्याचे सार्थक
– राम खांडेकर
५) अभिजीत बॅनर्जींना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार
– डॉ. अनिल काकोडकर



**88**



चव्हाटा (हलके–फुलके राजकीय किस्से)
– घंटाकर्ण (नवी दिल्ली)

**97**



अनागोंदीच्या दिशेने वाटचाल...?
– गहिनीनाथ

**102**



शेवटचे पान–
अभी तो मैं, जवान हूँ...
– हेमन्त टकले



संचालक
हेमन्त टकले

प्रबंध संपादक
दिलीप वळसे पाटील

संपादक
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर–
वार्षिक रु. ५००/–

वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

संपादक–
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# कार्यकर्त्याला कामच तारेल

विधानसभा निवडणुकीमध्ये यावेळी महाराष्ट्रातील जनतेने आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 54 आमदार निवडून दिले आहेत. 2014 च्या निवडणुकीपेक्षा ही संख्या 13 ने जास्त आहे. सर्व प्रसिद्धी माध्यमे आणि विशेषतः इलेक्ट्रॉनिक मिडीया महाराष्ट्रात पुन्हा भाजप-सेनेचीच सत्ता येईल आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला 20 ते 40 च्या दरम्यान जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करीत होते. या अंदाजामुळे कार्यकर्तेही संभ्रमात पडले होते. पण त्यांनी जोर लावून नेटाने काम केले आणि जनतेच्या मनात 'खोटे बोल पण रेटून बोल' अशी भूमिका असणाऱ्या फडणवीस सरकारबद्दल जो प्रचंड राग व संताप होता तो त्यांनी निवडणुकीतून व्यक्त केला. म्हणून आपली आघाडी शंभरीचा टप्पा गाठू शकली. जागा मिळविण्यात आपण तिसऱ्या क्रमांकावर राहिलो. आता जरी आपण सत्तेत आलेलो असलो तरी पक्ष पुन्हा मजबुतीने बांधून एकसंघपणे व शिस्तबद्ध रितीने उभा करण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. या कामात कार्यकर्त्यांची भूमिका खूप महत्त्वाची व कळीची आहे.

दुर्दैवाने आज सर्वच पक्षात अशी स्थिती व चित्र पाहायला मिळते की दिवसेंदिवस कार्यकर्त्यांची संख्या कमी होऊन नेत्यांची संख्या वाढू लागली आहे. अनेक कार्यकर्त्यांना एका रात्रीत नेता होण्याची आस लागली आहे. ही आस कार्यकर्त्यांनी बाळगण्यात चूक काहीच नाही. पण ती आस पूर्ण होण्याकरिता अगोदर काही वर्षे काम करावे लागते, खस्ता खाव्या लागतात. समाजाच्या उपयोगी पडावे लागते. जनतेचे प्रश्न, अडीअडचणी व समस्या समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी आपला स्वतःचा वेळ व प्रसंगी पैसाही देवून राबावे लागते. निस्वार्थ भावनेने सेवा करावी लागते. सेवा आणि मेवा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जो मनापासून व शुद्ध अंतःकरणाने जनतेची सेवा करतो त्याला जनता कधीही खाली ठेवत नाही व विसरतही नाही. किंबहुना अशा निरलस व ध्येयवादी आणि प्रामाणिक कार्यकर्त्याबद्दल जनतेच्या मनात प्रचंड प्रेम व श्रद्धा असते. अशा कार्यकर्त्याला जनता उचलून धरते. योग्य पदाची कामासाठी संधी द्या असा आग्रहही धरते. जनतेतून असा आग्रह कार्यकर्त्यासाठी होणे हीच त्याच्या कामाची खरी पावती असते.


आज असंख्य कार्यकर्ते स्वतःच स्वतःचे बायोडेटा, त्याची मोठमोठी पुस्तके, अहवाल छापून तयार करतात. जो खरा व सच्चा कार्यकर्ता आहे त्याचे कामच बोलते. त्याने असे अहवाल तयार करण्याची व नेत्यांना ते दाखवित प्रचार करण्याची काहीही गरज नाही. जनता चांगले काम करणाऱ्या कार्यकर्त्याबद्दल स्वतः होऊन नेत्यांना माहिती देतच असते. अनेक वर्षे सार्वजनिक जीवनात काम केलेल्या नेत्यांनाही कार्यकर्त्यांमधले गुण-अवगुण व भेदाभेद कळतच असतात. त्यामुळे नेता अज्ञानी व अंधारात आहे आणि त्याला वस्तुस्थिती काही माहितीच नाही असे कार्यकर्त्यांनी गृहित धरु नये.

पक्ष मजबुतीने उभा करायचा असेल तर बूथबांधणी फार महत्त्वाची आहे.

## सुरुवातीचे



त्याबाबत मी प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून सातत्याने आग्रह धरीत आलो आहे. परंतु अजूनही पूर्णपणे आपण बूथबांधणी करु शकलेलो नाही. ती जर केली असती तर या विधानसभा निवडणुकीत आपल्या जागा निश्चित आणखीन वाढून तिसऱ्या क्रमांकावर राहण्याची वेळ आपल्यावर आली नसती. आता यापुढची पाच वर्षे आपल्याला पक्ष बांधणीसाठी उपलब्ध आहेत. कदाचित हा कालावधी खूप मोठा आहे असे वाटण्याचा संभव आहे. परंतु दिवस फार झपाट्याने निघून जातात. विधानसभेच्या निवडणुका संपलेल्या असल्या तरी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, सेवा सहकारी सोसायट्या, साखर कारखाने, दूधसंघ, पतसंस्था यांसारख्या संस्थांच्या निवडणुका सतत चालूच असतात. कार्यकर्ता या निवडणुकांमध्ये कायम गुंतलेला असतो. त्यामुळे पक्ष बांधणीकडे लक्ष द्यायला त्याला बऱ्याचदा वेळ मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे पण ते शंभर टक्के खरे नाही. कार्यकर्त्यांनी मनात आणले, दृढ निश्चय केला व कंबर कसून तो कामाला लागला तर बूथ व पक्ष बांधणी ही फार अवघड व दुरापास्त गोष्ट आहे अशातला भाग नाही. पक्ष बांधणी हा यापुढच्या काळात कार्यकर्त्यांच्या तळमळीचा भाग झाला पाहिजे. जे कार्यकर्ते स्वतःला झोकून देऊन या कामात पुढाकार घेतील व मन लावून काम करतील त्यांनाच पदांच्या संधी यापुढच्या काळात मिळतील यावर तुम्ही विश्वास ठेवा. नेते व पुढारी यांच्या पुढेपुढे करुन, कानी लागण्यापेक्षा काम जास्त करण्यावर भर द्या. आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार 80 व्या वर्षीही जर 16 ते 18 तास काम करीत असतील तर आपण तरुणांनी किती काम केले पाहिजे याचा गांभीर्याने विचार करा. शेवटी कामच तुम्हांला तारेल.




# कार्यकर्त्यांची भूमिका जागल्याची

जनतेने मोठ्या विश्वासाने महाराष्ट्राची सत्ता पुन्हा विभागून का असेना पण आपल्या हाती दिली आहे. महाविकास आघाडीतला आपला पक्ष हा एक महत्त्वाचा घटक आहे. लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सेक्यूलर या तत्त्वांचा पुरस्कार आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापनेपासून करीत आला आहे. त्यामुळे पुढची पाच वर्षे आपल्याला अखंडपणे जनतेची निरलस व निःस्वार्थ भावनेने सेवा करायची आहे. तिच्या अडीअडचणी, प्रश्न व समस्या सोडवायच्या आहेत. लोकशाहीमध्ये राज्यकारभार पारदर्शी असणे अतिशय गरजेचे आहे. त्यामुळे सर्वांना विश्वासात घेऊन काम करावे लागणार आहे. पारदर्शीपणा नसेल तर लोकांना आपले सेवक समाजाचा कारभार कसा करत आहेत हे कळणार नाही. आणि त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने पावले उचलता येणार नाहीत. अभिव्यक्ती स्वातंत्र्यात माहितीचा अधिकार समाविष्ट असला तरी माहिती जमा करता यावी म्हणून खास कायदा या देशात केलेला आहे. आता तर सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीशपदही या माहितीच्या अधिकाराखाली आणण्यास सर्वोच्च न्यायालयानेच मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे काहीही माहिती गोपनीय राहण्याची शक्यता नाही. म्हणून डोळ्यात तेल घालून राज्यकर्त्यांना कारभार करावा लागणार आहे आणि त्यात पक्ष कार्यकर्त्यांची भूमिका खूप महत्त्वाची असणार आहे. बऱ्याचदा कार्यकर्ते कामांचा आग्रह धरतात आणि नेत्यांना इच्छा असो वा नसो त्या कार्यकर्त्यांच्या आग्रह वा प्रेमापोटी ते काम करावे लागते. त्यामुळे त्याचे जे काही बरेवाईट परिणाम होतील ते अखेरीस पक्षाला भोगावे लागतात. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कामाचा आग्रह धरताना अगोदरच ते बेकायदेशीर, समाजहिताला घातक व भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणारे नाही ना हे तपासून पाहिले पाहिजे.

लोकशाहीमध्ये शेवटी जनताच आपल्या कायद्याला जबाबदार असते. त्यामुळे लोकहितावर परिणाम करण्याची कृत्ये खाजगी व्यक्तींनी केली आहेत की सार्वजनिक याला काहीच महत्व नाही. ती कृती महत्त्वाची असते. व्यक्ती महत्त्वाची नसते. कारण त्या व्यक्ती जनतेला जबाबदार असतात. त्यांची कृती खाजगी क्षेत्रात किंवा सार्वजनिक क्षेत्रातली असू शकते आणि त्यात बदलही होऊ शकतो. त्यामुळे अशा कृत्याचे स्वरुप आणि परिणाम जरी तेच असले तरी ते जनतेला उत्तर देण्यास जबाबदार असतात. ते त्यातून मुक्त होऊ शकतात असे मानणे हास्यास्पद आहे. उत्तरदायित्वाची संकल्पना जनसामान्यांच्या हिताशी निगडीत आहे आणि कृती कोणाचीही असो ती करणारेच त्याला जबाबदार असतात.

लोकशाही राजवट ही इतर राजवटींपेक्षा वेगळी आहे. लोकशाहीत राज्यकर्ते जनतेला उत्तर देण्यास जबाबदार असतात. खरे तर लोकशाहीचा जन्मच या गरजेतून झाला आहे. लोक राज्यकर्त्यांच्या हाती सत्ता देतात ती याच विश्वासामुळे की, ते लोकहिताकडे लक्ष देतील आणि स्वार्थासाठी सत्तेचा गैरवापर करणार नाहीत. जनतेचा राज्यकर्त्यांवरील विश्वास उडाला किंवा कमी झाला की मुख्यमंत्र्याला विरोधीपक्षनेता व्हावे लागते याचे ताजे उदाहरण महाराष्ट्राने या विधानसभा निवडणुकीत पाहिले आहे. सत्ता ही नम्रपणे व जनतेच्या सेवेसाठीच वापरायची असते. याचे भान सुटले की जनता योग्य जागा दाखविते हा आजपर्यंतचा इतिहास व वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सत्तेचा वापर कसा होतो आहे याकडे राज्यकर्त्यांना तर लक्ष ठेवावेच लागते. पण त्यांच्यापेक्षाही जास्त लक्ष कार्यकर्त्यांनी ठेवणे अपेक्षित असते. कारण ते रोज जनतेत असतात. जनतेच्या राज्यकर्त्यांबद्दल काय भावना आहेत त्या सर्वप्रथम कार्यकर्त्यांनाच समजू शकतात. राज्यकर्ते चुकत असतील तर कार्यकर्त्यांने ते लक्षात आणून दिले पाहिजे. म्हणजे कार्यकर्ता हा जागल्याच्या भूमिकेत असला पाहिजे. न्यायव्यवस्था जनतेचे हक्क आणि हितरक्षणासाठी जागल्याचे काम करीत असली तरी नेहमीच चुकांची दुरुस्ती करु शकतेच असे नाही किंवा ती आपले कर्तव्य पार पाडण्यात कुचराई करु शकते. सर्व सार्वजनिक संस्था लोकशाही व्यवस्थेत जनतेला जबाबदार असल्यामुळे अशा परिस्थितीत सुधारणा करण्याकरिता व राजवट वाचविण्यासाठी जनताच आपले लोकशाही हक्क वापरु शकते. नागरिक जरी लोकशाही हक्क वापरु शकत असले तरी त्यांनी त्यासाठी सर्वतोपरी काळजी घेतली पाहिजे. त्याचा उपयोग आणि मूल्य त्याच्या योग्य वापरावरच निर्भर करते. उथळ आणि अविचारी उपयोग केला तर त्यांचे महत्व आणि उपयुक्तता बोथट होऊन जाते. याचे भान जनतेप्रमाणेच कार्यकर्त्यांनीही राखले पाहिजे.



**प्रबंध संपादकीय**





# शरद पौर्णिमेचे चांदणे शुभ्र उद्धवाच्या भाळी सत्तेचा चंद्र

कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पक्षाला आणि त्यातही मुख्यत्वे श्री. देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होऊ द्यायचे नाही असा निर्धार करुन व चंग बांधून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने आपली सर्व ताकद शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उद्धव ठाकरे यांच्या पाठिशी उभी केली. त्यामुळे उद्धवराव महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर विराजमान होऊ शकले आहेत. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशाच्या राजकारणातील मुरब्बी व मुत्सुद्दी नेते श्री. शरद पवार यांनी सत्ता स्थापनेचा 'रिमोट कंट्रोल' आपल्या हाती घेऊन यशस्वीपणे ज्या काही राजकीय खेळी केल्या त्यामुळे फडणवीसांचे गर्वहरण झाले आणि 'औट घटकेचा उतावीळ राजा' असा शिक्का त्यांच्या कपाळी बसला. श्री. अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे काही आमदार हाताशी धरुन वा फोडून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्नही भाजपच्या केंद्रीय नेतृत्त्वाने व दस्तुरखुद्द फडणवीस यांनीही करुन पाहिला. सगळी जनता झोपलेली असताना रात्रीच्या अंधारात राष्ट्रपती राजवट उठवून भल्या पहाटे गुपचूप दोघांनी शपथ घेतली. जनतेला हा रात्रीचा खेळ नाही पसंत पडला. जनतेत संतापाची लाट उसळली. दोघांच्याही प्रतिमांना कार्यकर्त्यांनी चांगलाच प्रसाद दिला. पवार साहेब अधिक खंबीरपणाने उभे राहिले व तसूभरही विचलीत न होता त्यांनी स्वपक्षीय आमदारांना तर धीर दिलाच पण उद्धवराव आणि काँग्रेसचा विश्वास वाढीला लागावा म्हणून तातडीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेऊन "राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कधीही भाजप बरोबर जाणार नाही," असे स्पष्टपणे सांगून तिघांची एकजूट अधिक पक्की मजबूत केली." राष्ट्रवादीचे काही नेते आतून अजित पवार यांच्या पाठिशी आहेत, ते अजितदादांचे खबरे म्हणून काम करताहेत. तेव्हा त्यांच्यावर किती विश्वास ठेवायचा याचा विचार करा," असे अनेकजण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पवार साहेबांना सुचवित होते, सांगत होते. परंतु पवार साहेबांनी संयम राखीत व डोक्यावर बर्फ ठेवून सर्वांना एकच वाक्य सांगितले, "तुम्ही चिंता करु नका. माझ्यावर विश्वास ठेवा. आपला एकही आमदार फुटणार नाही." अखेरीस तसेच घडले. भाजपने पळवून नेलेले आमदारही राष्ट्रवादीत परत आले. सत्ता हस्तगत करण्यासाठी हपापलेल्या भाजपचा खेळ आणि डाव काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना आमदारांच्या पोलादी

## संपादकीय



एकजुटीमुळे उधळला गेला.

भाजप नेत्यांची आणि फडणवीस व त्यांच्या लाळघोट्या चमच्यांची खरी मस्ती आणि गुर्मी उतरविली ती सर्वोच्च न्यायालयाने. हे न्यायालय आपल्याच बाजूने निकाल देईल आणि गुप्त मतदानाचा निर्णय झाल्यानंतर कोट्यावधी रुपयांची उधळण करुन, मंत्रीपदाची आमिषे दाखवून विरोधी पक्षाचे आमदार मिळतील त्या भावाने व सांगतील त्या किंमतीला खरेदी करण्याची तयारी भाजपने केली होती. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आमदारांना दोन-तीन दिवस अहोरात्र फोन येत होते. "एकीकडे आम्ही घोडाबाजार करणार नाही, आमदारांना विकत घेणार नाही," असे मोठा साजूक आव आणून सांगणाऱ्या भाजप नेत्यांनी आमदारांची फोडाफोडी व खरेदी करण्यासाठी राधाकृष्ण विखे-पाटील, बबनराव पाचपुते, हर्षवर्धन पाटील, नारायण राणे, गिरीश महाजन यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविली होती. परंतु हे नेते फुसके आपटबार निघाले. एकही आमदार त्यांच्या गळाला लागला नाही. आमदार फोडण्याची भाजपची मोहीम पूर्णपणाने फसली. शिवसेनेचे आमदार फुटणे तर शक्यच नव्हते. कारण उद्धव आणि एकनाथ शिंदे यांनी तसा जबरदस्त दम अगोदरच भरलेला होता. शिवाय खासदार संजय राऊत यांची पेटती वात अखंडपणे फटाके फोडीतच होती. त्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी व सेनेच्या एकजुटीची धग सतत तेवत ठेवली. भाजपच्या प्रत्येक कृतीला आणि आशिष शेलार यांच्या आरोप व टीकेला 'रोखठोक' हाणून धनुष्याचा बाण आरपार घुसविला. शिवसेनेच्या वतीने लढाईचे सारथ्य करण्याची एकमुखी व एकहाती जबाबदारी उद्धवजींनी जी 'संजय'वर टाकली होती ती त्यांनी समर्थपणे पार पाडली. युद्ध क्षेत्रावर शंखनिनाद करुन प्रलयकालच्या मेघवर्षावाप्रमाणे कमलदलांवर शब्दबाणांची जी प्रचंड वृष्टी केली त्यामुळे महाभारतातल्या संजयाची आठवण होऊन उद्धवाचा विजयी रथ मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीपर्यंत पोहचू शकला. महाराष्ट्रातील सत्तेचे हे महाभारत मोठ्या युक्तीने व डावपेचांनी शरद पवार आणि संजय राऊत या जोडगोळीने यशस्वी करुन दाखविले आणि सत्याचा विजय अंतिम असतो यावर शिक्कामोर्तब केले. सर्वोच्च न्यायालयाने उमटविलेली निकालाची मोहोर अखेर निर्णायक निघाली आणि तिने भाजपचे थोबाड फोडले.



आवाजी व गुप्त पद्धतीने मतदान घेता येणार नाही. हात वर करुन मतदान घ्या. पारदर्शीपणे कारभार करा आणि त्याचे व्हीडीओ चित्रण करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे फडणवीसांचे बहुमत सिद्ध करण्याचे अवसानच गळले. त्यात वैय्यक्तिक कारण पुढे करुन अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. आता लढाई करण्याचे त्राणच फडणवीसांमध्ये राहिले नाही. सभागृहात बहुमत सिद्ध होऊ शकणार नाही. तोंडावर आपटण्याचीच पाळी येईल. झाली तेवढी शोभा पुरे! आणखीन हात दाखवून अवलक्षण नको. म्हणून तातडीने मुख्यमंत्रीपदाचा फडणवीसांनीही राजीनामा दिला. आता जनता रोज प्रश्न विचारते, मुख्यमंत्री होण्याची तुम्हाला एवढी का घाई झाली होती? जनतेला तुम्ही मुख्यमंत्री नको होता. तरीदेखील 'मी परत येईन, मी परत येईन, मी परत येईन' असे तुम्ही का म्हणत राहिलात? तुमच्याच पक्षातल्या अनेक नेत्यांचा तुम्हांला विरोध होता. तो तुम्हांला कसा कळला नाही? भाजपच्या नेत्यांनीच भाजपचे काही उमेदवार पाडले हे आता जगजाहीर झाले आहे. बाहेरुन घेतलेले बिब्बे असेच उततात. जुने निष्ठावंतही त्रास दिल्यावर कसे दात बाहेर काढतात हे एकनाथ खडसे, चंद्रशेखर बावनकुळे, तावडे व भाजपने तिकीट नाकारलेल्यांना विचारा. फडणवीस साहेब, तुम्हांला मुख्यमंत्रीपदावरुन खाली उतरविण्याची त्यांची इच्छा पूर्ण झाली आहे. सत्तेचा मद चढल्यावर जनता तो कसा उतरविते याचे दर्शन तुमच्या रुपाने जगाला झाले आहे. तुम्हीच तुमच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे.

शिवसेनेचे उमेदवार जास्त निवडून येता कामा नयेत म्हणून जाणीवपूर्वक भाजपने शिवसेनेला निवडणुकीसाठी जागा कमी दिल्या. एवढेच नव्हे तर शिवसेनेचे जिथे जिथे म्हणून उमेदवार पाडणे शक्य आहे तसा प्रयत्न भाजप नेत्यांनी केला. आतून वरुन वेगवेगळे आदेश दिले गेले. शिवसेनेला हे आदेश कळले नाहीत अशातला भाग नाही. त्यांनाही भाजपचा डाव व अंतर्गत कारस्थाने लक्षात आली. ते वेळीच सावध झाले आणि त्यांनीही मग कमळाबाईला चीतपट करण्यासाठी धनुष्य हाती उचलले. बंडखोरीचे बाण असे काही सुटले की बघताबघता भाजपचे अनेक नेते निवडणुकीत धारातीर्थी पडले. हे कसे घडले हे एकदा

प्रा. राम शिंदे, बाळा भेगडे, हर्षवर्धन पाटील, एकनाथ खडसे, पंकजा मुंडे व इतर पराभूतांना विश्वासात घेऊन विचारा. 'जे पेराल तेच उगवते' आणि 'जशास तसे' हाच न्याय असतो. तो जनतेने केला आहे. पाच वर्षे भाजपने शिवसेनेला अत्यंत वाईट अपमानास्पद वागणूक दिली. लाचारीचे जीणे जगायला लावले. समर्थ रामदासांच्या शब्दात सांगू का –

**'उदंड राजकारण तटले । तेणे चित्त विभागलें ।**

याचा वचपा शिवसेनेने यावेळी घेऊन उद्धवजींनी

**"सत्य असत्यासी मन केले ग्वाही ।**

**मानियले नाही बहुमता ॥"**

ही संतश्रेष्ठ तुकारामांच्या शब्दांतली खरी वारकरी धारणा सिद्ध करुन दाखविली. एवढंच नव्हे तर देवेंद्रला देहाच्या आनंदमय कोशातील मुख्यमंत्रीपदाचा 'आमोद' आणि 'प्रमोद'ही मिळू दिला नाही. (जी हवी ती वस्तू मिळाली, की अधिक आनंद होतो त्याला 'आमोद' म्हणतात. आणि त्या वस्तूचा प्रत्यक्ष उपभोग घेताना जी आनंदानुभूती येते त्याला 'प्रमोद' म्हणतात.) तेवढ्यावर उद्दवजींचे समाधान झाले नाही. त्यांनी

**'भावास भाऊ उपदेश देती । पुढें पुढें होती फजिती ।**

**वोळखीच्या लोकांत महंती । मांडूचि नये ॥"**

(दासबोध : 19-9-6)

याची जाणीव करुन देत

**"धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।**

**खटनटासी खटनट । अगत्य करी ॥"**

(दासबोध : 19-9-30)

हा जगण्याचा वर्तमान कृतीतून नीट समजावून सांगितला.

याला कारण घडले ते देवेंद्रांच्या स्वभाव बदलाचे. स्वभावभिन्नता हे माणसाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येकाच्या स्वभावात एक चैतन्य निश्चित असते. हे चैतन्य समाजाच्या विकासासाठी उपयोगी पडले तर लोकांना त्या चैतन्याबद्दल प्रेम आणि आदरभाव उत्पन्न होतो. परंतु मुख्यमंत्री झाल्यानंतर फडणवीसांमधला अहंकार, गर्व, ताठा, आखडूपणा, शिष्टता आणि 'मी'पणा प्रचंड वाढीला लागला. ही सगळी अहंतेची नामावली आहे. या अंहतेनंच त्यांचे मुख्यमंत्रीपद घालविले. अहंकार स्वभावाच्या मुळात असतो. तो सहसा जात नाही. सत्तेने तो वाढतो. अधिकाराने तो फोफावतो. भाटांच्या स्तुतीमुळे तो वाट्टेल तसा पसरतो. गर्व हा प्रासंगिक असतो. गर्व प्रसंगोपात कसा दाखवायचा हेही व्यक्तीसापेक्ष आहे. अखेरीस या गर्वाचा मात्र दर्प सुटतो. नाकाला रुमाल लावावा लागतो. ताठा हा कशात काहीही नसले तरी दाखवावासा वाटतो. दांभिकपणाबद्दल एक म्हण नेहमी ऐकविली जाते, 'कशात काय; फाटक्यात पाय.' यात सारे काही आले. 'छाती सोळाची रुबाब छत्तीसचा' हा अकारण ताठा होय. शिवसेनेला मुख्यमंत्रीपद आणि निम्मी सत्ता द्यायचीच नाही हा भाजपचा अकारण ताठा होता. त्यामुळेच 30 वर्षांची युती तुटली आणि बंधुप्रेम आटले. ताठ्यात वैय्यक्तिकतेचे स्तोम काही आसपासचे भाट निर्माण करतात. त्यामुळे ताठा फुगता फुगता अती फुगतो नि वेळ आली की फुटतो. हे चित्र जनतेला पाहायला मिळाले आहे. आखडूपणा उथळ असतो. शिष्टपणा तथाकथित अर्धवट असतो. या अर्धवटपणामुळे संयम सुटतो. मी म्हणेल ती पूर्वदिशा ही वृत्ती वाढीला लागते. संवाद थांबतो. संयमाने आपल्या स्वाभाविक शक्ती जास्तीत जास्त कार्यक्षम होतात व आपले योग्य कार्य करतात. संयम म्हणजे श्रेष्ठ आत्म्याने कनिष्ठ आत्म्याचे मार्गदर्शन करून नियंत्रण करणे. संयमात ताठा अकारण शिरला की अहंकारांचे अजगर देहाला आणि मनाला पक्के विळखे घालतात. आपला संयम दुसऱ्यावर अकारण लादला की त्या संयमाचे हसू होते. 'न धरी शस्त्र करि मी, गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' हा भगवान श्रीकृष्णांचा संयम होता. उद्धवजींना सत्तेच्या खुर्चीपर्यंत नेताना हा संयम फक्त शरद पवार यांनी दाखविला. घरातल्या माणसांनी अडचणीत आणले तरी ते तसूभरही ढळले नाहीत. म्हणूनच संयमाची प्रासंगिकता प्रतिज्ञेत परिणत झाली आणि ती न मोडणारी प्रतिज्ञा ठरली. त्यामुळेच बहुमताचा आकडा 169 पर्यंत पोहचू शकला. चार जण तटस्थ राहिले. भाजपच्या 105 आमदारांनी जसा बहुमत सिद्ध करताना बहिष्कार टाकला व सभात्याग केला तसे त्या चौघांनी केले नाही. उलट भाषणे करुन सरकारला शुभेच्छा दिल्या. श्री. दिलीप वळसे पाटील हे तालिकेवर अध्यक्षस्थानी असल्यामुळे त्यांना मतदान करता आले नाही. म्हणजे एकूण 170 आमदारांचे पाठबळ सरकारच्या पाठिशी आहे हे रडीचा डाव खेळणाऱ्या भाजपने लक्षांत घेतले पाहिजे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना या तीनही पक्षाच्या निवडून आलेल्या आमदारांची संख्या अनुक्रमे 44, 54 आणि 56 अशी आहे. म्हणजे एकूण संख्याबळ 154 एवढे आहे. अपक्ष व इतर महाविकास आघाडीतील छोट्या छोट्या पक्षांच्या एकूण 15 आमदारांनी ठाकरे सरकारला समर्थन दिले. ठाकरे सरकारचे 30 नोव्हेंबरला सभागृहात बहुमत सिद्ध होणारच होते. फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे हंगामी सभापती दिलीप वळसे पाटील यांना सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडावी लागली. सभागृहात उपस्थित असणाऱ्या प्रत्येक आमदाराला आपले नाव व क्रमांक उच्चारावा लागला. सभागृहाच्या संपूर्ण कामकाजाचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करुन त्याचे लाईव्ह प्रक्षेपण करावे लागले. संपूर्ण देशाने, जगाने व जनतेने हे उघडपणे मतदान कसे झाले ते आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे.

या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली भाजप आमदारांनी जो सभात्याग केला व फडणवीसांनी जे अत्यंत तथ्यहीन व अर्थहीन मुद्दे उपस्थित केले त्यातून त्यांचे मन किती लहान, संकुचित व स्वार्थाने बरबटलेले आहे याचे समाजाला




**मुंबईतील हयात हॉटेलमध्ये महाविकास आघाडीच्या आमदारांना मार्गदर्शन करताना शरद पवार.**

दर्शन झाले. वास्तविक उद्धव ठाकरे पहिल्यांदा विधानसभेच्या सभागृहात मुख्यमंत्री म्हणून आले होते. त्यांनी बहुमत सिद्ध केले होते. त्यांचे मोकळ्या मनाने व खुला संवाद करीत देवेंद्रांनी अभिनंदन करायला हवे होते. उद्धवजींच्या पाठिंब्यावरच मागची पाच वर्षे देवेंद्रांनी मुख्यमंत्रीपद भोगले होते. इतक्या लवकर भाजपवाले हे सारं विसरले आणि कृतघ्नपणे वागले. त्यामुळे उद्धवजींची महाविकास आघाडीच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर केलेल्या छोटेखानी भाषणात त्यांनी "30 वर्षे ज्यांच्या बरोबर मी सहकार्याने बंधूसारखे नाते ठेवून काम केले त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नाही पण 30 वर्षे ज्यांच्याशी मी विरोधक म्हणून संघर्ष केला, त्या विरोधकांनी माझ्यावर विश्वास ठेवून, माझे नेतृत्व मान्य केले" ही जी वाक्ये उच्चारली ती ठळकपणे अधोरेखीत तर झालीच पण ही वाक्ये भाजप नेत्यांच्या डोळ्यात नुसती अंजन घालणारी नव्हे तर भाजपचा असत्याचा बुरखा टराटरा फाडणारी आहेत. स्वार्थासाठी पक्ष व नेते वापरुन घ्यायचे आणि आपले हित साधले की त्यांना लाथ घालायची ही भाजप नेत्यांची जुनी रीत आहे. याचा अनुभव अनेकांना यापूर्वी आलेला आहे, यापुढेही येणार आहे. शिवसेनेला तो 30 वर्षानंतर का होईना आला हेही थोडके नसे! यातून आता बाकीचे पक्ष योग्य तो बोध घेतील अशी आशा करुया.

खरं तर नीट बारकाईने विचार केला आणि व्यवस्थितपणे डोळे उघडे ठेवून तटस्थपणे पाहिले तर एक गोष्ट ठळकपणे आपल्या सर्वांच्या नजरेत भरते ती म्हणजे उद्धवला मुख्यमंत्री करण्याचे स्वप्न शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचे मित्र असणाऱ्या शरद पवार यांनी पूर्ण केले आहे. पवार साहेब आणि बाळासाहेब या दोघांची मैत्री द्रष्ट लागावी अशीच होती. दोघांनी एकमेकांवर किती प्रचंड घणाघाती टीका केली, शाब्दिक वार केले. काय वाट्टेल त्या उपमा दिल्या. पण संध्याकाळी दोघांनी एकत्र येऊन सौ. मीनावहिनींच्या म्हणजे माँ साहेबांच्या हातच्या माशाच्या भोजनाचा यथेच्छ आस्वाद घेतला. दोघांमधला प्रेमाचा आंतरिक संवाद अखंडपणे चालू होता. त्यामुळे सुप्रिया राज्यसभेत खासदार होणार असेल तर शिवसेना उमेदवार उभा करणार नाही असे जाहीरपणे सांगून बाळासाहेब तसेच वागले. याला मैत्री म्हणतात. स्वार्थाने बरबटलेल्या देवेंद्रला आणि त्यांच्या लबाड सहकाऱ्यांना ही मैत्री कशी कळणार? पक्षासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविलेल्या लालकृष्ण अडवानी, मुरली मनोहर जोशी, यशवंत सिन्हा, जसवंतसिंग, नितीन गडकरी, एकनाथ खडसे, कै. सुषमा स्वराज यांचे भाजपने किती हाल केले व अजूनही चालविले आहेत हे जनता उघड्या डोळ्यांनी बघते आहे. मोदी शहा जोडगोळीच्या पावलांवर पाऊल टाकून देवेंद्र व 'चंपा' ही त्याच मार्गाने निघाले आहेत. पण सत्याची ताकद फार मोठी असते. तिने फडणवीस सरकार उलथवून टाकले आहे. हा ताजा वर्तमान आहे. यातून संबंधितांनी योग्य तो धडा घेतला पाहिजे. उद्धवजींना मुख्यमंत्री करण्यासाठी शरद पवार यांनी जे अथक परिश्रम घेतले आणि बुद्धी व विवेक यांचा मेळ घालत जो डाव रंगविला त्यासाठी 'चाणक्य' हा शब्दही अपुरा पडणारा आहे. पवार साहेबांचा अनुभव, बुद्धि, विवेक, संयम, दूरदृष्टी सारे काही अतर्क्य आहे. म्हणूनच "पवार साहेब समजायला शंभर जन्म घेतले

पाहिजेत," असे खा. संजय राऊत जे म्हणाले त्यातला गर्भितार्थ आपण समजून घेतला पाहिजे. ही पवारांची केलेली निव्वळ आरती किंवा उधळलेली स्तुतीसुमने नाहीत. पवारांच्या वागण्या-बोलण्यातून व कृतीतून तरुण पिढीने खूप शिकण्यासारखे आहे. मला तर पवारांची बुद्धी आणि विवेक नेहमीच अचंबित करीत आला आहे.

नित्यानित्य विवेक महत्त्वाचा आहेच पण बुद्धीपेक्षा विवेकाचे सामर्थ्य अधिक आहे. बुद्धीत आकलनाचे काहीसे सामर्थ्य दिसते. विवेकात पृथःकरणाला महत्व आहे. बुद्धी धारणेशी निगडीत आहे. विवेक चिंतनाशी संबंधित आहे. बुद्धी विजेसारखी आहे. विवेक



समईसारखा आहे. बुद्धी कधीकधी विचाराच्या कड्यावरुन कोसळते. विवेक कोणत्याही परिस्थितीत कोसळत नाही. बुद्धी स्वार्थपरायण असण्याची दाट शक्यता असते. विवेक निःस्वार्थतेच्या अवकाशात खुलतो. बुद्धीला अहंतेची बाधा कळत-नकळत लवकर होते. विवेक अहंतेवर मात करतो. बुद्धीला नम्रतेचे भान असते. विवेकात नम्रता गृहीत असते. बुद्धीतून जगण्याची समीकरणे बाहेर पडू शकतात. विवेकात जगण्याच्या समीकरणांचे निरपेक्ष विश्लेषण असते. बुद्धी स्वतःसाठी पक्षपाती होऊ शकते. विवेक पक्षपाताच्या अतीत असतो. बुद्धीचे निर्णय जीवनाचे मूल्य होतो. बुद्धीचे सामर्थ्य कधीकधी कळत नाही. विवेकातून बुद्धीच्या सामर्थ्याचे साधार विवेचन करता येते. बुद्धी जाणिवेला कधी कधी बाजूला सारते. विवेक जाणिवेला प्राधान्य देतो. सद्सद्विवेक बुद्धी मिळवायला विवेकी व्हावे लागते. बुद्धीतले तारतम्य लक्षात आले की, विवेक निर्माण होतो. वेदांचा आरंभ विवेकापासून होतो आणि गीतेतला बुद्धीयोग शेवटी विवेकात लीन होतो. गीता ही रणांगणावर सांगितली गेली. आजच्या काळात राजकीय पक्षांसाठी विधानमंडळ हे रणांगण आहे. यापुढची पाच वर्षे हे रणांगण सतत धुमसत व पेटते राहणार आहे. अशा वेळी बुद्धी आणि विवेक या दोन्हीचे भान आमदारांना असणे गरजेचे आहे म्हणून त्याचा इथे थोडा सविस्तरपणे उल्लेख केला.

आणखीन एका शब्दाबद्दल मला आवर्जून येथे काही विश्लेषण करायचे आहे. तो शब्द म्हणजे 'सेक्युलर.' त्याचे मराठीत आपण भाषांतर करतो 'धर्मनिरपेक्ष.' या शब्दावर भर देऊन तीनही पक्षांची महाविकास आघाडी बनली आहे असे सांगितले जाते आणि समान कार्यक्रमाचा अजेंडा म्हणून 'सेक्युलर' या तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवले आहे असेही सांगितले जाते. 'सेक्युलर'या शब्दाचा 'धर्मनिरपेक्ष' असा अर्थ लावणे चुकीचे आहे असे ज्येष्ठ विचारवंत विनोबा भावे यांचे मत आहे. त्यांनी 'सेक्युलर' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता 'वेदान्ती' हा शब्द निवडला आहे. विनोबा भावे लिहितात -

"... 'सेक्युलर' शब्दाचे भाषांतर आम्ही आमच्या भाषेत काय करावे हा एक निष्कारण प्रश्न आमच्यापुढे उभा आहे. 'सेक्युलर' शब्दाचा अर्थ आपण 'पंथातीत' किंवा 'अपांथिक' असा केला तरी ही अर्थ बरोबर प्रकट होत नाही. 'पंथ' म्हणजे मार्ग. यालाच इंग्रजीत 'पाथ' म्हणतात. पंथातीत म्हणजे 'मार्ग-विहीन' सरकार असा त्याचा अर्थ होईल. परंतु तो शब्द 'वाट चुकलेला' या शब्दाचा पर्याय आहे. म्हणून तोही शब्द बरोबर नाही.....

आमचे सरकार 'वैदिक नाही पण 'वेदान्ती' आहे. वेदान्तांत कुठल्याही उपासनेचा निषेध नाही. जितक्या उपासना आहेत त्या सर्वांकडे वेद समान भावनेने पाहतो. वेदान्ताने आपली स्वतःची अशी काही उपासना ठेवलेली नाही; म्हणून जर आम्ही सरकारला वेदान्ती म्हटले तर काही चांगला अर्थ प्रकट होईल."

सरकार वेदान्ती आहे असे तुम्ही जाहीरपणे सांगू शकता का? असा प्रश्न 15 नोव्हेंबर 1951रोजी एका माणसाने नवी दिल्लीतील राजघाटावर विनोबा भावे यांना विचारला. तेव्हा ते म्हणाले, "जाहीरपणाने मी हे सांगणार नाही. तुम्हाला समजावून


देण्यासाठी वेदान्ती हा शब्दप्रयोग मी केला. आमचे सरकार नास्तिक नाही. ते आध्यात्मिक मूल्यांना मानते, आत्म्याला मानते, आत्म्याची समानता कबूल करते. तरी वेदान्त जितक्या खोलांत जाऊ शकतो तितक्या खोलांत ते जाऊ शकत नाही. आपल्याला 'सेक्युलर' शब्दाचे एका शब्दात भाषांतर करता येत नाही आणि भाव तर प्रकट करायचा आहे. तेव्हा आपण 'निःपक्ष-न्यायनिष्ठ-व्यावहारिक सरकार' असे म्हणू शकतो. एकाच परंतु जरा कठीण संस्कृत शब्दात म्हणायचे झाले तर 'लोक यात्रिक' सरकार म्हणता येईल. म्हणजे लोकयात्रेच्या बळावर जनतेला चालवू इच्छिणारे सरकार. हा शब्द कठीण आहे. परंतु त्यानेच अडचण काहीशी दूर होऊ शकते."

एवढ्यावरच विनोबा थांबत नाहीत. ते पुढे म्हणतात,

"…. 18 वर्षाची वयोमर्यादा आणि मनुष्याला मताधिकार (पशूला नव्हे), या दोन गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे मग 'सेक्युलर'चा काय अर्थ होतो? आमचे ब्रीदवाक्य 'सत्यमेव जयते' हे आहे आणि सर्व मानवांना समान मानले गेले आहे. या दोन्ही गोष्टी मिळून सेक्युलर स्टेट म्हणजे आत्मज्ञानाच्या आधारावरील स्टेट असा अर्थ होतो….. आज जो गैरसमज निर्माण झाला आहे त्याचे मूळ इंग्रजी भाषा आहे. हा सगळा घोटाळा का उत्पन्न झाला? तर आपल्या सरकारचे सर्व चिंतन इंग्रजीतून होते म्हणून. आणि मग इंग्रजीचे भाषांतर करावे लागते. कोणत्याही भाषेचा अनुवाद दुसऱ्या भाषेत नेमका होत नाही. आपण जर आपल्या भाषेत विचार करीत असतो तर आज जे घोटाळे उत्पन्न झाले आणि त्यामुळे ज्या अडचणी निर्माण झाल्या, ते सर्व टळले असते" [विनोबा; भूदान गंगा, खंड 1 : पा. 57-61].

थोर विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर यांनीही "अधर्मी, निधर्मी, धर्मातीत या शब्दांनी तर 'सेक्युलॅरिझम' या शब्दातील मूळ कल्पना स्पष्ट होतच नाही, पण इहलोकवादी किंवा इहलौकिक या शब्दांनीही नीटसा अर्थबोध न होता थोडासा गोंधळ माजवण्याचा संभव आहे. विशेषतः, 'सेक्युलॅरिझम' या शब्दालाही दीर्घ इतिहास असल्यामुळे व त्याही कल्पनेचा इतिहासक्रमात विकास होत आल्यामुळे तो शब्द तसाच ठेवणे इष्ट वाटते", असे मत व्यक्त करुन पुढे म्हटले आहे, "राज्यसंस्थेने स्वतःचा धर्म म्हणून कोणताही धर्म जरी घोषित केला नाही, तरी समाजजीवनात धर्माचे स्थान राहणारच. त्यामुळे इतर सर्व तपशिलात न जाता सेक्युलॅरिझमची माझ्या समोरची मुख्य कल्पना "धर्म ही फक्त पारलौकिक प्रश्नांचा विचार करणारी संस्था आहे." या एका मुद्यातून निष्पन्न होणारी आहे. जगातल्या एकाही धर्माला धर्माची ही व्याख्या पटणार नाही. किंबहुना, धर्माची सर्वात धर्मद्रोही अशी ही व्याख्या आहे. कोणताही धर्म स्वतःला निव्वळ पारलौकिक मानत नाही. किंवा खऱ्या अर्थाने पाहायचे, तर कोणताही धर्म अंतिमतः इहलोक आणि परलोक ही विभागणी मान्य करीत नाही. …. प्रत्येक धर्माने आपल्या अनुयायांसाठी काही श्रद्धा, काही चालीरिती निर्माण करुन ठेवलेल्या आहेत. त्यांचा आधार सुटला, तर सगळे धर्म एकदम हवेत तरंगू लागतील, - निष्प्रभ होतील….. हिंदू धर्म काय किंवा मुसलमान धर्म काय, तत्वतः कुठलाच धर्म पारलौकिक नसतो. परलोकांच्या नावे चालणारा इहलोकाचा सार्वजनिक व्यवहार ही धर्माची मुख्य कक्षा असते. समाजजीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून धर्म बाजूला सारणे आणि तो केवळ पारलौकिक बाबींसाठी मर्यादित करणे, हा मी सेक्युलॅरिझमचा मुख्य अर्थ मानतो." [जागर, 'सेक्युलॅरिझम आणि इस्लाम', प्रा. नरहर कुरुंदकर, पा.147-181; सहावी आवृत्ती-2008]. (यासंबंधीचा अधिक तपशील ज्यांना हवा आहे त्यांनी 'जागर' पुस्तक वाचावे. जागेअभावी कुरूंदकरांचे सर्व विचार येथे उद्‌घृत करणे शक्य झाले नाही.)

थोडक्यात, उद्धवजींच्या नेतृत्वाखाली सरकारची जी मोट पवार साहेबांनी पुढाकार घेऊन मोठी विचारपूर्वक निर्माण केली आहे तिने समाजाचे जास्तीत जास्त कल्याण आणि त्यातही मुख्यत्वे समाजाची आर्थिक उन्नती कशी होईल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. आजच्या आर्थिक मंदीच्या काळात जास्तीत जास्त रोजगार कसे निर्माण होतील व टिकून राहतील आणि शेतकऱ्यालाही शेतीत कसे राहावेसे वाटेल अशा पद्धतीचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. भाजपच्या हातातून सत्ता गेलेली असल्यामुळे कदाचित केंद्र सरकार महाराष्ट्राला सावत्रपणाची वागणूक देण्याची शक्यता नाकारता येत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी तर पहिल्या दिवसापासूनच नकारात्मक भूमिका घेऊन प्रत्येक गोष्टीत सरकारला विरोध करणे हेच विरोधी पक्षाचे काम आहे असे गृहीत धरलेले दिसते. त्यामुळे हा विरोध मोडून काढण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि महाविकास आघाडीला पाठिंबा दिलेल्या सर्व आमदारांनी एकजुटीने, एकदिलाने व सर्वांना विश्वासात घेऊन काम करीत राहिले पाहिजे. जर काही कुरबुऱ्या निर्माण झाल्या तर त्या चव्हाट्यावर न नेता अंतर्गत चर्चेने व सामंजस्याने मिटविल्या पाहिजेत. सर्वांनी एकमेकांना सांभाळून घेत ही महाआघाडी पुढची 30 वर्षे टिकवायची आहे असा निर्धार केला तर आगामी पाच वर्षे कारभार सहीसलामत व विकासाभिमुख होईल या आशेसह उद्धवजींच्या नेतृत्वाखालील सरकारला आणि हे सरकार प्रत्यक्षात साकारण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या मा. शरद पवार यांना त्यांच्या 79 व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देऊन एवढंच म्हणतो, **जीवेम् शरदः शतम् !**



अयोध्येचा विवाद धार्मिक नव्हता. कारण एका राजकीय पक्षाने म्हणजेच भारतीय जनता पक्षाने या मुद्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर केला. या मुद्याच्या आधारे समाजात धार्मिक ध्रुवीकरण करणे आणि बहुसंख्यक समाजाला धार्मिक व भावनिक आवाहन करुन त्यांची मते मिळविण्याचा उद्योग या पक्षाने यशस्वीपणे केला. हा पक्ष बघताबघता सत्तेच्या जवळ पोहोचला आणि सत्तारूढ झाला देखील. या निकालाच्या पार्श्वभूमीवर भाजपने या धार्मिक मुद्याच्या आधारे राजकारण कसे केले आणि बहुसंख्यक समाजाच्या भावनांशी खेळून सत्ताप्राप्तीचे उद्दिष्ट कसे साध्य केले ही बाब देखील विचारात घ्यावी लागेल. कारण खरोखर एखाद्या लोकशाही देशात धार्मिक व भावनाप्रधान मुद्यांचे राजकीय भांडवल करुन त्या आधारे सत्ताप्राप्तीचे उद्दिष्ट यशस्वी करणे कितपत उचित आहे याचाही या निमित्ताने विचार करावा लागणार आहे






# कायद्याच्या चौकटीत श्रध्दा? न्यायाचे काय?

**अवलोकितेश्वर**

गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयातर्फे काही महत्वाचे निर्णय देण्यात आले. त्यातील दोन निर्णय हे वैशिष्ट्यपूर्ण होते. एका धार्मिक आणि व्यापक सामुहिक श्रध्देच्या विषयांवर न्यायालयास कायदेशीर चौकटीत न्याय करावा लागला होता. या प्रक्रियेत न्याय किती झाला याबाबत मतमतांतरे होऊ शकतील. या न्यायदानातून कुणाला मदत झाली याची देखील चर्चा करावी लागेल आणि ती केली जातही आहे. त्यामुळेच अशा क्लिष्ट मुद्यांमध्ये खरोखर न्याय होतो का हा प्रश्नही चर्चेत आला आहे. अयोध्या विवाद आणि केरळमधील सबरीमला देवस्थानात ऋतुमति महिलांना प्रवेश देण्याच्या विषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांबाबत हीच चर्चा होत आहे. सबरीमला देवस्थानात ऋतुमति महिलांना प्रवेशबंदी ही हिंदू धार्मिक श्रध्देच्या आधारे होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने हिंदू धार्मिक श्रध्दा काहीही असली तरी मंदिर-प्रवेश हा महिलांचा मूलभूत हक्क आहे असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. परंतु अयोध्येच्या विवादात मात्र न्यायालयाने 'रामलल्ला विराजमान' या श्रध्देच्या प्रतीकाचा हक्क मान्य करुन संबंधित विवादित जागा त्यांच्या नावाने करण्याचा निर्णय दिला. सुन्नी वक्फ बोर्ड किंवा








निर्मोही आखाडा यांचा या जागेवरील दावा त्यांनी अमान्य केला. ही रामलल्ला विराजमान झाल्याने तेथे मंदिर उभारणीचा मार्ग खुला झाला. या दोन्ही निर्णयांमधील विरोधाभास लक्षणीय आहे. सबरीमला देवस्थानच्या संदर्भातील वादात न्यायालयाने शुध्द कायद्याचा आधार घेतलेला आढळतो. ही भूमिका विशुध्द कायदेशीर आहे. परंतु अयोध्येच्या विवादात श्रध्देच्या प्रतीकाला ग्राह्य मानण्यात आले आणि त्या श्रध्देला अनुकूल निर्णय देण्यात आला. या विरोधाभासाचे स्पष्टीकरण न्यायालयेच देऊ शकतील.

न्यायालयांमध्ये असे प्रकार घडणे याला योगायोग म्हणायचे की काय हा एक चर्चेचा मुद्दा जरूर आहे. आणखीही दोन निर्णय गेल्याच महिन्यात आले तेही काहीसे प्रश्नचिन्हांकित आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. रफाल विमानांच्या खरेदीतील कथित आर्थिक गैरव्यवहार किंवा या व्यवहारात अवाजवी झुकते माप देण्याचे तत्व वापरण्यात आल्याचा मुख्य आरोप होता. रफाल विमानांच्या नव्याने करण्यात आलेल्या व्यवहारात आधीच्या वाटाघाटींमध्ये निश्चित करण्यात आलेल्या किमतीपेक्षा अधिक किमतीने विमाने खरेदीच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. त्याचबरोबर या व्यवहारातील स्वदेशी भागीदारीतही एका विशिष्ट भारतीय कंपनीस झुकते माप देऊन फायदा करुन देण्याचा प्रयत्न झाला तसेच व्यवहार करताना कोणत्याही सर्वमान्य प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला नाही असे आरोप होते. सरकारने गैरव्यवहाराचा आरोप फेटाळून लावला होता



व न्यायालयांनी देखील या वादात निर्णय देताना या व्यवहारात कुठेही गडबड झालेली नसल्याचे जाहीर करुन व्यवहार स्वच्छ असल्याचे प्रमाणपत्र दिले. कर्नाटकातील काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या फुटीर आमदारांबाबत देखील न्यायालयाचा निर्णय हा काहीसा प्रचलित कायदेशीर तरतुदींशी सुसंगत आहे काय असा प्रश्न निर्माण करणारा ठरला आहे. जर विधानसभा अध्यक्षांनी एखाद्या आमदाराची हकालपट्टी केली तर त्यास लगेच निवडणूक लढविता येत नाही. पक्षांतरबंदी कायद्यातील ही तरतूद आहे. कर्नाटकातील सतरा आमदारांच्या पक्षांतराचे प्रकरण न्यायालयात पोहोचल्यानंतर न्यायालयाने काहीशी वेगळी भूमिका घेतली. विधानसभा अध्यक्षांनी या फुटीरांची केलेली हकालपट्टी त्यांनी मान्य केली परंतु त्यांना पोटनिवडणुका लढविण्याची परवानगी दिली. यामुळे न्यायालय असा निर्णय कसा देऊ शकते असा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु हा विरोधाभास आहे आणि चालूच राहील. या पार्श्वभूमीवर अयोध्येच्या विवादावरील निर्णयाचे मूल्यमापन करावे लागेल.

लोकांच्या श्रध्देवर आधारित विवादाला कायद्याच्या चौकटीत उत्तर शोधणे अवघड असते. तरी देखील भारताच्या



सर्वोच्च न्यायालयाने त्या उत्तराचा शोध घेण्याचा त्यांच्या परीने प्रयत्न केला आणि या स्थितीत जेवढा समतोल व समाधानकारक निर्णय देता येणे शक्य आहे तो दिला. कोणताही निर्णय सर्वमान्य होणारा नसतो. त्यालाही विरोध असतोच आणि त्यामुळे या निर्णयाशी असहमती असणेही अपेक्षित व स्वाभाविकही आहे. त्यामुळेच जवळपास सगळ्यांनी निर्णयाचा आधार करतानाच त्याबाबत काही मुद्यांवर असहमतीही दर्शविली आहे. यासंदर्भात मुस्लिम समाजाने देखील निर्णयाचा आदर करताना त्याबाबत असहमती दाखवली ती समजण्यासारखी आहे. या निर्णयाच्या फेरविचारासाठी 'न्यायालयीन पुनर्विलोकन' याचिका दाखल करण्याचा त्यांना अधिकार आहे. परंतु त्याबाबत त्यांनी अद्याप निर्णय केलेला नाही.

सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय करताना 'मध्यममार्ग' आणि 'व्यावहारिकता' यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. कायदेशीर तांत्रिकतेपेक्षा व्यावहारिक भूमिकेला अधिक झुकते माप दिले. निव्वळ कायद्याच्या आधारे किंवा केवळ श्रध्देच्या आधारावर या प्रकरणाचा निकाल लागणे अशक्य होते. त्याचप्रमाणे हा निर्णय एखाद्या राजकीय किंवा सरकारी पातळीवर होण्यापेक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर झाला ही बाबही अनुकूल ठरली. जनमानसात अद्याप न्यायसंस्थेबद्दलची सदिच्छा टिकून असल्याने त्यांचा निर्णयही बहुतांशाने स्वीकारण्यात आला. या वादाचा यापेक्षा वेगळा निर्णय होऊ शकेल असे म्हणता येणार नाही.

**बाबरी मशीद पाडण्यात आली, त्यावेळी श्री. पी. व्ही. नरसिंहराव हे पंतप्रधान होते. शंकरराव चव्हाण गृहमंत्री आणि माधव गोडबोले गृहसचिव होते.**





याचा अर्थ या निर्णयात हरकत घेण्यासारखे काहीच नाही असा लावायचा म्हटले तर तेही योग्य होणार नाही. या निर्णयातील काही मुद्दे निश्चितपणे प्रश्नार्थक आहेत. त्यावर खुलासा झाला तर ते स्वागतार्हच होईल. या निर्णयाची चिरफाड किंवा अतिचिकित्सा करुन पुन्हा गतकाळात जाण्यापेक्षा या निर्णयाच्या आधारे पुढील वाटचाल कशी करता येईल त्यावर लक्ष केंद्रित करणे अधिक श्रेयस्कर राहील. यातील सर्वात महत्वाचा मुद्दा हाच राहील की अशा घटनांची – बाबरी मशीद उद्ध्वस्त करणे – पुनरावृत्ती टाळणे. कारण बहुसंख्यक श्रध्देच्या दबावाखाली अल्पसंख्यक भावना पायदळी तुडविण्याचे रानटी प्रकार सभ्य – सुसंस्कृत समाजात तसेच विशुध्द कायद्याला अमान्य असतात. म्हणूनच असली रानटी घटना पुन्हा होणार नाहीत याची हमी यानिमित्ताने मिळायला हवी. ही जबाबदारी न्यायालये आणि राज्यकर्त्यांची पण आहे. या निर्णयानंतर देशाच्या पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले. त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आणि भविष्याकडे पाहण्याचे सर्वांना आवाहन केले. पंतप्रधानांनी सर्वांना समाजात शांति, सद्भाव व सलोखा राखण्याचेही आवाहन केले. कटुतेला तिलांजलि देण्याचा दिवस आहे असे सांगून त्यांनी नव्या भारतात कटुता, भय, नकारात्मकतेला स्थान नसल्याचेही मोठ्या अभिमानाने सांगितले. राज्यघटना आणि न्यायसंस्थेचे गुणगान करताना कायद्याच्या सर्वोच्चतेच्या मुद्यावर भर दिला. पंतप्रधानांचे भाषण समतोल होते यात शंका



नाही. परंतु कायद्याच्या सर्वोच्चतेला स्थान देण्याच्या भूमिकेचा उच्चार करताना भविष्यात अशी घटना घडणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन करणे त्यांना का सुचले नाही याबद्दल आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही.

या देशातले अल्पसंख्यकही देशाचे नागरिक आहेत आणि त्यांनाही समान अधिकार आहेत व त्यांच्या भावना व श्रध्देची दखल घेतानाच त्यांची जपणूक करण्याचा मुद्दा पंतप्रधानांनी मांडला असता तर त्यांच्या सन्मानात आणखी भर पडली असती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने या वादावर तोडगा निघाला हे वास्तव सर्वांनीच स्वीकारले आहे. परंतु ज्या भविष्यवेधी भूमिकेचा पुरस्कार





पंतप्रधानांनी त्यांच्या राष्ट्राला केलेल्या संबोधनात केला त्यामध्ये अशा घटनेच्या पुनरावृत्तीबाबत असलेल्या शंकांना पूर्णविराम देण्याबाबत त्यांच्याकडून जी अपेक्षा होती ती पूर्ण होऊ शकली नाही. बाबरी मशीद उद्‌ध्वस्त होण्यापूर्वी नरसिंह राव सरकारने सप्टेंबर 1991 मध्ये एक कायदा संमत केला होता. 'प्लेसेस ऑफ वरशिप्स(स्पेशल प्रोव्हिजन्स) ॲक्ट 1991' असे त्याचे शीर्षक होते. या कायद्याच्या कक्षेत अयोध्येतील बाबरी मशिदीचा समावेश करण्यात आलेला नव्हता कारण ते प्रकरण विवादात होते आणि न्यायप्रविष्टही होते. यातील मुख्य आणि सर्वात महत्वाची तरतूद ही होती की 15 ऑगस्ट 1947 या तारखेला देशभरातील सर्व धर्मांची जी पूजा व प्रार्थनास्थळे ज्या स्वरुपात व अवस्थेत असतील तीच अधिकृत मानली जाईल. या कायद्याने मशिदीचे रुपांतर मंदिरात किंवा मंदिराचे रुपांतर मशिदीत करण्यास प्रतिबंध केला. हा कायदा सर्व धर्माच्या प्रार्थना-पूजास्थळांना लागू करण्यात आला. तो कायदा आजही अस्तित्वात आहे म्हणजेच लागू आहे. त्यामुळे त्या कायद्याचे स्मरण किंवा उल्लेख जरी पंतप्रधानांनी त्यांच्या निवेदनात केला असता तरी अल्पसंख्यक समाजाला मोठा दिलासा मिळाला असता. याला काही कारणे आहेत. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यासारख्या कट्टरपंथी हिंदू संघटनांनी यापूर्वी देखील अयोध्येनंतर काशी व मथुरा येथील मशिदींचा ताबा मागितला होता. विश्व हिंदू परिषदेने तर दोनशे मंदिरांची यादी जारी केली होती की अयोध्येनंतर ते या प्रार्थनास्थळांचा ताबा घेतील व त्यांचे रुपांतर करतील.

अयोध्येत 6 डिसेंबर 1992 रोजी कांड केल्यानंतर कट्टरपंथी मंडळी, 'ये तो सिर्फ झांकि है, काशी - मथुरा बाकी है' अशा घोषणा देत होती. अयोध्येच्या वादाचा निर्णय आपल्या बाजुने झाल्यानंतर कट्टरपंथी मंडळींनी आता काशी-मथुरेवर हक्क मागण्याचा परवानाच मिळाला आहे असा पवित्रा घेतल्यास वर्तमान राजवट कोणती भूमिका घेणार याचे स्पष्टीकरण मागण्याचा हक्क सर्व शांतताप्रेमी व उदारमतवादी घटकांना आहे. कारण न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र देऊन त्याच्या विपरीत आचरण करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या निष्क्रियतेमुळे 'अयोध्याकांड' घडले ही कटु वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच प्रार्थनास्थळांचे स्वरुप कायम राखण्याची हमी देणारा कायदा अस्तित्वात असला तरी त्याची अंमलबजावणीही प्रामाणिकपणे होईल याची हमी यानिमित्ताने समाजासमोर, देशासमोर यायला हवी. तर आणि तरच सरकारची भूमिका विश्वासपात्र राहील. अन्यथा हिंसक झुंडशाही गोरक्षकांना जसे सरकारी यंत्रणांचे पाठबळ मिळून ते सोकावले त्याची पुनरावृत्ती या देशात व्हावयास नको! हे प्रश्न

उपस्थित होण्याचे एकमेव कारण म्हणजे न्यायालयाने त्यांच्या निकालपत्रात बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्याची घटना ही बेकायदेशीर होती असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्यामुळेच वर्तमान राज्यकर्त्यांकडून अशा प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती ते होऊ देणार नाहीत याची हमी मिळणे आवश्यक होते. सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याचा उल्लेख निकालपत्रात केला असून हा कायदा म्हणजे सर्व धर्मीयांच्या हिताचे रक्षण करण्याबद्दल देशाने व्यक्त केलेली बांधिलकी किंवा हमी आहे असे म्हटले आहे.

या मुद्याचा निकालपत्रातील समावेश निश्चितच प्रशंसनीय मानावा लागेल. या मुद्याची पुष्टि करणाऱ्या काही बाबींचाही निकालात उल्लेख आहे. पुरातत्व खात्याचा हवाला देऊन त्यांचा समावेश निकालात करण्यात आला आहे. न्यायालयाने या जागेच्या ठिकाणी केलेल्या उत्खननात मंदिराचे अवशेष मिळाल्याचे मान्य करण्यात आले. परंतु मशिदीच्या खाली एखादे बांधकाम सापडले म्हणून आणि ते मंदिराचे असले तरी त्या जागेवर हक्क सांगता येणार नाही असेही न्यायालयाने महत्वपूर्ण मत नोंदविलेले आहे. त्याचबरोबर अयोध्येत प्रभु रामचंद्रांचा जन्म झाल्याची हिंदूंची श्रध्दा निर्विवाद आहे त्याचप्रमाणे मशिदीत प्रार्थना करण्याचा मुस्लिम समाजाचा अधिकारही निर्विवाद असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या निकालपत्रात काही अस्पष्ट मुद्यांचाही समावेश होतो. विशेषतः बाबरी मशिदीची उभारणी मोकळ्या जमिनीवर झाली नव्हती या निरीक्षणाबाबत काहीशी अस्पष्टता व्यक्त केली जाते. जर असे असेल तर मग तेथे कोणती वास्तू किंवा इमारत अस्तित्वात होती याचा खुलासा यावरुन होत नाही. तसेच केवळ जमिनीखाली मंदिराचे अवशेष सापडल्याने त्या जमिनीवर अधिकार सांगता येणार नाही हे न्यायालयाचे निरीक्षण काहीसे विसंगत वाटते. अर्थात 1045 पानी निकालपत्रात काहीशा विसंगती असणे नैसर्गिक मानावे लागेल.

अयोध्येचा विवाद धार्मिक नव्हता. कारण एका राजकीय पक्षाने म्हणजेच भारतीय जनता पक्षाने या मुद्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर केला. या मुद्याच्या आधारे समाजात धार्मिक ध्रुवीकरण करणे आणि बहुसंख्यक समाजाला धार्मिक व भावनिक आवाहन करुन त्यांची मते मिळविण्याचा उद्योग या पक्षाने यशस्वीपणे केला. हा पक्ष बघताबघता सत्तेच्या जवळ पोहोचला आणि सत्तारूढ झाला देखील. या निकालाच्या पार्श्वभूमीवर भाजपने या धार्मिक मुद्याच्या आधारे राजकारण कसे केले आणि बहुसंख्यक समाजाच्या भावनांशी खेळून सत्ताप्राप्तीचे उद्दिष्ट कसे साध्य केले ही बाब देखील विचारात घ्यावी लागेल. कारण खरोखर एखाद्या लोकशाही देशात धार्मिक व भावनाप्रधान मुद्यांचे राजकीय भांडवल करुन त्या आधारे सत्ताप्राप्तीचे उद्दिष्ट यशस्वी करणे कितपत उचित आहे याचाही या निमित्ताने विचार करावा लागणार आहे

आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे यापुढील काळात म्हणजेच भविष्यात अशा भावनिक व धार्मिक मुद्यांच्या आधारे राजकारण करण्यास मान्यता देणे औचित्याला धरुन असेल काय याचाही निर्णय करण्याची वेळ या निमित्ताने आली आहे. हिमाचल प्रदेशातील पालमपूर येथे (9 ते 11 जून 1989) झालेल्या भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत अयोध्येच्या मुद्यास पाठिंबा देण्याचा ठराव संमत करण्यात आला. अयोध्येत हिंदू धर्मीयांच्या श्रध्देनुसार राममंदिर उभारण्याच्या विश्व हिंदू परिषद व अन्य हिंदुत्ववादी संघटनांच्या मोहिमेला पाठिंबा देण्याचा निर्णय पक्षाने अधिकृतपणे केला. 1989 पर्यंत केंद्रातील सत्तेसाठी अयशस्वीपणे धडपड करणाऱ्या भाजपला मुद्दा मिळाला आणि या मुद्याच्या आधारे आपण सत्तारूढ होऊ शकतो हे जाणून आणि रा.स्व.संघाच्या पाठिंब्याने त्यांनी आपल्या भावी रणनीतीचा आराखडा तयार केला. त्याचे फळ त्यांना लगेचच मिळाले. यानंतर लगेचच झालेल्या निवडणुकीत त्यांना चांगले यश मिळाले. भाजपला कधी नव्हे ते 80च्या वर जागा मिळाल्या. एका बाजूने भाजप व दुसऱ्या बाजूने डाव्या पक्षांच्या आघाडीच्या





मदतीने विश्वनाथ प्रतापसिंग यांचे पंगु सरकार सत्तारूढ झाले. एकदा या मुद्याच्या प्रभावीपणाची व परिणामकारकतेची प्रचीती आल्यानंतर मागे वळून पाहण्याचे कारणच नव्हते. यानंतरच्या घडामोडी सर्वज्ञात आहेत.

कारण लालकृष्ण अडवानींची रथयात्रा, तिला अडविणे, त्यांची अटक आणि मग सरकारचा पाठिंबा काढून घेऊन ते पाडण्याचा कार्यक्रम पार पाडण्यात आला होता. यानंतर अयोध्येच्या या मोहिमेने वेग पकडला. 1991च्या निवडणुकीतही हा मुद्दा केंद्रस्थानी राहिला पण दुर्दैवाने राजीव गांधी यांच्या हत्येमुळे तो काहीसा मागे पडला. काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या व नरसिंह राव पंतप्रधान झाले. राजीव गांधी यांची हत्या झाली नसती तर कदाचित बाबरी मशीद उद्‌ध्वस्त करण्याचे कृत्य 1992 पूर्वीच घडले असते असे अनुमान काढण्यास भरपूर वाव आहे. बाबरी मशीद उद्‌ध्वस्त करण्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या 1996च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. तेरा दिवसांचे सरकार पडल्यानंतर एच.डी.देवेगौडा व त्यानंतर इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखालची सरकारे सत्तेत आली. त्यानंतर पुन्हा निवडणूक होऊन अटलबिहारी वाजपेयी यांचे तेरा महिन्यांचे सरकार 1998 मध्ये सत्तेत आले.




या सर्व निवडणुकांवर अयोध्याकांडाची छाया होती. 1996 मध्ये देवेगौडा सरकारला पाठिंबा देण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाचे लोकसभेत समर्थन करताना नरसिंह राव यांनी केलेले भाषण फार बोलके होते. किंबहुना या निकालाच्या संदर्भात त्याचे महत्व विशेष आहे. भारतासारख्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक व बहुभाषिक देशातील धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवस्थेच्या अनिवार्यतेचा मुद्दा त्यांनी त्यांच्या भाषणात मांडला होता. धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणाला कडाडून विरोध करताना ते म्हणाले, "अशा प्रकारचे ध्रुवीकरण देशासाठी विनाशकारक ठरेल. मी अनेकवेळेस या सभागृहात सांगितले आहे. मी तुमच्याशी लढू शकतो पण जर तुम्ही रामालाच माझ्याविरुध्द हत्यार बनवले तर मी रामाशी लढू शकत नाही. राम केवळ तुमचाच आहे हे मला अमान्य आहे. तुम्ही रामावर मक्तेदारी दाखवत आहात. रामाला वेठीशी धरुन त्याला तुमची मदत करण्यास भाग पाडत आहात. ही बाब अमान्य आहे, स्वीकार्य नाही आणि त्यास मुभा मिळता कामा नये."

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा सारांश किंवा त्याचा मतितार्थ नरसिंह राव यांच्या भाषणात व्यक्त केलेल्या भावनेशी विसंगत नाही. किंबहुना या निकालपत्रात या भाषणाचा संदर्भ देणे अधिक उचित ठरले असते असे मनात आल्याखेरीज रहात नाही. राजकीय सत्ताप्राप्तीसाठी धार्मिक ध्रुवीकरणाचा मार्ग अवलंबिणे आणि त्यासाठी करोडो लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या प्रभु रामचंद्रासारख्या प्रतीकाचा वापर – खरे तर गैरवापर – करणे हे कोणत्याही सुसंस्कृत, सभ्य व समंजस लोकशाही व्यवस्थेला मंजूर नाही. विशेषतः भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवस्थेत धार्मिक प्रतीकांच्या आधारे निवडणूक लढविणे, मतांचा जोगवा मागणे सर्वस्वी नामंजूर आहे. दुर्दैवाने ते घडले. त्यामुळेच या निकालानंतर अशा लोकशाही व धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांशी विसंगत राजकीय मोहिमांना पूर्णविराम मिळेल अशी आशा व अपेक्षा आहे.

अर्थात ही आशा बाळगणेही वेडगळपणाचे आहे कारण गाय, देशभक्ति, राष्ट्रवाद यासारख्या भावनिक मुद्यांच्या आधारे राजकारण अखंडपणे चालूच आहे. ते चालण्याचे एकमेव कारण म्हणजे त्याला असलेला 'अदृष्य पाठिंबा व पाठबळ' होय! म्हणूनच हा निकाल लागला आणि सर्वांनी शांततेने तो मान्य केला असे दिसत असले तरी जोपर्यंत राज्यकर्ते या निकालामध्ये व्यक्त केलेल्या भावनेची दखल घेत नाहीत तोपर्यंत तो यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने 2.77 एकर या वादग्रस्त जागेवर हक्क सांगणाऱ्या निर्मोही आखाडा आणि सुन्नी वक्फ बोर्ड या दोन्ही धार्मिक संस्थांचे दावे अमान्य केले. 'रामलल्ला विराजमान' म्हणजे या जागेत स्थापित रामाच्या मूर्तीला मुख्य पक्षकार मानून न्यायालयाने या जागेवर प्रभु रामचंद्रांचा अधिकार असल्याचा निर्णय दिला. ही बाबही अभूतपूर्वच मानावी लागेल. कारण एका श्रध्देवर आधारित व्यक्तिमत्वाचे अस्तित्व मान्य करुन त्याच्या बाजुने हा निकाल दिला गेला.

याच्याच बरोबर समतोल साधण्यासाठी न्यायालयाने मुस्लिम समाजाला अयोध्या परिसरातच मशीद उभारणीसाठी पाच एकर जागा देण्याचा आदेश सरकारला दिला आहे. त्याच

प्रमाणे राममंदिराच्या उभारणीसाठी सरकारला एका ट्रस्टची स्थापना करण्यास सांगितले आहे. रामजन्मभूमि न्यास या संस्थेतर्फे अनधिकृतपणे गेली अनेक वर्षे या परिसरात मंदिर उभारणीसाठी सुरु असलेल्या तयारीचे काय असा प्रश्न यातून निर्माण झालेला आहे. या न्यासाने सरकारला तत्काळ मदतीचा हात पुढे केला आहे. आता हे सरकार याच न्यासाचे रुपांतर सरकारी ट्रस्टमध्ये करणार असेल तर ते न्याय व निकालाशी सुसंगत ठरणार नाही. ट्रस्ट हा सर्वसमावेशकच असला पाहिजे असेच निकालातून ध्वनित होते व त्या भावनेचे पालन सरकारने केल्यास ते उचित ठरेल. त्याचबरोबर राममंदिराच्या उभारणीसाठी ज्या ज्या संस्था व संघटनांनी गेल्या तीस-पस्तीस वर्षात करोडो रुपये जमविले आहेत त्याचा हिशोब सरकारने मागितला पाहिजे. सरकारने हे केले नाही तर या सरकारवर पक्षपाताचा डाग लागल्याखेरीज राहणार नाही.

या निकालाने मुस्लिमांना मशिदीसाठी पाच एक जमीन



बाबरी मशीद पाडण्याच्या कारस्थानात गुंतलेले भाजपचे नेते मुरली मनोहर जोशी, कल्याणसिंग आणि लालकृष्ण अडवानी.

देण्याचा निर्णय दिला आहे. आतापर्यंतच्या माहितीनुसार मुस्लिम समाज यास फारसा अनुकूल आढळत नाही. कुठेतरी हा समाज दुखावल्याचे हे चित्र आहे. त्यामुळे त्यांच्या भावनांना दिलासा देण्यासाठी आणखी वेगळे काय करता येईल याचा विचार सरकारी पातळीवर झाल्यास ते अधिक श्रेयस्कर ठरेल.

अयोध्येबाबत न्यायालयाचा निर्णय मान्य करण्याची तयारी सर्वांनी जाहीरपणे दाखविली होती. त्यामुळेच निकालाबाबत कुणीच प्रतिकूलता दर्शविण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही व सर्वच बाजूंनी तो समजूतदारपणा व संयमीपणा दाखविला याचे श्रेय सर्वांना द्यावे लागेल.


आता शेवटचा प्रश्न! सर्वोच्च न्यायालयाने 6 डिसेंबर 1992 रोजी बाबरी मशीद उद्‌ध्वस्त करण्याची घटना ही कायद्याला धरुन नव्हती असे निर्णयात नमूद केले आहे. मशीद पाडण्याचे कृत्य अतिशय पध्दतशीरपणे, नियोजनबध्द रीतीने पूर्ण तयारीनिशी योजनापूर्वक करण्यात आले होते याचे अनेक व असंख्य पुरावे समोर आले आहेत. त्यानुसार याला कारणीभूत किंवा या प्रकरणामागील 'मेंदू' म्हणून ज्या राजकीय व धार्मिक नेत्यांविरुध्द खटले भरण्यात आले आहेत त्यांचे काय ? सर्वोच्च न्यायालयाने त्याची दखल घेतलेली नाही कारण अर्थाअर्थी त्यांचा व या जमीनीच्या ताब्याबाबतच्या प्रकरणाचा संबंध नाही. तरीही सर्वोच्च न्यायालयाने संबंधित मशीद पाडण्याचे कृत्य बेकायदेशीर ठरविले आहे. एकप्रकारे त्यासंदर्भात चालू असलेल्या खटल्यांचाही अप्रत्यक्ष निर्णयच दिला गेला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु न्यायिक प्रक्रिया ही पार पाडावीच लागणार असल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणाचा या खटल्यांच्या फलनिष्पत्तीवर निश्चितपणे परिणाम राहील व त्याचे निर्णय प्रभावित झाल्याखेरीज राहणार नाहीत. लालकृष्ण अडवानी, मुरलीमनोहर जोशी, उमा भारती, कल्याणसिंग, विनय कटियार, साध्वी ऋतंभरा यांच्यासारखी मंडळी यात गुंतलेली आहेत. अशोक सिंघल, विष्णु हरि दाल्मिया, गिरिराज किशोर यांच्यासारखे नेते आता हयात राहिलेले नाहीत.

वरील हयात नेत्यांपैकी अडवानी, जोशी हे वयोवृध्द आहेत. त्यामुळे या खटल्यांचे काय हा प्रश्न काहीसा अनुत्तरितच आहे. त्याबाबत स्पष्टतेची गरज असेल! सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या विश्वासार्हतेला अनुकूल असा व्यावहारिक व मध्यममार्गी निर्णय देऊन संघर्ष टाळला आहे. त्यामुळे त्याचे स्वागतच करावे लागेल!


Best Compliments

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख

# शरद पवार सकारात्मक संवादी नेतृत्त्व



डॉ. विद्युत भागवत



शरद पवार हे तसे नेहमीच पॉवरफुल होतेच. समाजवादी चळवळींशी त्यांचा सतत संवाद होता. मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, मधू दंडवते, सदानंद वर्दे सगळ्यांना शरद आपला वाटत होता. त्याचवेळी उजव्या शक्तीशीही त्यांचा संवाद होता. परंतु म्हणून त्यांच्यावर प्रतिगामी असा सरसकट शिक्का नक्कीच मारता येणार नाही. सत्तेवरील जबाबदार व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागेल. लोकांनी त्यांना दिलेली जाणता राजा ही उपाधीही यासंदर्भात समजून घ्यावी लागेल.


गेल्या काही दिवसांपासून विशेषत: महाराष्ट्रातील विधानसभांच्या निवडणुकांच्या संदर्भात शरद पवार हे नाव सर्वाधिक चर्चेत राहिलेले आहे. महाराष्ट्रातील जनतेने क्वचितच अनुभवले असेल असे समाजमन ढवळून काढणारे राजकीय वातावरण अनुभवास येत आहे. परंतु, शरद पवार यांच्यावरील सदर लेख लिहिताना मी काही चौकट स्वत:शी आखून घेतली आहे आणि त्यात समकालीन राजकीय संदर्भांना बाजूला ठेवून मी लिहिणार आहे. शरद पवार हे तसे दीर्घकाळ सत्तेत राहिलेले नेतृत्त्व आहे आणि त्यामुळे ते कसे पुरोगामी आहेत किंवा प्रतिगामीच आहेत अशी दोन टोकांची मते त्यांच्याबद्दल बाळगली जातात. महाराष्ट्रात कुठे काहीही झाले तरी त्याचा शरद पवारांशी संबंध जोडला जातो; अशा बऱ्याच सांगीवांगीच्या गोष्टी आणि द्वैती मतांची वाट नाकारून, मी स्त्री अभ्यासातील एक अभ्यासक या नात्याने, शरद पवार यांच्या बद्दल काही म्हणणार आहे.

शरद पवार यांची महाराष्ट्रातील सत्तेवर पकड असतानाच्या काळातच महिला धोरण आखण्यासाठी ड्राफ्टिंगचे काम सुरू होते आणि तेव्हा मी त्यासंदर्भात झालेल्या काही बैठकांना गेले होते. काही स्त्रीवादी अभ्यासक मैत्रिणीही त्या बैठकीला हजर होत्या. आम्ही सर्वांनीच तेव्हा पाहिलं की, समाजात महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराबद्दल त्यांना कळकळ होती. महिलांचे बचत गट, पंचायत राज मधील महिलांचा सहभाग, एकूणच महिलांच्या कर्तेपणाचा त्यांना आदर होता. आणि त्यामुळेच त्यावेळी महिला धोरणा संदर्भातील बैठकांमध्ये काही वेळेस आम्ही शरद पवार यांच्याशी रागा-रागाने बोललो. मुळात त्यावेळी आम्हा सर्व स्त्रीवादी मंडळींना त्यांच्याशी रागाने बोलण्याचा हक्काचा अवकाश तेव्हाच जाणवला होता हे नाकारता येणार नाही.

त्यावेळी विदेशी दारूवर बंदी का नाही, या विषयावर चर्चा चालू होती. विदेशी दारूच्या सेसवर महिलांनी आत्मनिर्भर व्हावे आणि गावठी दारू बंद करण्यात पुढाकार घ्यावा, असे मत मांडले गेले. तेव्हा मी असं म्हणाले की, आपण जर विदेशी दारूला संरक्षण देणार असू, तर आपल्याकडे निर्माण होणाऱ्या ताडी-माडीला का नाही संरक्षण द्यायचं? त्यांची उत्पादकता का नाही वाढवायची? तो मुद्दा शरद पवार यांनी शांतपणे ऐकून घेतला. आम्ही स्त्रीवादी मंडळींनी मांडलेले सर्वच मुद्दे शरद पवार यांना पटणार होते असं नाही. परंतु, तेव्हा आमच्या असं लक्षात आलं की, समोरच्या व्यक्तीचं म्हणणं ऐकूण घेणं, समजून घेणं हे शरद पवार यांच्या व्यक्तीमत्वाचं कळीचं वैशिष्ट्य आहे.

पुढे 1990 नंतर नवी अर्थव्यवस्था स्वीकारली गेली आणि तो पर्यंत मी तात्पुरत्या स्वरूपाची कामं करायची. एखादा रिसर्च प्रोजेक्ट, एखादं भाषांतर. त्याच दरम्यान माझं पीएच.डी. झालं. परंतु, 90 नंतरची परिस्थिती अशी होती की, कायम स्वरूपाची प्राध्यापकी सारखी नोकरी मिळणं कठीण झालेलं होतं. तेव्हाची घरची परिस्थितीही अशी होती की, मला स्थिर अर्थार्जनाची गरज होती. आणि त्याच काळात पुणे विद्यापीठातील






समाजशास्त्र विभागा अंतर्गत सुरू झालेल्या स्त्री-अभ्यास केंद्राची संचालक म्हणून माझी निवड झाली. त्यावेळी यूजीसी (विद्यापीठ ग्रॅन्टकमिशन) आणि आय.सी.एस.एस.आर. या सगळ्यांनाच असं वाटत होतं की, स्त्री-अभ्यास केंद्र म्हणजे समाजशास्त्र विभागाला पूरक असं केंद्र आहे. परंतु, स्त्री-अभ्यासातील आम्हा अभ्यासकांना असं वाटत होतं की, स्त्री-अभ्यास क्षेत्र हे आंतरविद्याशाखीय अशी नवी ज्ञानशाखा बनू शकते. ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी, सामाजिक दृष्ट्या मागास परिस्थितीतून येणारे विद्यार्थी यांना समग्र दृष्टी देणारे नवे व्यासपीठ मिळेल आणि त्यातून विद्यार्थी स्वत:च्या अनुभवांना सैद्धांतिक चौकटीत समजून घेत सोबतीचा समाज खोलातून समजून घेतील. परिणामी निर्भय होऊन ते व्यक्त होतील.


स्त्री-अभ्यास केंद्रात अशा नव्या उमेदीने आम्ही काम करत होतो आणि त्याचवेळी काही प्राध्यापक मित्र असे म्हणत होते की, तुम्ही तुमच्या स्त्री-अभ्यास केंद्रासाठी निदान दोन तरी कायम स्वरूपाच्या पोस्ट मिळवा, म्हणजे तुमचं केंद्र स्थिर होईल. त्यानंतर 1994 साली 8 मार्चला महिला दिनाच्या निमित्ताने होणार असलेल्या एका कार्यक्रमासाठी शरद पवार हे पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात येणार होते. त्यावेळी मी धावत-पळतच शरद पवार यांना गाठलं आणि त्यांना थेट म्हटले, आमच्या स्त्री-अभ्यास केंद्राला राज्य शासनाने काहीतरी स्थिरता दिली पाहिजे. स्त्री सक्षमीकरणाला महत्त्व देणाऱ्या राज्य शासनाने स्त्री-अभ्यास केंद्रांना अस्थिर ठेवणं हे चूक आहे. तेव्हा शरद पवार यांनी लगेचच दिलीप वळसे पाटलांना हाक मारली आणि सांगितलं की, यांना मंत्रालयात लगेच चर्चेसाठी अपॉइंटमेंट द्या आणि पहा त्यांचं काय म्हणणं आहे. त्यानंतर पुढची सगळी लढाई आमची आम्हीच




डॉ. नरेंद्र दाभोळकर


कॉ. गोविंद पानसरे


गौरी लंकेश


कलबुर्गी

लढली. परंतु, तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, शरद पवार यांना असं वाटत होतं की, स्त्री-अभ्यास केंद्र हे काही केवळ महिलांसाठीच्या कल्याणकारी कार्यक्रमांचा भाग नाही. त्याहीपेक्षा त्याचं महत्त्व खूपच जास्त आहे. कोंबड्यांना जेंटामायसीन देणे किंवा टोपल्या विणणाऱ्या बायकांना काही प्रमाणात रोजगार देणे अशी कामे कल्याणकारी योजनांमध्ये होतच होती. परंतु स्त्रियांना ज्ञाननिर्मिती करता यावी, इतिहासात वेळोवेळी स्त्रिया सत्ताहीन का झाल्या, आणि सत्तेत त्यांना जाणतेपणे सहभागी होता यावे यासाठी स्त्री-अभ्यास केंद्रांची गरज शरद पवार यांनाही नक्कीच जाणवत होती.

खरंतर तेव्हाही आणि आताही राजकारणातल्या फारच कमी लोकांना हे कळत असेल जे शरद पवार यांना 90 च्या दशकातच उमगलेलं होतं. स्त्री अभ्यास केंद्रांबद्दल अजूनही आपल्याला उपेक्षा दिसते, काही प्रमाणात घृणाही


यशवंतराव चव्हाण व वेणूताई

दिसते. स्त्री अभ्यास केंद्र म्हणजे काय? आम्ही नाही ऐकलं हे असं काही असतं विद्यापीठांमध्येही वगैरे आजही अनेक राजकारणी मंडळी बोलत असतात. किंवा स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालवलेलं काहीतरी करमणुकीचं साधन असाही स्त्री-अभ्यास केंद्रांबद्दलचा हीन दृष्टिकोन आजही बाळगला जात आहे. परंतु, तिथे ज्ञान आहे, सत्ता आहे आणि अगदी संरचना बदलण्याची ताकदही आहे ही जाण आपल्याला शरद पवारांमध्ये दिसते. अशी समग्र जाण आपल्याला इतर कुठल्याही नेतृत्वात फारच अभावाने पाहायला मिळते. संसदीय राजकारणाच्या दृष्टीने स्त्रियांचं बळ त्यांना महत्त्वाचं वाटत असलं तरी, पंचायत राजमध्ये स्त्रियांच्या हातात सत्ता यावी यासाठी प्रयत्न करण्यातही ते पुढे होते. त्यामुळे स्त्री-प्रश्नाच्या संदर्भात शरद पवारांशी चर्चा होऊ शकते, त्यांच्याशी मोकळेपणाने बोलता येऊ शकते. परंतु. हल्लीच्या नेतृत्त्वांमध्ये



शरद जोशी आणि शरद पवार

हे दिसत नाही.

हल्लीची परिस्थिती म्हणजे गोली मार भेजेमे. गौरी लंकेश सारख्या व्यापक भूमिका असलेल्या आणि परखडपणे लिहिणाऱ्या स्त्रीचा खून झाला. आणि त्यावर कडी म्हणजे त्यावर सत्तेत असलेलं कुणीही काडीइतकीही सहानुभूती दाखवत नाही. भाजप सत्तेवर येताना दाभोळकर, त्यानंतर कलबुर्गी, कॉ पानसरे आणि गौरी लंकेश अशांच्या खुनांचं सत्र चालवलं गेले. दहशतीचे वातावरण निर्माण केले गेले आणि त्यावर कुणी काही बोलले तर ती व्यक्ती देशद्रोही म्हणत मोडीत काढण्याचे प्रकार सुरू झाले. एका बाजूला हुकूमशाही सदृश्य अशी परिस्थिती अनुभवास येत असताना, शरद पवार यांच्या सारखे धडाडीचे नेतृत्त्व आणि त्यांचे आश्वासक अस्तित्व आपल्याला अमान्य करताच येणार नाही.

यशवंतराव चव्हाण आणि वेणूताई यांचं एकत्र असणं हेही त्याकाळात खूप आश्वासक वाटत होतं. यशवंतरावांकडे पाहून सह्याद्री आणि नेहरू नावाचा उत्तरेकडचा हिमालय अशी उपमा त्या दोघांना दिली जायची. अशा नेतृत्वाच्या सावलीत शरद पवार यांची जडण-घडण झाली हे सर्वच जण जाणतात. त्यामुळे यशवंतराव यांच्यासारख्या नेतृत्त्वाच्या सावलीत अंतीम सत्य, मानवी मूल्य अशा वैश्विक बाबींचा स्पर्श त्यांना झालेला आहे. शरद पवार यांच्या बद्दल ज्या सांगी-वांगीच्या अतिरंजीत गोष्टी आहेत, त्यासंदर्भात आपण हे लक्षात घेणे खूप गरजेचे आहे. शरद पवार यांचे जात म्हणूनचे लोकेशन लक्षात घेतले तर लालू प्रसाद यादव, मुलायमसिंग यादव यांच्या वाट्याला जशी अतिरेकी बदनामी आली तशी काहीशी किंबहुना जरा जास्तच ती शरद पवार यांच्याही वाट्याला आली. एकतर आपल्या देशातील जातीवास्तवातील ब्राह्मण्यग्रस्त मानसिकता गुणांची खरी पारख होऊच देत नाही आणि परिणामी व्यक्ती, घटना, कलाकृतींच्या मूल्यमापनाची तटस्थता हीच मुळी जरा जास्तच पूर्वग्रहदूषित असते. शरद पवार यांच्यासारख्या नेतृत्वाला तर त्याचा फटका जरा जास्तच बसला आहे. परंतु, विशेष हे की, असे असूनही आज अगदी 79व्या वर्षीही ते खंबीरपणे उभे आहेत. आज महाराष्ट्रात देशाला आश्चर्यचकित करणारं नवं समिकरण त्यांनी घडवलेलं आहे. माझ्या मते पुरोगामी राजकारणाची अगदीच निराशा होण्याच्या या काळात ते खंबीरपणे उभे आहेत हे खूप आश्वासक आहे.



मधु दंडवते आणि शरद पवार

इथं आणखी एका



दूध उत्पादकांचे आंदोलन

मुद्द्याची चर्चा करणे आवश्यक ठरेल आणि तो म्हणजे, महाराष्ट्रात उदयाला येणाऱ्या चळवळींशी शरद पवार यांचं नातं. आंतरराष्ट्रीय महाराष्ट्र कॉन्फरन्सला शरद पवार यांनी प्रयत्नपूर्वक आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले. जपान, रशिया आदी विविध देशांमध्ये आणि देशात, महाराष्ट्रातही मराठीतून होणाऱ्या लेखनाबद्दल उत्तेजन देणारं व्यासपीठ त्यामुळे तयार झालं. त्यातून मग इरिना ग्लुश्कोवा, ॲनफेल्ड हाऊस, रोझलिंड ओहॅन्लन असे कितीतरी अभ्यासक पुढे आले. भारताच्या संदर्भातले महाराष्ट्राचे योगदान त्यातून सिद्ध होत गेले.

तसेच दलित चळवळ, शेतकरी चळवळ, स्त्रियांची चळवळ किंवा आदिवासींची चळवळ अशा सर्वच चळवळींच्या नेतृत्त्वांशी त्यांचा संवाद होता. ते अत्यंत खुलेपणाने त्यांच्या प्रश्नांवर बोलत राहिले. शरद जोशींच्या नेतृत्वात शेतकरी संघटना ऐनभरात असताना शरद पवार यांना शह देण्यासाठी शेतकरी



जळगावच्या जैनहिल्सवर ठिबक संचाने पिकविलेल्या भातपिकाची शरद पवार पाहणी करीत असून अजित जैन हे त्यांना नवीन तंत्राची माहिती देताना शेजारी भवरलाल जैन.

संघटनेत काही घोषणा दिल्या जात होत्या. त्यातील एकतर अशी होती की, शरद जोशी चंद्राची कोर, शरद पवार हरामखोर. आपल्या सार्वजनिक जीवनात चळवळींकडून असा रोष पत्करत शरद पवार अविचलपणे कार्य करत राहिले. पुढे शरद जोशी यांच्या शेवटच्या कालखंडात शरद पवार यांनी त्यांना खूप मान–सन्मान दिला. शरद जोशी यांचं दूध आंदोलन असो की, कांदा आंदोलन शरद पवार यांनी त्यांना पाठिंबा दिला होता. म्हणजे इतर नेतृत्त्वे वाढत असताना त्यांच्याशी स्पर्धा करण्याऐवजी त्यांना पाठिंबा देण्याचं सकारात्मक धोरण शरद पवार यांनी अनुसरल्याचं आपल्याला दिसतं. इतर नेतृत्त्वांची भीती, मग त्यातून स्पर्धा आणि नकारात्मक प्रतिक्रियांमध्ये शरद पवार अडकल्याचं दिसत नाही. बारामती सारख्या ठिकाणी राहत, आपले कुटुंबिय, नातेवाईक

चळवळींशी त्यांचा सतत संवाद होता. मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, मधू दंडवते, सदानंद वर्दे सगळ्यांना शरद आपला वाटत होता. त्याचवेळी उजव्या शक्तीशीही त्यांचा संवाद होता. परंतु म्हणून त्यांच्यावर प्रतिगामी असा सरसकट शिक्का नक्कीच मारता येणार नाही. सत्तेवरील जबाबदार व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागेल. लोकांनी त्यांना दिलेली जाणता राजा ही उपाधीही यासंदर्भात समजून घ्यावी लागेल. महाराष्ट्रातील समकालीन सत्ता नाट्यातील त्यांची कळीची भूमिका, ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांच्या बांधावर जाणं आणि भर पावसात भिजत तरूण वर्गालाही आकर्षित करणे– हे सगळेच त्यांच्या कर्तृत्वाच्या मूल्यमापनात दुर्लक्षून चालणार नाही.

एक मराठा, लाख मराठा म्हणत लाखो लोक आरक्षणासाठी




**सातारच्या भर पावसातील सभेत शरद पवार भिजतच भाषण करताना.**

यांना सांभाळत अनेक दशकं त्यांनी कुशलपणे धुरा वाहिली त्यात एकाअर्थाची सकारात्मकता होती. शेतकरी संघटनेत काम करत असताना मी असं पाहिलं आहे की, त्यांच्याबद्दल वाटेल त्या घोषणा दिल्या गेल्या, वाटेल तसं बोललं गेलं; पण आपल्या कामापासून न ढळता शांतपणे शरद पवार हे चळवळींना पाठिंबा देत राहिले. जे योग्य आहे, व्यवहार्य आहे त्याचा पाठपुरावा करणे असे त्यांचे धोरण असल्याचे दिसते. त्यामुळेच असेही दिसते की, शरद जोशी, शरद पाटील अशा मंडळीं बाबत ते सकारात्मक राहिले आणि शक्य तिथे पाठिंबाही देत राहिले.

शरद पवार हे तसे नेहमीच पॉवरफुल होते. समाजवादी रस्त्यावर आले. त्या लाखोंच्या गर्दीला नेतृत्त्वाचा चेहरा नव्हता. गटातटांचे राजकारण आणि कुणी–कुणाचे ऐकत नव्हते. हा काळच नेतृत्त्वांच्या स्पर्धेचा आहे, आणि अशातही अगदी नवी नेतृत्त्वे काय म्हणतात हे शांतपणे ऐकण्याचं कसब आपल्याला अपवाद म्हणून शरद पवार यांच्यात दिसतं. नेहरू, यशवंतराव यांच्या नेतृत्त्वाचा काळ लोटल्यानंतर, आजचे शरद पवार आणि त्यांच्या शारीरिक प्रकृतीचे स्वरूप आणि अशातही या नेतृत्त्वाने धडाडी दाखवत उभे राहणे हे खूप महत्त्वाचे आहे. यासर्व पार्श्वभूमीवर शरद पवार यांना त्यांच्या 79 व्या वाढदिवशी मी मनापासून शुभेच्छा देते.

# शरद पवार

उज्वल भोयर



शरद पवार... नाव घेतले की मुरब्बी राजकारणी, शेतकऱ्यांप्रति कळवळा असलेला नेता व राजकारणातील जाणताराजा अशीच प्रतिमा डोळ्यासमोर येते. मात्र ७९ वय असलेल्या पवारांमध्ये एक तडफदार व ऊर्जावान तरुण दडलेला आहे.अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी पूर्व विदर्भात झालेल्या पवारांची ही बाजू अनुभवण्याची राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागपूर जिल्ह्यातील नागरिकांना संधी मिळाली. जेवण वगळता इतर कुठेही विश्रांतीसाठी न थांबता न थकता पवार यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागाचा पाहणी दौरा केला व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांची ही ऊर्जा पाहून वयाने तरुण असलेले कार्यकर्ते देखील भारावून गेले. पवार यांचा दोन दिवसीय पूर्व विदर्भीय दौरा हा खरच अविस्मरणीय ठरला. सकाळी सात वाजल्यापासून निघालेला पवारांचा दौरा रात्री आठ वाजेपर्यंत शेतकऱ्यांच्या बांधावर होता, हे विशेष.

नागपूर विमानतळावर आगमन होताच त्यांनी थेट काटोल विधानसभा क्षेत्रातील चारगाव गाव गाठले.यावेळी नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अनिल देशमुख हे स्वतः त्यांची गाडी चालवत होते. येथील शेतकरी रवी पुनवटकर यांच्या शेतात ते थेट पोहोचले. यावेळी नुकसानीचा आढावा घेताना पवार साहेब यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. इतका मोठा माणूस आपल्या शेतात आल्याने शेतकरी सुरुवातीला भांबावले होते. परंतु पवार साहेबांनी थेट त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न हात घातला. कोणते वाहन आहे उत्पादनखर्च साधारणतः किती आला आहे? नुकसान कसे झाले आहे? आता पुढे काय करणार? असे विविध प्रश्न त्यांनी शेतकऱ्यांना विचारले. कर्जमाफी संदर्भात, बिलासंदर्भात सरकारकडून काही मदत मिळते का? याची सुद्धा आस्थेने पवार साहेबांनी शेतकऱ्यांची विचारणा केली. यावेळी पवार साहेबांचा स्वभाव बघून शेतकरीसुद्धा भाऊक झाले आणि त्यांनी पोटतिडकीने आपले प्रश्न पवार साहेबांच्या समोर मांडले. सर सध्याची परिस्थिती पाहता आमचा उत्पादन खर्च सुद्धा निघणे कठीण आहे. बँकांचे कर्ज डोक्यावर आहे. अन्यथा बँक वसुलीसाठी तगादा लावत आहे. आमची संपूर्ण दिवाळी अंधारात गेली आहे. पुढे कसे करावे असा प्रश्न आमच्यासमोर आहे. आमचे कैवारी तुम्हीच, तुम्हीच आम्हाला आता मदत करा अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.यानंतर पवार साहेब थेट निघाले ते समोरच्या हात लागावी येथील भैयाजी फिसके यांच्या कपाशीच्या शेतात. सुरुवातीला त्यांना कपाशीचे हिरवी दिसली यामुळे त्यांनी आपसूकच शेतकऱ्यांना विचारले की कपाशी तरीही नुकसान कसे.यावेळी शेतकऱ्यांनी त्यांना एका झाडाजवळ नेले. साहेब कपाशी तर ही दिसत आहे, परंतु याला लागलेली







# दिवसभर बांधावर न थकले ना थांबले







बोंडे तर मोजून पहा. इतके मोठे झाड पण त्याला केवळ तीन ते चार बोंड पाहून पवार साहेब सुद्धा थक्क झाले. यावेळी त्यांनी कृषी अधिकाऱ्यांना विचारणा केली की याचे आपण कशा पद्धतीने पंचनामे करणार आहात? झाड तर हिरवे आहे परंतु त्याला पीकच नाही अशा परिस्थितीत आपण नुकसान दाखविणे गरजेचे असल्याचे सुद्धा यावेळी पवार साहेबांनी कृषी अधिकाऱ्यांना व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले. पवार साहेब अधिकाऱ्यांसोबत चर्चा करीत असताना शेतकरी ओरडले की साहेब हे केवळ एसी रूम मध्ये बसून सर्वे करतात प्रत्यक्षात शेतात जाऊन सर्वेच करत नसल्याची बाब पवार साहेब यांच्या लक्षात आणून दिली. यानंतर लगेच पवार साहेबांनी अधिकाऱ्यांना सहानुभूतीपूर्वक शेतकऱ्यांचा विचार करावा ते आर्थिक संकटात आहेत. अशा परिस्थितीत आपण जर त्यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले नाही तर या मायबाप शेतकऱ्याला कोण वाचवेल असा प्रश्न उपस्थित केला. यावेळी शेतकऱ्यांना दिलासा देताना पवार साहेब म्हणाले की, तुम्ही घाबरू नका, वेळप्रसंगी मी केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन आपल्याला जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेल. यानंतर त्यांनी काटोल तालुक्यातील दिनकर वानखेडे यांची संत्रा बाग खामगाव येथील रवी टेंबे यांचे कपाशीचे व नायगाव धोटे येथील प्रदीप ठाकरे यांचे संत्र्याच्या शेताची पाहणी करीत नरखेड तालुक्यातील खापा व घोगरा परिसरातील वाळलेल्या संत्रा झाडाची सुद्धा पाहणी केली.

यानंतर पवार साहेबांचा ताफा निघाला तो कामठी विधानसभा क्षेत्रातील धान पिकाची पाहणी करण्यासाठी.दिवाळीच्या दिवशी झालेल्या मुसळधार वादळी पावसाने कामठी तालुक्यातील धान पिकाचे नुकसान झाले होते नुकसान झालेल्या पिकाची पाहणी करता शरद पवार साहेबांनी तालुक्यातील असोली महालगाव या भागातील शेताची पाहणी केली. महागाव येथील रामदास डांगे यांच्या शेतात ते पोचले. बांधावर जाऊन धान पिकाची पाहणी केली असताना रामदास यांच्या डोळ्यातून अश्रू ढासळत होते.पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती त्यांनी दिली व धान पीक शेतकऱ्यांना प्रति एकरी 30 हजार



# मी तर चौतीस वर्षांचाच!

**शरद पवार साहेबांचा दिवसभराचा दौरा पाहून सायंकाळच्या वेळेस पत्रकारांनी त्यांच्या समोर काही प्रश्न उपस्थित केले. या संपूर्ण दिवसभराच्या दौऱ्यात आम्ही थकलो पण साहेब आपण थकले नाहीत का? असा प्रश्न त्यांनी पवार साहेबांना विचारला. यावेळी त्यांचे उत्तर ऐकून पत्रकार चकित झाले. तुमचं वय किती? असा प्रश्न पवार साहेबांनी एका पत्रकाराला विचारला. त्यावेळी त्यांने माझे वय 35 असे सांगितले. तुमचे वय 35 काय? मग माझे वय 34! असे उत्तर पवार साहेबांनी त्या पत्रकाराला दिले. त्यावेळी जोरदार हशा पिकला.**




रूपये सरकारने नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यावेळी पवार साहेबांकडे उपस्थित शेतकऱ्यांनी केली.यावेळी रामदास यांना पवार साहेबांनी धान पिकाचे नुकसान, लागणारा खर्च, पंचनामे झाले की काय विचारले असता एकही अधिकारी आला नाही. पंचनामे झाले नसल्याची तक्रार त्यांनी केली. असोली येथील नामदेव इंगोले यांचे बारा एकरात धान, प्रवीण निदान यांचे नऊ एकर यांच्यासह शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती यावेळी शेतकऱ्यांनी दिली.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी कर्मचारी ग्रामपंचायत कार्यालयात बसून पंचनामे करत असून शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पंचनामे करीत नसल्याची तक्रार केली. यावर पवार साहेब यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना




**अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची शेतकरी सांगत असलेली माहिती ऐकताना शरद पवार, अनिल देशमुख, आशिष देशमुख व इतर कार्यकर्ते.**

चांगलेच धारेवर धरले होते. या संपूर्ण दौऱ्यात शेतकरी पवार साहेबांना मदत मिळवून देण्यासाठी विनंती करीत होते.साहेब राष्ट्रपती राजवट आहे अशा परिस्थिती आपण पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करण्यासाठी आलात हिच आमच्यासाठी मोठी आशा आहे.प्रत्येक शेताच्या बांधावरील शेतकरी हा पवार साहेबांचा सोबत बोलताना भाऊ होता आणि त्याच्या कडा पानवत होत्या. एकंदरीत पवार साहेबांचा हा संपूर्ण दुष्काळी पाहणी दौरा शेतकऱ्यांसाठी भाऊक ठरला. या संपूर्ण दौऱ्यात अनिल देशमुख, आशिष देशमुख, रमेश बंग, विजय घोरमाडे, प्रकाश गजभिये, आमदार राजू पारवे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक, सुरेश भोयर यांच्यासह मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.



शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख

# सह्याद्रीच्या भेटीला 'सह्याद्री!'



विलास शिंदे

देशाचे ज्येष्ठ नेते मा. शरद पवारसाहेब यांच्या जन्मदिनानिमित्त लिहिण्याविषयी मला संधी मिळाली आहे हा मी माझा गौरव समजतो. साहेबांच्या राजकीय कर्तृत्वावर भाष्य करण्याची माझी योग्यता नाही. मात्र शेती आणि शेतकरी यांच्याशी त्यांचे जे अतूट संबंध आहेत, अशा व्यक्तिमत्त्वाचा मला व्यक्तिगतरीत्या आणि सह्याद्री फार्म्स परिवाराला आजवर जो अनुभव आला आहे त्याबद्दल मी काही आठवणी नक्कीच सांगू शकतो.

११ सप्टेंबर २०१७ या दिवशी मी आयुष्यात पहिल्यांदा पवारसाहेबांना भेटलो. त्याआधी कधीच मी त्यांना भेटलेलो नव्हतो. किंबहुना कोणत्याही मोठ्या राजकीय नेत्याला मी वैयक्तिकरीत्या कधीही भेटलो नव्हतो. पवारसाहेबांच्या पहिल्या सह्याद्री भेटीची पार्श्वभूमी सांगितलीच पाहिजे... सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीची स्थापना २०११ साली झाली. द्राक्षशेती, द्राक्षे व अन्य फळांची निर्यात असा तो प्रवास होता. तत्पूर्वी काही वर्षांपूर्वी भारतीय द्राक्षांमध्ये 'लिओसीन' हा घटक आढळून आल्याने युरोपच्या बाजारपेठेत लाखो टन भारतीय द्राक्षे नाकारली गेली. राज्यातील द्राक्ष उत्पादक आणि निर्यातदार निव्वळ हादरले नव्हते तर त्यांना प्रचंड मोठा आर्थिक फटका बसला होता. अनेक शेतकरी आणि व्यापारी उद्ध्वस्त झाले. अर्थातच सह्याद्री फार्म्सही त्याला अपवाद नाही. अशा धक्क्यांमधून सावरत सह्याद्री फार्म्सची वाटचाल सुरू होती. २०१४ ते २०१६ या काळात अनेक घडामोडी होत होत्या. चढउतार येत होते. सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी कोणत्याही सरकारी मदतीशिवाय पुढे पावले टाकत होती. डेव्हलपमेंट बँका, वित्तीय संस्था आणि इतर संस्थांशी आमचा वारंवार संबंध येत होता. इतर घटकांना सह्याद्रीविषयी माहीत असण्याचे कारण नव्हते. 'आयडीबीआय' बँकेचे कार्यकारी संचालक अभय बोंगीरवार यांनी व्यावसायिक कामासंदर्भात सह्याद्री फार्म्सला भेट दिली. एका शेतकरी उत्पादक कंपनीने अल्पावधीत केलेल्या प्रगतीने ते प्रभावित झाले. अनेक जणांना ते स्वतःहून सह्याद्रीबद्दल भरभरून माहिती सांगायचे. पवारसाहेबांनाही त्यांनी सह्याद्री फार्म्सबद्दल सांगितले. नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या मालकीची कंपनी आता देशातील आघाडीची कंपनी बनली आहे, हे ऐकून सह्याद्रीबद्दल अधिक माहिती जाणून घेण्याची साहेबांची उत्सुकता वाढली. पवारसाहेबांनी आम्हाला मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटरला भेटायला बोलावलं.



'सह्याद्री फार्म' चे अध्यक्ष विलास शिंदे बोलत असून व्यासपीठावर शरद पवार, विनायकराव पाटील, नरहरी झिरवळ आणि एस. के. पटनायक.

११ सप्टेंबर रोजी सह्याद्रीच्या काही सहकाऱ्यांसह आम्ही साहेबांच्या भेटीसाठी मुंबईत दाखल झालो. भेटीची वेळ फक्त १० मिनिटे ठरली होती. माझ्या सहकाऱ्याने लॅपटॉप काढला. प्रेझेंटेशनची तयारी सुरू केली. पवारसाहेब तत्काळ म्हणाले,त्याची गरज नाही आपण थेटच चर्चा करू!' साहेबांचे

प्रश्न सुरू झाले. क्षणार्धात 'रॅपीड फायर' प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. शेतीसाठी भांडवल, उत्पादन, काढणी, हाताळणी, मार्केटिंग, पीकविमा, द्राक्ष-टोमॅटो पिकांविषयी माहिती अशा एक ना अनेक विषयांचे 'लोडेड' प्रश्न साहेबांकडून येत होते. मी उत्तरं देत होतो. जबरदस्त ताकदीचे प्रश्न होते. काही प्रश्न अनपेक्षित होते, समोरच्याला भांबावून टाकू शकतील असे होते. मनावरचं दडपण दूर झालं असल्याने आणि लपवण्यासारखे काहीच नसल्याने मी मोकळेपणाने उत्तरे देत होतो. १० मिनिटांची वेळ एक तासावर कशी गेली हे कळलेच नाही. प्रश्नोत्तराचा हा तास पवारसाहेबांची सह्याद्रीला भेट देण्याची तारीख निश्चित होऊनच



संपला. आम्ही काही बोलण्याच्या आतच त्यांनी सेक्रेटरीला बोलावून २ ऑक्टोबर २०१७ ही तारीख सह्याद्री फार्मर्स कंपनीच्या मोहाडी येथील मुख्य कार्यस्थळाला भेट देण्यासाठी ठरवून टाकली. मी म्हटलं की सध्या काही कामं अपूर्ण आहेत. पूर्ण झाल्यावर या किंवा उद्‌घाटनाला बोलावतो. साहेबांनी वेळ ठरवली होती. त्यात बदल होणार नव्हता. अर्थात मा. पवारसाहेब सह्याद्रीच्या भेटीवर येणार हे कळल्यावर आमचा आनंद आणि उत्साह द्विगुणित झाला होता.

माघारी नाशिकला परतल्यावर आम्ही भेटीच्या तयारीला लागलो. एका शेतकरी उत्पादक कंपनीच्या भेटीला साहेब येणार असल्याने राज्यात चांगल्या पद्धतीने काम करीत असलेल्या काही शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना आम्ही निमंत्रित केले. जेणेकरून या भेटीचे स्वरूप प्रातिनिधिक बनावे असा उद्देश होता. काही प्रश्न किंवा अडचणी साहेबांपुढे एकत्रित मांडता येतील असा विचारही त्यामागे होता. दुसरे एक कारणही होते. कंपनी कायदा १९५६ मध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने सन २००२ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या प्रो. वाय. के. अलग समितीच्या शिफारशीच्या आधारे केंद्र शासनाने उत्पादक कंपनी कायद्यामध्ये सुधारणा केली. सुरवातीला याकडे केंद्राचे किंवा राज्य सरकारांचे फारसे लक्ष नव्हते. मात्र मा. पवारसाहेब केंद्रात कृषिमंत्री म्हणून आल्यापासून केंद्र आणि राज्य सरकारांनी शेतकरी उत्पादक कंपनी मोहिमेला जोरदार प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली होती. साहेबांच्या दूरदृष्टीचा हा परिपाक होता. साहेबांची सह्याद्रीची ठरलेली भेट खूपच चांगली झाली. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या मेळावा, असे स्वरूप या भेटीला आले. पवारसाहेब सह्याद्रीला येईपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस किंवा अन्य कोणत्याही पक्षाच्या मोठ्या अथवा स्थानिक राजकीय नेत्यांनी सह्याद्रीला भेट दिलेली नव्हती. अर्थात सह्याद्रीबद्दल फारसा गवगवा आम्ही करत नव्हतो त्यामुळेही असेल कदाचित!

शेतकऱ्यांना एकत्र करीत कृषिमालाचे उत्पादन ते मार्केटिंग असे अनोखे मॉडेल सह्याद्री कंपनीने उभे केले आहे. 'अमूल'ने दूध उत्पादकांची अर्थव्यवस्था बदलली, तसेच काहीसे हे आहे.









या धर्तीवर महाराष्ट्रात फळे व भाजीपाला उत्पादकांनी एकत्र येऊन क्रांती करावी. उसाच्या संशोधनासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ही संस्था उभी राहिली. त्याच धर्तीवर फळे व भाजीपाल्यासाठी संस्था उभी करता येऊ शकते, असे साहेबांनी आम्हा शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींपुढे सांगितले. 'इंटरनॅशनल ॲग्रिकल्चर ट्रेड एक्स्पो' मध्ये हा विषय कसा नेता येईल याबाबत सूचना केल्या. एवढेच नाही तर तिथूनच त्यांनी केंद्रीय कृषी सचिव



आणि राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांशी संपर्क साधून सह्याद्रीला भेट देण्याची सूचना केली. ११ नोव्हेंबर २०१७ ही भेटीची तारीखही निश्चित केली. पवारसाहेब पुन्हा सह्याद्रीला येणार होते. साहेबांनी ज्या पद्धतीने सह्याद्रीच्या प्रकल्पाला भेट देण्यासाठी उत्सुकता दाखवली, पाठपुरावा

केला, प्रत्यक्ष भेट दिली आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन केले, ते पाहून अनेक सुखद धक्के बसत होते. साहेबांनी दिलेल्या शाबासकीमुळे अवर्णनीय आनंद झाला होता. सह्याद्रीच्या पहिल्या भेटीनंतर साहेबांनी दोन आठवड्याच्या काळात सगळ्यांपर्यंत सह्याद्री फार्म्सचा विषय नेला. ठरल्याप्रमाणे ११ नोव्हेंबरला दुसरी भेटही झाली. केंद्रीय कृषी सचिव श्री. एस. के. पटनायक आणि राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाचे व्यवस्थापकीय











संचालकांसह पवार साहेब पुन्हा सह्याद्रीच्या कार्यस्थळावर आले. जवळपास अर्धा दिवस त्यांनी सह्याद्रीची आणि एकूणच शेतकरी उत्पादक कंपन्यांची वाटचाल, भावी दिशा आणि अडचणी समजून घेतल्या. केंद्रीय कृषी मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे गंभीरपणे पहावे, या विषयाला

अधिक चालना द्यावी त्यासाठी साहेबांनी हा सगळा खटाटोप केला होता.

कै. अण्णासाहेब शिंदे केंद्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष असताना महाराष्ट्राच्या परिस्थितीवर त्यांनी भाष्य केले होते. राज्यातील फलोत्पादनाचे क्षेत्र ५० लाख हेक्टरपर्यंत वाढू शकते, असा विचार त्यांनी मांडला होता. मा. पवार साहेबांनी नव्वदच्या दशकात या विचारांना धोरणात्मक मूर्त रूप दिले. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यात रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजना महाराष्ट्रात सुरू झाली. देशाच्या कृषी क्षेत्रात एक मैलाचा दगड म्हणून या योजनेकडे पाहिले जाते. राज्यातील साखर कारखानदारीने उसासारख्या पिकामध्ये जी मूल्यसाखळी विकसित करून दिली तोच विचार फळबाग योजना लागू करण्यामागे होता. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा प्रदेशांत फळबागांची लागवड वाढून महाराष्ट्र देशातील आघाडीचे राज्य बनले. पुढील टप्प्यात फळांसाठी नव्या व्यवस्था विकसित होण्याची गरज मा. पवारसाहेबांच्या लक्षात आली. शेती हा व्यवसाय अनेक बाह्य घटकांवर अवलंबून असतो. अनियमित पाऊस, गारपीट, मॉन्सूनला विलंब, कमी पाऊस पडणे किंवा जास्त पडणे असे हे घटक आहेत. या व्यवसायात धोक्यांचे प्रमाण सर्वाधिक असते. म्हणूनच शेतकऱ्यांचा आत्मविश्वास कमी झाला आणि त्यांची व्यावसायिक प्रवृत्ती दडपून गेली. शंभर टक्के शेतकऱ्यांच्या मालकीची असलेल्या सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीने शेतकरी उत्पादकांना एकत्रित आणून परिपूर्ण 'व्हॅल्यू चेन' अर्थात मूल्य साखळी उभी केली. शेतकऱ्यांना लागणाऱ्या सगळ्या सोयी-सुविधा एकाच छत्राखाली पुरवीत आहे. दर्जेदार कृषी निविष्ठा, अचूक वेळी योग्य सल्ला, जागतिक बाजारपेठेने घालून दिलेल्या नियमांनुसार उत्पादन काढण्याचे मार्गदर्शन, बोनससह योग्य दर, खात्रीशीर पेमेंट, सदस्य शेतकऱ्यांना बँकांकडून सुलभ पतपुरवठ्यासाठी मदत असे अनेक लाभ सह्याद्रीच्या सभासदांना मिळतात. द्राक्ष उत्पादकांचे महत्त्वाचे प्रश्न सुटत असल्याने त्यांना फक्त दर्जेदार उत्पादनाकडे बारकाईने लक्ष देता येते. देशातून होणाऱ्या एकूण द्राक्ष निर्यातीमध्ये सह्याद्री फार्म्स गेल्या तीन वर्षांपासून सतत अव्वल स्थानावर आहे, ते या व्हॅल्यू चेनमुळेच!

मा. पवारसाहेबांनी सह्याद्रीला दोन वेळा अतिशय आत्मीयतेने भेट दिली. त्यामागची पोटतिडीक आम्हाला जाणवत होती. हे मॉडेल सगळीकडे गेले पाहिजे, ही त्यांची इच्छा आहे. त्यासाठी त्यांनी कृतीमधून संदेश दिला.

आमचा नाशिक जिल्हा देशाचे जागतिक द्राक्ष आगार म्हणून परिचित आहे. सुरवातीच्या काळात श्री. बाळासाहेब जगताप, श्री. सोपानराव कांचन, वसंतराव आर्वे यासारख्यांनी कधीकाळी अशक्य वाटणारे द्राक्षनिर्यातीचे प्रयोग केले. विमानाने द्राक्षे युरोपात नेली. या प्रयत्नांमागे मा. पवारसाहेबांनी ताकद प्रोत्साहन आणि पाठिंबा होता. पवारसाहेब सुरुवातीपासून द्राक्ष बागायतदार संघाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. महाराष्ट्रात यंदा पावसाने अभूतपूर्व नुकसान केले. 'हाय व्हॅल्यू' किंवा अधिक गुंतवणूक असलेल्या द्राक्षासारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. मा. पवार साहेब गेल्या ऑक्टोबरमध्ये नाशिकच्या पाहणी दौऱ्यावर आले असताना त्यांना भेटण्याची संधी मला पुन्हा एकदा मिळाली. पीकविमा हा कळीचा मुद्दा असतो.






शेतकऱ्यांची मालकी असलेली स्वतंत्र विमा कंपनी असावी, हा विचार त्यांच्यापुढे मांडला. त्यासाठी त्यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

९ जून १९९० रोजी वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या एका कार्यक्रमात तत्कालीन मुख्यमंत्री असलेल्या पवारसाहेबांनी दीर्घ भाषण केले होते. त्यात ते म्हणाले होते की, फळबागा लागवडीचे क्षेत्र विस्तारित करताना या लागवडीचे तंत्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. तसेच त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक फळाच्या उत्पादकांची वेगवेगळी स्वतंत्र संघटना स्थापन झाली पाहिजे. या संघटनांनी एकत्र विचार करणे आवश्यक आहे आणि त्यात परस्पर सामंजस्य आणि समन्वय गरजेचा आहे. या संघटनेच्या माध्यमातून महासंघांच्या रूपाने प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करण्यात आपण यशस्वी होऊ शकू. माझ्या मते हे काळाच्या पुढे धावणारे विचार आहेत.

माननीय पवारसाहेबांचा २००४ ते २०१४ हा कृषिमंत्रीपदाचा कालावधी दुसऱ्या हरितक्रांतीची पायाभरणी आणि त्या दिशेने दमदार वाटचाल करणारा ठरला, यात संशय

मोहाडो येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीतून द्राक्षाचे कंटेनर निर्यात होताना.



नाही. कृषी उत्पादकता, पीकविमा, पतपुरवठा, सहकार, बियाणे, पीक संरक्षण, कोरडवाहू शेती, मार्केटिंग, तंत्रज्ञान, फलोत्पादन, मत्स्योत्पादन, पशुसंवर्धन, सूक्ष्म जलसिंचन, गोदामे यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम त्यांच्या काळात राबविण्यात आले. देशाने या काळात धान्य उत्पादनाचे सगळे विक्रम मोडले. फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन २० कोटी टनांवर गेले, दुग्धोत्पादन १० कोटी टनांहून अधिक झाले. अंडी, मासळी, फुलांचे विक्रमी उत्पादन झाले. मा. पवारसाहेबांनी आखलेली आक्रमक धोरणे आणि त्याची अंमलबजावणी यामुळे भारतीय कृषी क्षेत्राने प्रचंड भरारी घेतली. याच काळात देशातील कृषी शिक्षणात मोठे धोरणात्मक फेरबदल झाले. संशोधन कार्याला चालना मिळाली. कृषी वैज्ञानिक भरती मंडळाच्या कामातील शासकीय हस्तक्षेप थांबवून त्यांनी रिक्त शास्त्रज्ञांची विक्रमी

आधारित शुगर इंडस्ट्री जशी उभी राहिली तसेच उद्योग अन्य फळपिकांच्या बाबतीत उभे राहू शकतात. गेल्या काही वर्षांतील अनुभव आणि प्रयोगांमधून खूप काही भलेबुरे अनुभव गाठीशी आले आहेत. महाराष्ट्रात हॉर्टिकल्चर पिकांच्या सुमारे २५० आणि अन्य पिके तसेच शेतीपूरक उद्योगांच्या सुमारे ४५० परिपूर्ण मूल्य साखळ्या तयार होण्यास वाव आहे. सह्याद्रीच्या अनुभवातून मी हे ठामपणे सांगू शकतो. या सगळ्या प्रक्रियेत शेती क्षेत्राचा दीर्घ अनुभव असलेल्या मा. शरद पवार यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचे मार्गदर्शन फार म्हणजे फार महत्त्वाचे आहे.

चीन युद्धाच्या प्रसंगी स्व. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातून केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून गेले त्यावेळी नाशिककरांनी त्यांना लोकसभेवर बिनविरोध निवडून पाठवले होते. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला', असे या घटनेचे वर्णन झाले होते.



पदे भरली. बाजार समिती सुधारणेचा मॉडेल ॲक्ट, वेअर हाउसिंग बिल २००५, प्लँट प्रोटेक्शन ॲक्ट, जीवनावश्यक वस्तू कायद्यातून कांदा व इतर शेतमाल वगळणे, वायदे बाजार आदी अनेक कायद्यांत त्यांनी दूरगामी विचार करून बदल घडवले. कृषिक्षेत्राचा नकारात्मक असलेला विकासदर मा. पवारसाहेबांच्या काळात वेगाने झेपावला. त्यांनी राबविलेल्या सर्वांगीण धोरणांचा हा परिणाम होता.

इथून पुढच्या काळात शेतीसमोरील एकूणच आव्हाने वाढत जाणार आहेत. हवामानातील बदल, सिंचन, पतपुरवठा, विमा हे प्रश्न आणखी वेगळ्या स्वरूपात तीव्र होणार आहेत. मोठी गुंतवणूक असलेली द्राक्षशेती किंवा अन्य फळबागांनाही हेच लागू होते. महाराष्ट्राने गेल्या ३० वर्षांत फलोत्पादनात मोठी झेप घेतली असली तरी अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. हॉर्टिकल्चर पिकांना संधीही मोठी आहे. राज्यात ऊसपिकावर

चव्हाणसाहेबांचा वैचारिक आणि राजकीय वारसा असलेले मा. पवारसाहेब महाराष्ट्राचे 'सह्याद्री' आहेत. साहेबांनी सह्याद्रीला दोन वेळा आले. 'सह्याद्री'च्या भेटीला 'सह्याद्री' असे वर्णन केले तर वावगे ठरणार नाही.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी म्हटले आहे की...

**शत शरदाचे सुभग चांदणे उजळो वाटेवर**
**लाभो संसारातील सारे सुखदायी सुंदर**

पवारसाहेब वयाची ७९ वर्षे पूर्ण करून ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या जन्मदिनी संपूर्ण सह्याद्री परिवाराच्या वतीने शतायुषी होण्यासाठी शुभेच्छा.

**– विलास शिंदे,**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
**सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कं., नाशिक**
**मो. : 9850507937**

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख



# शरद पवार
# युवकांचे स्फूर्तीस्थान

"महाराष्ट्रात सरकार कोणाचे येणार ?" सर्व सामान्यांचा प्रश्न ?" महाराष्ट्रात सरकार पवार साहेब सांगतील त्यांचेच येणार" सर्व जाणकारांचे उत्तर

सध्या फेसबुक, व्हॉटस् ॲप, ट्विटर, व्यंगचित्रे, चारोळ्या, वात्रटिका, कविता, टी.व्ही. वरील सर्व चॅनल्सच्या बातम्या, सर्व भाषिक दैनिक ते वाडी तांड्यापासून महानगरापर्यंत एकच नाव चर्चेत आहे. शरद्रचंदजी पवार साहेब.

कारण ही तसेच आहे इ.स.2019 च्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी टी.व्ही.चॅनल्स, वर्तमानपत्रांनी अंदाज वर्तवला होता की या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आघाडीचा सफाया होऊन 240 जागेवर भाजपा सेनेचे उमेदवार विजयी होऊन युतीचेच शासन येणार. असे चित्र, आभास निर्माण करून आघाडीतील अनेक नेत्यांना चौकशी, ईडीचा धाक दाखवून शरण येण्यास भाग पाडले जात होते. अशावेळी महाराष्ट्रातील भूमीपुत्र पवार साहेबांनी राजकीय आखाड्यात शड्डू ठोकुन मोदी-शहा-फडणवीस- ईडी यांच्या विरूद्ध चॅलेंज निर्माण केले. परिणामी छत्रपती शिवराय-फुले- शाहु- बाबासाहेबांच्या पुरोगामी महाराष्ट्रातील तरूणांचे रक्त आपोआप सळसळले आणि पवार साहेबांच्या सभेस तरूणांची प्रचंड गर्दी होऊ लागली. पवार साहेबांच्या



प्रदीप सोळुंके

भाषणात हशा, टाळ्या, शिट्यांचा वर्षाव होऊ लागला. आणि आम्हीच सत्ता मिळविणार या तोऱ्यात मिरवणाऱ्या भाजपाच्या नेत्यांना पळता भूई थोडी झाली. पवार साहेबांच्या प्रचारसभा, राजकीय मुत्सद्दीपणामुळे आघाडीच्या आमदारांची संख्या शंभरापर्यंत पोहचली. दुसरीकडे युतीस स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु बीजेपी सेनेची "तुतु -मैमै" सुरू झाली. त्यातुन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागु झाली आणि निवडणुक होऊन महिना उलटा तरी कोणीच सरकार बनवण्याचा दावा करत नव्हते. अशावेळी एकच प्रश्न चर्चेत होता. 'महाराष्ट्रात सरकार कोणाचे येणार?' आणि सर्व राजकीय विश्लेषक, पत्रकार, सर्व पक्षाचे नेते एकच उत्तर देत होते' महाराष्ट्रात सरकार पवार साहेब सांगतील त्यांचेच येणार"

सध्या युवापिढीत पवार साहेबांच्या चाहत्यांची संख्या रोज लाखाने वाढत आहे. या युवापिढीने पवार साहेबांचा शुन्यातुन विश्व निर्माण करणारा संघर्ष समजुन घेतला तर त्यांच्याही जिवनाच सोनं होईल असा हा संघर्ष आहे. चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद, तिन वेळा केंद्रीय मंत्री, विधानसभा, लोकसभेचे विरोधीपक्ष नेतेपद भुषविलेले, चौदावेळा रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी होऊन संसदीय जिवनास पन्नास वर्षे पूर्ण करणारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या राष्ट्रीय पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, भारताचे जेष्ठ नेते पवार साहेब, लहानपणी शाळेत पाच किमी पायी येणे जाणे करत होते यावर तुमचा विश्वास बसेल का? पण हे वास्तव आहे. एवढेच नाही तर बारामती परीसरात जेवढे आठवडी बाजार भरत तेथे पवार साहेब उन्हात पोत्यावर बसुन भाजीपाला, द्राक्ष विकत होते, पुढे पुण्यास शिक्षणास गेल्यावर आई शारदाबाईनी पहाटे बनविलेला जेवणाचा डब्बा वडील गोविंदराव काटेवाडी ते बारामती बैलगाडीने जाऊन बारामती-पुणे बसने पाठवत. हा जेवणाचा डब्बा दुपारी उशीरा पुण्यास मिळत असे. त्याच डब्यातील जेवण रात्री व दुसऱ्या दिवशी सकाळी, दुपारी खाऊन पुण्यास 10x10 च्या रूममध्ये भांवडासह राहुन शिक्षण घेणारे पवार साहेब आज 10 वाजुन 10 मिनिटे चिन्ह असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक अध्यक्ष आहेत. आहे का नाही थक्क करणारा व युवकांना प्रेरणा देणारा, स्फुर्ती देणारा जीवनप्रवास.

'स्वतःची कामे स्वतः करणे' हा पवार साहेबांचा गुण आपण कार्यकर्ते म्हणुन स्विकारला तरी तरूणांचे कल्याण होईल. तुम्ही निट निरीक्षण करा. पवार साहेबांना बैठकीत, सार्वजनिक कार्यक्रमात जनतेने दिलेली निवेदने पवार साहेब व्यवस्थीत फाईलमध्ये ठेऊन ती फाईल आपल्या कोणा कार्यकर्त्या, बॉडीगार्ड, स्विय सहाय्याकडे न देता स्वतः हातात घेऊन जातात. ती निवेदने प्रवासात किंवा घरी गेल्यावर वाचन करून जनतेची कामे मार्गी लावतात. संबंधीत व्यक्तीस स्वतःच्या सहीने पत्रव्यवहार करतात अन् हो अत्यंत महत्वाचे आपणास एखाद्या फाईलवर सही करायची असेल तर आपण इकडे तिकडे पेन मिळेल का? शोध घेतो. पवार साहेबांच्या खिशाला सतत दोन पेन लावलेले तुम्हांस पाहवयास मिळतील. त्यापेक्षा अत्यंत महत्वाचे म्हणजे पवार साहेब एवढ्या व्यस्त सार्वजनिक जिवनात प्रचंड वाचन करतात. तुम्ही बारामती,



पुणे, मुंबई, दिल्ली येथील त्यांच्या बंगल्यावर जा त्यांच्या टेबलवर जगातील महान विचारवंत, तत्वज्ञ, क्रांतीकारक, समाजनेते, यांचे ग्रंथ ठेवलेले पहावयास मिळतील. पवार साहेबांचे अजुन एक वैशिष्ट्य म्हणणे पवार साहेबांना भेटण्यास आलेल्या प्रत्येकाचे म्हणणे पवार साहेब लक्षपूर्वक ऐकून घेतात. विषय कोणताही असो त्यावर चर्चा करतात. योग्य सल्ला देतात. एवढा प्रचंड ज्ञानसाठा त्यांच्याजवळ आहे आणि जी गोष्ट आपणास माहित नाही ती इतरांकडून समजुन घेतात. अजून एक सांगायचे राहिले. पवार साहेबांची वाचनाची स्पीड फार मोठी आहे. आपण एकेक ओळ आडवी वाचतो. पवार साहेब पुस्तकातील एकेक मुद्दा उभा वाचतात. आपण जर पवार साहेबांचे कार्यकर्ते असाल, तर आपणाजवळ सतत पेन हवा, ग्रंथवाचन नियमीत असावे, समोरच्याचे म्हणणे व्यवस्थीत ऐकून घ्या व जी गोष्ट आपणास माहित नाही ती इतरांकडून समजून घेण्यास संकोच करू नका. आपल्या जिवनाचे सार्थक होईल याची खात्री देतो. अनेक राजकीय नेते तिकीट मिळेल का? निवडून येईल का? मंत्रीपद मिळेल का? यासाठी भविष्य पाहतात, गंडेदोरे बांधतात, नवस करतात. मंत्री झाले तर मंत्रीपद जाऊ नये म्हणुन सहकुटूंब देवदेव करतात. परंतु पवार साहेब तुम्हांला कधीही गंडेदोरे बांधलेले, मुहूर्त बघून निवडणुकीचा फॉर्म करताना, उगीच देवदेव करत फिरताना



पहावयास मिळणार नाहीत (अपवाद मुख्यमंत्री असताना श्री विठ्ठलाची शासकीय पुजा) भविष्यावर विश्वास न ठेवता आपल्या कार्यकर्तृत्वाने देशाचे भविष्य घडविणारे पवार साहेब खऱ्या अर्थाने फुले- शाहु-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचे पाईक आहेत. त्यामुळे तरूणांनी पवार साहेबांचा हा वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारून जीवनातील क्षणाक्षणाचा वापर करावा.

छोट्या मोठ्या संकटाचा बाऊ करणाऱ्या तरूणांनो, संकटास घाबरून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांनो पवार साहेब समजून घ्या. संकटाचा मुकाबल करण्यास सज्ज व्हा. पवार साहेबांच्या जीवनातील संकटे पहा- पुलोद काळातील मुख्यमंत्रीपदावरून अचानक पाय उतार व्हावे लागले, इ.स.1980 ला 54 पैकी 50 आमदार पक्ष सोडून इतर पक्षात गेले, (ते आमदार पुन्हा कधीच निवडुन आले नाहीत. पवारांच्या पॉवरचा चमत्कार) पंतप्रधान पदाने हुलकावणी दिली, काँग्रेस नेतृत्वाने पक्षातून काढले, जिवघेणा कॅन्सर झाला, सत्ता गेली, पवार साहेब खचले? डगमगले? वयाच्या 80 व्या वर्षी युवकांना लाजवेल अशा उत्साहाने उभे आहेत. हे दृष्य युवकांनो आपण स्वतः पहात आहात. खाजगी जीवनातील तर जाऊ द्या भुकंप, बॉम्बस्फोट, महापुर, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती ज्या वेळी आल्या त्या त्या वेळी भुंकपाने थरारणाऱ्या भूमीवर, बॉम्बस्फोटाने बेचीराख झालेल्या स्थानी, महापुराने चिखल गाळ झालेल्या परिसरात आणि दुष्काळाने होरपळून जाणाऱ्या मराठवाडा, विदर्भात पवार साहेब पाय रोऊन, उभे राहून ती आपत्ती दुरच करणार हे भारतीय जनतेने वारंवार अनुभवले आहे म्हणून युवकांनो, शेतकऱ्यांनो छोट्या मोठ्या संकटास न घाबरता त्या संकटाचा मुकाबला करून त्यावर स्वार होण्याची कला पवार साहेब यांच्याकडून आत्मसात करा व आनंदी जीवन जगा.

पवार साहेबांकडून युवकांनी अजून एक गोष्ट शिकावी ती म्हणजे पवार साहेबांची हुकूमी झोप. पवार साहेब रात्री कितीही उशीरा झोपले तरी झोपेच्या पटकन अधीन होतात व सकाळी 7 वा तयार असतात, 8 वा वर्तमानपत्रे वाचतात, 9 वा दिवसभरातील कामासंबंधी फोन लावतात, भेटीस आलेल्या जनतेस वेळ देतात, त्यांच्या समस्या समजून घेऊन त्या समस्या सोडवतात, सकाळी 10 वा.नियोजित दौरा सुरू होतो. हा दौरा, नियोजित कार्यक्रम, भेटीगाठी बैठका, रात्री किती वाजता संपतील हे सांगता येत नाही. साहेबांची हीच परंपरा अजितदादा पवार, सौ.सुप्रिया सुळे यांनी पुढे सुरू ठेवली आहे. पवार साहेबांनी आपल्या जीवनात अनेकदा एका निवडणुकीत दीड दीड हजारांच्या वर सभा घेतलेल्या आहेत. तीन तीन दिवस एकही डुलकी न घेता सलग जागरण करून त्यांनी प्रचार दौरे केलेले आहेत. त्यामुळे रात्री अलार्म लावून सकाळी न उठू शकणाऱ्या तरूणांनो पवार साहेबांचा आदर्श घेऊन सकाळी लवकर उठून जीवनातील क्षणाक्षणाचा वापर करा जीवनात यशस्वी व्हाल.

पवार साहेबांच्या मुंबईच्या बंगल्याचे नाव आहे 'सिल्हर ओक.' मी बऱ्याचदा विचार केला पवार साहेबांनी सिल्हर ओक हे नाव बंगल्यास का दिले असेल? याचे उत्तर मला केरळ दौऱ्यात 'मुन्नार' येथे गेल्यावर मिळाले. मुन्नार येथे चहाचे मळे आहेत. तेथील गाईड आम्हांला माहिती देत होता. "या चहाच्या मळ्याचे आयुष्य तिनशे वर्षे आहे' आम्ही अवाक. डोंगरावर ठिबक सिंचन, तळे, शेततळे, पाण्याची सुविधा नसताना हे चहाचे मळे तिनशे वर्षे जिवंत राहतात कसे? माझ्या या प्रश्नावर गाईडने सांगीतले. "या चहाच्या मळ्यात जी अधून मधून झाडे आहेत ही झाडे पावसाळ्यात चार महिने पाणी शोषून घेतात व उरलेले आठ महिने या चहाच्या मळ्यास पानी पुरवतात. त्या वृक्षाचे नाव आहे सिल्हर ओक. याच वृक्षाचे नाव पवार साहेबांच्या बंगल्यास आहे. त्यामुळे पवार साहेबांच्या विचारावर, कार्यावर, उभा राहिलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कितीही संकटे, वादळे येऊ द्या किमान तिनशे वर्षे या पक्षाचा 'बाल भी बाका होणार नाही' आणि हो आता विधानसभा निवडणुकीपूर्वी पवार साहेबांचे अनेक लाभार्थी नेते पक्ष सोडुन जात असताना माझ्या सारखा एक कार्यकर्ता पवार साहेबांच्या विचारांचा पूर्णवेळ प्रचारक होण्याच्या निर्णय घेऊ शकतो. अशा अनेक सच्च्या कार्यकर्त्याचा खजिना पवार साहेबांजवळ आहे याची पवार साहेबांच्या विरोधकांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. शेवटी एवढेच सांगणे युवकांनो फक्त बायोडाटे, एअरपोर्ट, काममागे, फोटोकाढे हवसे, गवसे कार्यकर्ते न होता पवार साहेबांच्या कार्याचा विचारांची स्फूर्ती घेऊन कार्यास लागा. इतिहास तुमची नोंद घेईल.




# शरदाचे चांदणे

**डॉ. सुधीर भोंगळे**

भारतासारख्या सुंदर देशात सहा ऋतु थोड्याफार फरकाने आजही गुण्यागोविंदाने नांदतात. त्यात शरद ऋतुचे महत्त्व विशेष आहे. हा ऋतु कोजागिरीचे लख्ख चांदणे घेऊन येतो. कोजागिरीला भारतीय अध्यात्म दर्शनात मोलाचे स्थान आहे. कोजागिरी ही आत्मज्ञानाची पौर्णिमा आहे. 'मी'पणा नाहीसा होऊन जिथे व्यापकपणा जाणवतो त्याला कोजागिरी म्हणतात. याला संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी ज्ञानाची सतरावी कळा असे म्हटले आहे. पौर्णिमेपर्यंत चंद्राच्या 15 कळा आपल्याला माहिती आहेत. या 15 कळा म्हणजे 15 प्रकारची उत्कृष्ट सामाजिक कर्तव्ये आहेत. यामध्ये ज्ञान, सेवा, त्याग, अभ्यास, भक्ती, कर्तव्य, सामाजिक भान, अभ्यासवर्ग, कार्यशाळा, संवाद, मौन, कार्यतत्परता, आत्मभान, आत्मक्लेष, आत्मजाणीव आणि आत्मश्रद्धा अशा या चंद्राच्या कळा आहेत. या साऱ्यांपलीकडची

# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख



आत्मज्ञानाची जी श्रेष्ठ कळा आहे तिला 17 वी कळा म्हणतात. कोजागिरीला ज्ञान आणि कर्तव्ये यांच्या चिंतनातून जे मंथनाचे सुशांत चांदणे जन्माला येते ते शरदाचे चांदणे होय.

शरद ऋतुत नद्या मर्यादेत वाहतात. पानांना बहराचे भान असते. वृक्षांना अभ्यासाचा पालव फुटतो. थंडीची चाहूल लागते. धुक्यातून आत्मवाटा सापडतात. आभाळ कधी कधी निरभ्र असते तर कधी कधी आभ्राच्छादित असते. हवा तरल असते. जाणत्या संवेदनांचा हा काळ म्हणून शरद ऋतु सर्वांना भावतो. श्रीमद्‌भागवतात कोजागिरीच्या दिवशी भगवंताची रास पौर्णिमा वर्णिली आहे. रास म्हणजे आत्मज्ञानाची जाणीव. मला नेमके काय करावयाचे आहे याचे यथार्थ सद्‌भान येथे मिळते. त्या भानाचा सक्रिय उत्सव म्हणजे रास. आद्य शंकराचार्यांनी कोजागिरीला ज्ञानाचा जागर म्हटले आहे. चंद्र ही मनाची देवता आहे. मनाला अमृतत्त्वाचे भान येणे महत्त्वाचे असते. असे भान समाजातून स्वच्छपणाने जेव्हा प्रकटते त्याला 'शरदाचे चांदणे' म्हणतात.

मा. शरद पवार यांच्या व्यक्तित्त्वाला लाभलेले हे सामाजिक भान फार महत्त्वाचे आहे. चंद्र आपल्यापुरता कधीही प्रकाशित नाही. सूर्य कधीही आपल्या फ्लॅटपुरता उजेडत नाही. नदी कधीही स्वतःसाठी पाणी पित नाही. या साऱ्यांचे फार मोठे ऋण आपल्यावर आहे. याची जाण शरद ऋतुला आहे. आपण कशासाठी जन्माला आलो आहोत हा पायाभूत विचार पंचमहाभूते करतात. तो विचार ज्या स्वच्छ मनातून येतो त्याला 'शरदाचे मन' म्हणतात. आपल्यापुरता विचार करणारे अनेक सापडतात. त्यात

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!


विशेष नाही. प्रतिकूलतेवर मात करणारे अनेक आहेत. ते जन्मभर प्रतिकूलतेचेच गोडवे गातात. त्यांना पुढे जाताच येत नाही. पण काही व्यक्ती अशा असतात प्रतिकूलतेचे भांडवल न करता ज्ञान आणि भान राखून जे समाज मनाच्या जाणिवा नेमके ओळखतात त्यामध्ये मा. शरद पवारांचे नाव घ्यावे लागते.

मा. शरद पवार ही केवळ व्यक्ती नाही. तो एक सामाजिक परिवर्तनाचा कृतिशील विचार आहे. समाजात वाढताना केवळ आपली मालमत्ता वाढवायची नसते. बौद्धिक क्षमता वर्तमानाच्या ज्ञानाच्या कसोटीवर घासूनपुसून वर्तमानाला नवे डोळे द्यायचे असतात. आपणा सर्वांना ठाऊक आहे शरद पवार हे मा. यशवंतराव चव्हाण यांचे मानसपुत्र आहेत. यशवंतरावांनी त्यांची निवड करणे यातच पवारांच्या कुवतीचे मोठेपण आहे. जे जे विधायक आहे आणि जे जे समाजाला पुढे नेणारे आहे ते आत्मसात करायची शरदरावांची ताकद विलक्षण आहे. म्हणूनच कॅन्सरसारख्या असाध्य दुर्धर रोगावर मात करून आज हा मनातला माणूस 17 ते 18 तास काम करतो. याला शब्द नाहीत. हे सामर्थ्य यशवंतरावांच्या दृष्टितून शरदरावांना मिळाले. शरदरावांनी माणसे वेचली आणि वाचली. कोणत्या माणसांची कितपत क्षमता आहे हेही तपासले. माणसांचा संपर्क असणे हे ठीक आहे, पण माणसांना ओळखण्याची जी दृष्टी असते ती दुर्मिळ असते. कुठल्या माणसाचा कुठे उपयोग करावा याचे पाठ शरदरावांकडून घ्यावेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या ज्ञानाला खांदा देणारे शरदराव शास्त्रीबुवांच्या नवज्ञानाच्या विचारांनी प्रभावीत झाले होते. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्यानंतर कुसुमाग्रजांच्या दिव्य आणि प्रज्ञावंत प्रतिभेला केलेला त्यांचा नमस्कार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा गाभारा होता. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याशी मैत्री करताना ठाकऱ्यांच्या घरातल्या प्रबोधनाच्या पाऊलखुणा शरदरावांनी आजही जपल्या आहेत. त्यामुळेच उध्दव ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होऊ शकले. आपल्या मित्राचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे म्हणून शरद पवार यांनी प्रचंड मेहनत घेऊन उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री केले आहे हे विसरता येणार नाही. बऱ्याच लोकांना याचे आश्चर्य वाटते की, शरदरावांना हे कसे काय साधते? अनेकांना याचा संतापही येतो. परंतु याचे उत्तर शरदरावांच्या कार्यपद्धतीतून मिळते. त्यांच्या दृष्टीने माणूस कोणत्याही पक्षाचा असो किंवा कोणत्याही विचाराचा असो, त्याच्यातली कृतिशीलता राष्ट्राला पूरक आहे की नाही, त्यातून त्याचे भारतीयत्व मनाला कितपत प्रोत्साहित करणारे ठरते यावर अवलंबून असते. मंत्री नितीन गडकरी यांच्याही कार्यक्रमाला शरद पवार जातात याचे कारण मैत्री हा त्यांच्यातला निखळ दुवा असतो. मैत्री म्हणजे ओळखीतून कामापुरते काम करून घेणे नव्हे; मोठेपण ओळखून मनापासून स्नेहबंध जपणे आणि त्याला जागणे याला मैत्री म्हणतात. अभ्यासयुक्त संवादातून मैत्री जन्मते. विचारांच्या वाटांमधून मैत्री मोकळी होते. आग्रही असण्यापेक्षा संग्रही वृत्तीतून मैत्री वाढते. मनामनांच्या चर्चांमधून मैत्रीला व्यापकत्व लाभते. मैत्री कधीही सिद्धान्तापुरती किंवा सामाजिक बांधीलकीपुरती नसते. मैत्री

शरदरावांना आयुष्यभर खंबीरपणे साथ देत असलेल्या सौ. प्रतिभाताई पवार यांचा वाढदिवस १३ डिसेंबरलाच असतो हा योगायोग की परमेश्वरी आशिर्वाद काय म्हणायचे?





जीवनाच्या बांधीलकीतून येते. जगण्याच्या वळणांवर जे कोणी आपल्या स्वतंत्र पणत्या लावतात त्यातून मैत्रीच्या प्रकाशाची दिवाळी साजरी होते. शरदरावांची मैत्री हा स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. त्यांच्याशी बोलण्यातून तर तो विषय अधिक खुलतो.

शरदरावांनी देशाचे कृषीमंत्रीपद मागून घेतले. भारतीय शेतीत त्यातून वेगळी कृषीक्रांती झाली. देशाने आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली दुसऱ्या हरितक्रांतीच्या दिशेने वाटचाल केली आहे. विपन्न अवस्थेत असलेल्या भारतीय शेतकऱ्याला शरदरावांनी नवा प्रकाश दिला. शेती करणे हे फार कठीण झाले आहे हा वाक्यप्रयोग त्यांनी पुसून टाकला. शेतीमालाला उचित बाजारभाव दिले, शेतकऱ्यांची कर्जे माफ केली. त्याला स्वस्तात पुरेसे कर्ज उपलब्ध करून दिले. फळबागा समृद्ध केल्या. शेतीतून नवनवी उत्पन्नाची साधने दिली. या साऱ्यातून भारतीय शेतीला नवा आत्मविश्वास मिळाला. मातीशी इमान राखण्याचे नवे व्रत मिळाले. पडिक जमिनीवर उपवने झाली, मेहनतीला मोल आले. श्रमांना महत्त्व आले, शेतीला नवा श्वास आला. भारताच्या १३५ कोटी लोकसंख्येला पुरून उरेल इतके धान्य निर्माण करण्याची किमया त्यांनी केली. एवढेच नाही तर आपण आता जगातील अनेक मान्यवर देशांना धान्य निर्यात करू शकतो हेही कृतीतून दाखवून दिले. नैसर्गिक संकटे येऊनही शेतीतला आत्मविश्वास शरदरावांनी दिला. धडाधडा जमिनी विकून शहरांकडे धावणारा वर्ग विचार करू लागला. शेती ही महत्त्वाची आहे. शेतीवरच भारताचे अंदाजपत्रक होणे आहे. आजही पावसावरच शेअरचे भाव अवलंबून असतात. ही वस्तुस्थिती ओळखून शरदरावांनी भारतीय शेतीला उपलब्ध असणाऱ्या आवश्यक सोयीसुविधा निर्माण करून दिल्या. विशेष म्हणजे त्यांनी शेतीसाठी जैव तंत्रज्ञान व आधुनिकीकरण वाढीस लावण्याचा प्रयत्न केला. याला अनेकांनी विरोध केला. तो विरोध अंगावर झेलून त्यांनी शेतीत जैव तंत्रज्ञान, जेनेटिकली मॉडिफाईड बियाणे व त्याच्या विविध जाती आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

शरदरावांनी शेतीच्या क्षेत्रात घेतलेला क्रांतीकारी निर्णय म्हणजे शेतीमालाची निर्यात कधीही बंद होता कामा नये. ती



वडील गोविंदराव व आई शारदाबाई

अखंड सुरू राहिली पाहिजे, मग भावामध्ये कितीही चढउतार होवोत. याबद्दल त्यांना विविध प्रकारची टीका सहन करावी लागली. शेतीमालाच्या भाववाढीला शरदराव जबाबदार आहेत असेही आरोप झाले. परंतु शरदराव डगमगले नाहीत. त्यांना शेतकऱ्यांचे हित कशात आहे हे बरोबर अचूक समजले. सर्व प्रकारची टीका झेलून त्यांनी शेतमालाला रास्त भाव वाढवून दिले. हे सबंध निर्णय शरदरावांनी राजकारणातून घेतले नाहीत. त्यांना एका रात्रीतून नेता होण्याची गरजही भासली नाही. घोषणा करून, माणसे चिथाऊन गाड्या पेटविणे, विध्वंस घडवून आणणे सोपे असते. पण गाड्यांचे तंत्रज्ञान उभे करणे कठीण असते. तसे कृषी शास्त्रातल्या नेमक्या नसा ओळखून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणे हे येऱ्यागबाळ्याचे काम नसते. पावसाळी छत्र्यांसारख्या काही घोषणा हवेत विरून जातात पण विधायक कामांचा सातत्याने विचार करून जे विधायक प्रकल्प प्रस्थापित करता येतात त्यातूनच सिद्धान्त जन्माला येतात.

शरदरावांच्या मातोश्री श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार या पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या. 1950-54 च्या सुमारास त्या स्वतः कार चालवित बारामतीहून पुण्याला मिटींगला येत. स्त्रीयांना राज्यशासनात स्वतंत्र अधिकार मिळाल्याची खूण शरदरावांना त्यांच्या आईमुळे मिळाली. हे ध्येय शरदरावांनी बाळगले आणि त्याप्रमाणे तसे केले. महिलांना आरंभी 33 टक्के आरक्षणाची मागणी त्यांनी केली आणि त्याची अंमलबजावणी करून तेच आरक्षण त्यांच्याच आग्रहामुळे आता 50 टक्क्यांपर्यंत गेले आहे. विधानसभा आणि लोकसभेतही हे 50 टक्के आरक्षण दिले पाहिजे आणि महिला विधेयक संसदेत संमत झालेच पाहिजे यासाठी त्यांनी सातत्याने आग्रह धरलेला आहे. हे त्यांच्या पुरोगामीत्वाचे सुचिन्ह म्हणायला पाहिजे. स्त्रीयांच्या व्यक्तित्वाला दिलेले हे मोकळे अंगण फार महत्त्वाचे आहे.

शरदराव संरक्षणमंत्री असताना त्यांनी संरक्षणदलात प्रथमतः महिलांचा समावेश केला. ही घटना भारतीय इतिहास कधीही विसरणार नाही. तोपर्यंत महिलांना संरक्षण दल बंद होते. महिला सैनिक, विमानाच्या पायलट, जहाजावरच्या कप्तान होऊच शकत नाही असा एक ग्रह वर्षानुवर्षे चालत आलेला होता. शरदरावांनी या ग्रहाला तडा दिला. त्यांनी आग्रहाने सांगितले महिलांमध्ये पृथ्वीएवढी क्षमता आहे. त्या आपले सामर्थ्य महाकाली होऊन दाखवू शकतात. पराक्रमाला सौंदर्याची जोड असली तर पुढली पिढी सुंदर होते. हे भान कायम ठेवून महिलांमधील क्षमता त्यांनी अचूक ओळखली. सौंदर्य हे

दिसण्यापेक्षा पराक्रमावर असते हे त्यांनी भारतीय मनात रुजविले. अर्थातच यालाही विरोध झाला. संरक्षण दलातील बुजुर्गांनी याबाबतीत शरदरावांना खूप समजाविले पण शरदरावांच्या मनाचा निश्चय ठाम होता. तो त्यांनी पुरा केला. याबाबतीत कोणाचेही ऐकण्यापेक्षा त्यांनी स्त्री शक्तीला नवे आवाहन केले. 'वंदे मातरम्'ची सार्थ जाणीव दिली. यातून स्त्री व्यक्तित्वाला नवा हुंकार आला. संरक्षणदलातील अत्यंत महत्त्वाच्या जागा आज स्त्रिया भूषवित आहेत. त्याच स्त्रिया आकाशात मुक्तमनाने संचार करीत आहेत. हे स्वप्न शरदरावांमुळे पूर्ण झाले. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी दाखविलेली क्षमता नक्कीच स्मरणीय आहे. म्हणूनच कल्पना चावला अंतरिक्षाला आव्हान देऊ शकली. मदर तेरेसाने शांतीचे क्षेत्र निर्माण केले. साधनाताई आमट्यांनी महारोग्यांच्या जखमातला अंधार काढून त्यांना नवा उजेड दिला. भारतीताई आमट्यांनी आनंदवनात महारोगी स्त्रियांसाठीचा सुंदर प्रकल्प राबविला. भामरागडसारख्या आदिवासी परिसरात डॉ. मंदाताई आमट्यांनी जे काही विज्ञानाचे नवे भान दिले ते मॅगेसेस पारितोषिकापर्यंत गेले. नीलिमा मिश्रा या स्त्रीने कामगार स्त्रियांना साध्या साध्या म्हणजे अगदी गोधड्या शिवण्याच्या कामातून जो कर्तृत्वाचा नवा श्वास दिला त्यातून त्या आकाशाच्या स्वामिनी झाल्या. एखादा विचार किंवा एखादी घटना पुढे किती मोठे रूप धारण करू शकते ते यातून आपल्याला अनुभवायला मिळते. ही दृष्टी शरदरावांपाशी आहे. ती त्यांनी जपली आहे.

शरदरावांची सामाजिक बांधीलकी विलक्षण आहे. ती नजरेत भरणारी आहे. त्यांनी सर्वांना आपले मानले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरात त्यांची सक्रिय भूमिका मोलाची ठरली. त्यासाठी त्यांना महाराष्ट्राची सत्ता गमवावी लागली. पण ते त्यांनी सोसले. त्यांनी माणसाचा विचार केला. त्यासाठी जातीभेदाला त्यांनी मूठमाती दिली. कोणताही माणूस सर्वार्थाने पुढे गेला पाहिजे. त्याला समान संधी मिळाली पाहिजे. त्यांनी संधीचे सोनेही केले पाहिजे. ही जाणीव शरदरावांनी शेवटपर्यंत ठेवली आहे याचे प्रत्यंतर आजही येते. त्या त्या क्षेत्रातील सर्वांना ते मानाचे स्थान देतात. जातीभेद, धर्मभेद, वंशभेद त्यांनी कधीही मानला नाही. भारतीय राजकारणाला लागलेली ही कीड आपण कृतीने पुसली पाहिजे असा जाणीवपूर्वक निर्धार करून त्या दिशेने ते पावले टाकत गेले. सामाजिक सुधारकांचा त्रास त्यांच्याही वाट्याला आला. त्यांनी तो सोसला, त्याबद्दलचे सर्व वाद प्रवाद त्यांनी झेलले, परंतु त्यांचे ध्येय पक्के होते. कारण त्यांच्यासमोर यशवंतरावांनी याचप्रकारे सोसलेले घाव त्यांना जाणविले.

थोडक्यात असे म्हणता येईल जे गुरूने सोसले तेच शिष्यानेही सोसले. परंतु याबाबतीत त्यांनी कधीही स्वतःशी प्रतारणा व तडजोड केली नाही. समान विकासात त्यांनी नेहमी अग्रदूताची भूमिका घेतली. त्यामुळे विविध पक्षातल्या अनेक

**यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार. गुरू-शिष्याच्या या जोडीने आजचा महाराष्ट्र समृद्ध केला.**



तरुणांना त्यांनी संधी दिल्या. परिणामी राजकारणात नवनवे चेहरे आले. विविध क्षेत्रातील व्यक्तित्वांना साहेबांनी एकत्र आणले, त्यांच्या स्वभावात एक होते, जे पटले ते त्यांनी केले. जे रुचले ते त्यांनी प्रमाण मानले. यासाठी त्यांनी त्याची स्वतंत्र रणनीतीही तयार केलेली आहे. वेळोवेळी त्याचा ते उपयोगही करतात. त्यांची आक्रमकता ही वैचारिक सभ्यतेतून व्यक्त होते. शरदरावांना नेमके कसे बोलावे याचे भान आहे. वैयक्तिक दोषांवर ते नेमके बोट ठेवतात. परंतु ते कधीही नैसर्गिक व्यंगावर बोलत नाहीत. माणसाचा विरोध त्याच्या कामाच्या विसंगतीतून यावा, पण कामाच्या सुसंगतीचेही रसग्रहण खुल्या दिलाने केले पाहिजे ही शरदवृत्ती देशोदेशींच्या भेटीतूनही व्यक्त झालेली आहे. त्यांनी जग पाहिले आहे, त्यांच्या दृष्टीत त्या त्या राष्ट्रातले जे जे उत्तम व उपयुक्त आहे ते त्यांनी अभ्यासिले. आपल्या देशात त्याचा वापर केला. बघणे म्हणजे नुसते पाहणे नव्हे. बघण्याला चिंतनाची डुब जेव्हा मिळते तेव्हा अशी दृष्टी येते. राष्ट्रीय विकासाच्या दराबद्दल आम्ही दरवर्षी नित्यनेमाने आरोळ्या ठोकतो. कुठल्या देशाचा विकासदर किती वाढला याच्याही गप्पा मारतो. लोकसभेत भरभरून आकडे देऊन बौद्धिक चमकही दाखवितो. पण ती तात्पुरती असते. राष्ट्रीय उत्पन्नासाठी नेमके काय करायला पाहिजे याची श्वेतपत्रिका शरदरावांनी काढली. शेतीच्या राष्ट्रीय उत्पन्नातला हिस्सा किमान चार टक्के असलाच पाहिजे हा हट्ट त्यांनी केला आणि तो त्यांनीच सफलही केला. इतकेच नव्हे तर त्यासाठीची मार्गक्रमणा त्यांनीच सुकर केली. म्हणून जागतिक अन्न व कृषी संघटनेचे (एफएओ) महासंचालक दासिल्वा ग्रासीओ यांनी स्वतःचा प्रतिनिधी पुष्पगुच्छासह बैठकीत पाठवून शरदरावांचे विशेष कौतुक केले.


१९७८ मध्ये शरद पवार सर्वप्रथम महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी मंत्रालयात एसी नव्हता. टेबल फॅनवर काम चालत असे.


पु. ल. देशपांडे यांच्या समवेत शरद पवार

आज शरदराव सहस्रचंद्र दर्शनाच्या पूर्वसंध्या वर्षात म्हणजे ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. ते सतत आपल्या कामात व्यग्र आहेत. त्यांचे मन आजही अभ्यासशील आहे. कोणाच्यापाशी कसे मार्गदर्शन मिळेल याचाही ते चांगला विचार करू शकतात. आजही त्यांची दिनचर्या टवटवीत आहे. त्यांना कधीही हताश बसलेले पाहिले नाही. ते सतत मार्गक्रमणा करण्यात गुंतलेले आहेत. वाढदिवसाचे मर्म त्यांनी त्यांच्या कृतीतून व उक्तीतून दाखवून दिलेले आहे. मिळालेल्या दिवसात आणखीन नवीन काय करायचे याचा ब्ल्यू प्रिंट त्यांच्या अंतरंगात




तयार असतो. त्यांचे मन ओळखणे फार कठीण आहे. चांदण्यांचा ठाव कधीच लागत नाही. त्याला धरू म्हटल्यानं ते धरताही येत नाही आणि आकाशातील चांदण्यांचे मोजमापही करता येत नाही. परंतु ते मनाला निवांत करते. तसे शरदरावांच्या मनात काय चाललेले आहे हे कळण्यापेक्षा त्यांच्या कृतीत त्यांचे मन व्यक्त झालेले जाणवते. तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमशील आहे. सर्वांना सांभाळून घेणारे आहे. परंतु एखादा जर घसरला तर त्याला त्याची नेमकी जागा दाखविणारे आहे. अभ्यास शिबिरातील त्यांची मार्गदर्शने याची साक्ष आहे.

सातारच्या सभेत भिजत भर पावसात केलेले भाषण असो, साहित्य संमेलनातील त्यांचे उद्‌घाटनाचे भाषण असो किंवा उद्योजकांच्या परिषदेतील त्यांचे चिंतन असो किंवा शास्त्रज्ञांशी त्यांचा संवाद असो, इतकेच काय पण कर्मवीर भाऊराव पाटलांच्या समाधीपाशी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलामांचा आणि त्यांचा झालेला संवाद म्हणजे दोन विशाल मनांचा महोत्सव होता. डॉ. कलामांनी त्यांना 'माझे साहेब' म्हणावे हे मनाच्या मोठेपणा पलीकडचे मोठेपण आहे. ही दोन्हीही शिखरे आहेत. आपली उंची कमी पडते इतकेच. त्यांना बघणे, पाहणे आणि अनुभवणे हे खरोखर लक्षणीय आहे. शरदरावांच्या विविध थरातल्या नुसत्या ओळखींची यादी जरी केली तरी थक्क व्हायला होते. त्या त्या भेटीत त्यांना ते ते सारेही आठवते. त्यांना भेटलेला माणूस कधीही विस्मरणात जात नाही. त्याचे सारे संदर्भ त्यांच्या मनाच्या संगणकात तयार असतात. त्यांचे स्वतःचे इंटरनेट नवे जग निर्माण करणारे आहे. आजही त्यांचे वाचन चौफेर आहे.




जिथे नवे असेल तिथे ते मैत्र करतात आणि आपल्या मैत्रीत ज्याने वाईट केले असेल त्याचे ते नाव परत कधीही घेत नाहीत. याचा अर्थ कामाचे आणि वर्तनाचे मूल्य ते मानतात. चारित्र्यशीलता ते जपतात. आदरातिथ्यात ते पुढेच असतात. डोळस श्रद्धा हे त्यांच्या जगण्याचे अधिष्ठान आहे. म्हणूनच शेगावच्या गजानन महाराज संस्थानचे प्रमुख शिवशंकरभाऊ पाटील व त्यांच्या पत्नी उमाबाई यांना त्यांनी बारामतीच्या घरी गोविंद बागेत जेवायला बोलावून भारतीय परंपरेप्रमाणे त्यांचा सत्कार केला. ही सत्वस्थ जाणीव आस्तिक नास्तिकतेच्या पलीकडची आहे. शरदरावांच्या सक्रिय चिंतनाचा हा भाग आहे. निमित्त वाढदिवसाचे आहे. शरदरावांच्या पैलूंवर आणखीही लिहिता येईल, विस्तार भयास्तव इतकेच ठीक आहे. शरदरावांच्या कार्यकर्तृत्वाला नमस्कार करून एवढेच म्हणतो... **'जीवेम शरदः शतम्.'**



# राजकारणाचे बदलते वारे?

आकाश
नवी दिल्ली



महाराष्ट्रातील निकालांनंतर दिल्लीच्या राजकीय वर्तुळात महाराष्ट्राने भाजप व त्याहीपेक्षा मोदी-शहा जोडगोळीच्या बेबंद घोडदौडीला लगाम झाल्याबद्दलची समाधानाची भावना व्यक्त झाली. यानंतर लगेचच संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये आले तेव्हा सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्यांना आवर्जुन भेटून अभिनंदन केले. भाजपचे साथादीर असलेले पक्ष अकाली दल, अपना दल, संयुक्त जनता दल तसेच आम आदमी पार्टी, डावे पक्ष अशा सर्वांनी पवारांना त्यांच्या कामगिरीबद्दल शुभेच्छा दिल्या. सगळ्यांच्या तोंडात एकच वाक्य प्रथम येत होते, 'साब, बहुत अच्छा हुआ!' काही भाजपच्या खासदारांनी देखील गुपचूपपणे पवारांना शुभेच्छा दिल्या आणि पत्रकारांसोबत बोलताना, भाजपच्या नेतृत्वाने विनम्रता स्वीकारण्याची आवश्यकता बोलून दाखवली.




महाराष्ट्रातल्या राजकीय उलथापालथींचा सारांश काय? दिल्लीतल्या राजकीय वर्तुळात या प्रश्नाची चांगलीच चर्चा चालू आहे आणि राजकीय पंडित त्यांच्या परीने या घडामोडींचा अन्वयार्थ लावत आहेत. काही अनुमाने मात्र निश्चितपणे काढता येऊ शकतात. भाजप - साधनसामग्रीने केवळ समृध्द नव्हे तर ओतप्रेत असलेला सत्तापक्ष - आणि या पक्षाचे दोन प्रमुख नेते यांच्या 'अभेद्यते'बद्दल कथा-कहाण्या तयार होऊ लागल्या होत्या. मुख्य नेते उर्फ विश्वगुरू - ब्रह्मांड नायक उर्फ प्रधानमंत्री यांची तर दंतकथा किंवा मिथक तयार करण्याचे प्रयत्न सुरु



झाले असताना महाराष्ट्राने त्या प्रयत्नात खीळ घातली. भारतीय राजकीय पटलावर सध्या जी जोडी वर्चस्व गाजवत असल्याचे चित्र आहे त्याचे रंग महाराष्ट्राने फिसकटवून टाकले. देशाला 'विरोधी पक्ष-मुक्त' करण्याचे एकाधिकारवादी स्वप्न महाराष्ट्राने भंगवले. भारत हा लोकशाही देश आहे. या देशाने पूर्वी एकाधिकारशाहीचा झालेला प्रयत्न उधळून लावला होता. पुन्हा कुणी तो प्रयत्न करीत असतील तर तो खपविला जाणारनाही हे महाराष्ट्राने दाखवून दिले.

महाराष्ट्रातील घडामोडींचे असंख्य आणि विविध पैलू आहेत. महाराष्ट्रातील सरकार - सत्ता - हातची जाऊ नये यासाठी भाजप आणि भाजपची सर्वोच्च नेतृत्व-जोडी एवढे टोकाला जाण्याचे कारण काय? कोणत्याही परिस्थितीत



आपलेच सरकार यावे यासाठी जिवाचा आटापिटा का? कारण स्पष्ट होते. देशाच्या राजकीय आणि राष्ट्रीय राजधानीत सत्ता स्थापन केल्यानंतर देशाची 'आर्थिक राजधानी' असलेली 'मुंबई' सहजासहजी हातची सोडण्यास ते तयार कसे होतील? परंतु मुंबई हातची सोडायची नाही आणि त्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत देखील कोणती तडजोड करायची नाही अशी टोकाची भूमिका भाजप नेतृत्वाने घेतली. परिणामी शिवसेनेला दिलेल्या शब्दाशी प्रतारणा करण्यात आली. त्यातून तीस वर्षांच्या मित्रपक्षापासून फारकत घेणेही भाजपने पसंत केले. एवढेच नव्हे तर अल्पजीवि सरकार स्थापनेचा एक आततायी प्रयत्नही भाजपतर्फे करण्यात आला. तोही असफल झाल्यानंतर पक्षाने काहीकाळ माघार घेण्याचे ठरविल्याचे दिसते. परंतु भाजप नेतृत्वाला महाराष्ट्राचा घाव - आघात जिव्हारी लागलेला आहे. महाराष्ट्रातही कर्नाटकाची पुनरावृत्ती करण्याचे मनसुबे आता



आखले जात आहेत. कर्नाटकातही निवडणुकीनंतर भाजपने येद्युरप्पा यांच्या नेतृत्वाखाली सरकारस्थापनेचा असफल प्रयत्न केला होता व त्यानंतर काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दलाचे संयुक्त सरकार स्थापन झाले. परंतु धनशक्ती, ब्लॅकमेल यांच्या बळावर भाजपने फोडाफोडी सुरु केली. ते सरकार पाडले आणि आता पुन्हा भाजपने तेथे सत्ता प्राप्त केली आहे. बहुधा कर्नाटकाच्या प्रयोगाच्या पुनरावृत्तीचे स्वप्न भाजपचे नेते पहात असावेत. त्यामुळेच 'महाआघाडी'चे सरकार स्थापन झालेले असले तरी ते यशस्वीपणे चालविण्याचे आव्हान असेल आणि दुखावलेल्या



भाजपकडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांना ते तोंड कसे देईल आणि त्या हल्ल्यांपासून स्वतःला सुरक्षित कसे ठेवेल यावरच त्याच्या अस्तित्वाचा कालावधी किती? हे ठरेल!

महाराष्ट्र हे कोणते लहानसहान राज्य नाही. देशातले सर्वात प्रगतीशील व समृध्द राज्य म्हणून ते गणले जाते. महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्वाचे राज्य मानले जाते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच पण राज्याचीही राजधानी आहे हे विसरुन चालणार नाही. लोकसभेत उत्तर प्रदेशाखालोखाल महाराष्ट्रातून लोकप्रतिनिधी निवडले जातात. उत्तर प्रदेशातून 80 तर महाराष्ट्रातून त्या खालोखाल म्हणजे



48 प्रतिनिधी लोकसभेवर निवडले जातात. उत्तर प्रदेशावर तर भाजपची पूर्ण पकड आहेच. महाराष्ट्रावरील पकड मात्र त्यांच्या हातून सुटली आहे. महाराष्ट्राचे देशाच्या एकंदर व्यवस्थेत असलेले स्थान लक्षात घेतल्यास या राज्यातील घडामोडींचे पडसाद सर्वदूर पडत आहेत. महाराष्ट्रात भाजपच्या वारूला लगाम बसल्यानंतर दिल्लीत झालेली प्रतिक्रिया लक्षणीय होती. त्याची काही मोजकी उदाहरणे दिली तर त्याची कल्पना येईल. महाराष्ट्रातील निकालांनंतर दिल्लीच्या राजकीय वर्तुळात महाराष्ट्राने भाजप व त्याहीपेक्षा मोदी-शहा जोडगोळीच्या बेबंद घोडदौडीला लगाम झाल्याबद्दलची समाधानाची भावना व्यक्त झाली. यानंतर लगेचच संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये आले तेव्हा सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्यांना आवर्जुन भेटून अभिनंदन केले. भाजपचे साथादीर असलेले पक्ष अकाली दल, अपना दल, संयुक्त जनता दल तसेच आम आदमी पार्टी, डावे पक्ष अशा सर्वांनी पवारांना



मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी उध्दव ठाकरे यांनी व्यासपीठावरुन माथा टेकवून जनतेला साष्टांग नमस्कार केला.



त्यांच्या कामगिरीबद्दल शुभेच्छा दिल्या.

सगळ्यांच्या तोंडात एकच वाक्य प्रथम येत होते, 'साब, बहुत अच्छा हुआ!' काही भाजपच्या खासदारांनी देखील गुपचूपपणे पवारांना शुभेच्छा दिल्या आणि पत्रकारांसोबत बोलताना, भाजपच्या नेतृत्वाने विनम्रता स्वीकारण्याची आवश्यकता बोलून दाखवली. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश अशा विविध ठिकाणच्या भाजप खासदारांना देखील महाराष्ट्रात या जोडीला मिळालेल्या दणक्याबद्दल काहीसे अंतःस्थ समाधान लाभले होते आणि ते केवळ खासगीतच बोलून दाखविण्याची हिंमत ते करीत होते.

महाराष्ट्रातील घडामोडींचा एक मानसशास्त्रीय परिणाम सार्वत्रिक आढळून येतो. वर उल्लेख केल्याप्रमाणे मोदी-शहा जोडीच्या दहशतीच्या फुग्याला महाराष्ट्राने टाचणी लावली आणि त्यामुळेच आता खासदार असतील किंवा अन्य कुणी म्हणजे भाजपचे मित्रपक्ष असतील त्यांना या महा-घडामोडींनी काहीसा आधार व धैर्य - हिंमत दिली. महा-घडामोडींनंतर अकाली दलाचे खासदार व प्रवक्ते नरेश गुजराल यांनी भाजपकडून मित्रपक्षांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा प्रश्न उपस्थित करतानाच



मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर छगन भुजबळ यांनी शरद पवार यांच्याजवळ येऊन त्यांना अभिवादन केले.


मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर जयंत पाटील हे शरद पवार यांना नमस्कार करताना.

भाजप नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी काही गोष्टींची पूर्तता होण्याची गरज असल्याचे सांगितले आणि आघाडीसाठी संयोजक देखील नेमण्यात आला नसल्याकडे लक्ष वेधले.

मित्रपक्षांना 'गृहीत' धरण्याची बाब फारशी उचित नसल्याची टिप्पणीही त्यांनी केली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखे दिग्गज नेते आघाडीचे संयोजक म्हणून काम पहात होते परंतु भाजपला स्वतःचे बहुमत मिळाल्यापासून त्यांनी आघाडीधर्माच्या पालनाकडे दुर्लक्ष केल्याचे ते म्हणाले. सारांशाने सांगायचे झाल्यास महा-घडामोडींमुळे भाजपच्या दुर्लक्षित घटकपक्षांना किंवा मित्रपक्षांना बळ मिळाले आहे. त्यांना एकप्रकारे आवाज मिळाला आहे. आता या त्यांना मिळालेल्या नव्या धैर्यामुळे मोदी-शहा जोडीला त्यांच्या आचरणात बदल करावा लागेल हे निश्चित.

महा-घडामोडींच्या परिणामांची ही चर्चा आहे. महाराष्ट्रासारखे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य भाजपच्या हातातून निसटले आहे. परंतु आता भारताच्या नकाशावर नजर टाकल्यास भाजप-शासित राज्यांची संख्या घटताना दिसू



लागली आहे. एकावेळी देशातल्या 22 राज्यांमध्ये भाजपची सरकारे सत्तारूढ होती. परंतु आता ती स्थिती राहिलेली नाही. उत्तर भारताचा विचार करायचा झाल्यास उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश व हरयाना येथे भाजपची सरकारे आहेत. यापैकी बिहार आणि हरयाना येथे संयुक्त सरकारे आहेत आणि तेथील स्थानिक प्रादेशिक पक्षाच्या पाठिंब्यावरच भाजपची सरकारे पूर्णपणे परावलंबी आहेत. पश्चिम भारताचा विचार करता गुजरातमध्ये भाजपचे स्वतःचे सरकार आहे व गोव्यात भाजपच्या नेतृत्वाखालचे एक अपंग, अधू सरकार आहे. दक्षिणद्वार कर्नाटकात भाजपचे सरकार कसेबसे तग धरुन आहे.

बी.एस.येद्युरप्पा यांच्यावर या सरकारची मदार आहे. काँग्रेस व जनता दलातून आलेल्या फुटीर आमदारांच्या जागांवर पोटनिवडणुका आता होत आहेत. या भाजपतर्फे निवडणूक लढविणाऱ्या फुटीर आमदारांना विजय मिळाल्यास ठीक अन्यथा कर्नाटक सरकारचे भविष्यही फारसे उज्ज्वल दिसत नाही. त्यात चर्चा अशी आहे की या तेरा पोटनिवडणुकांमध्ये सर्व जागी भाजपला विजय मिळाल्यास विधानसभेतील भाजपची स्थिती मजबूत होणार आहे. मग त्या परिस्थितीत मोदी व शहा हे येद्युरप्पा यांना बदलण्याची शक्यता आहे. येद्युरप्पांना या कटाची कुणकूण लागल्याचे समजते कारण आता म्हणे येद्युरप्पा या सर्व जागा जिंकण्यासाठी फारसे



उत्सुक नाहीत. कारण त्यांना त्यांची गादी जाण्याची भीती वाटते आहे. त्यामुळे कर्नाटकातले सरकार देखील कसेबसेच चालू आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. भाजपने येद्युरप्पांना दुखावल्यास ते बंड करण्याची शक्यता आहे. पूर्वीही त्यांनी एकदा बंड करुन भाजपला खड्ड्यात घातले होते. त्यामुळे मोदी-शहा जोडीला त्यांच्याशी सावधानतेनेच व्यवहार करावा लागणार आहे. थोडक्यात कर्नाटकात भाजपचे सरकार असले तरी ते नावापुरतेच आहे आणि कुडमुड्या अवस्थेत आहे. तमीळनाडूत भाजपच्या प्राणवायूवर तग धरुन असलेले अण्णा द्रमुकचे सरकार आहे. याखेरीज ईशान्य भारतात आसामसह अरुणाचल, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा या राज्यात भाजपची सरकारे आहेत. आसाम



आणि त्रिपुरा येथे भाजपची स्वबळाची सरकारे आहेत परंतु अन्यत्र तेथील स्थानिक पक्षांबरोबर हातमिळवणी करुन स्थापन सरकारे आहेत. ईशान्य भारताचा इतिहास पाहता केंद्र सरकारमध्ये ज्या पक्षाचे सरकार असते त्यांच्याबरोबर येथील स्थानिक प्रादेशिक पक्ष हातमिळवणी करतात. त्यामुळे ज्यादिवशी दिल्लीतील राजकीय वाऱ्यांची दिशा बदलेल त्याक्षणी येथील भाजपची सरकारेही त्या वाऱ्यांपुढे टिकणार नाहीत.

झारखंडमध्ये तेथील स्थानिक पक्ष अखिल झारखंड विद्यार्थी संघटना या पक्षाबरोबर भाजपने हातमिळवणी करुन सरकार स्थापन केले होते. आता येत्या काही दिवसातच झारखंडमध्ये निवडणूक होत आहे आणि भाजपची स्थानिक आघाडी संपुष्टात आली असून आता भाजप स्वबळावर तेथे निवडणूक लढवीत आहे. त्याचे भवितव्य येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल. ओडीशा, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात भाजपच्या कृपेवर आणि धाकदपटशावर चालणारी प्रादेशिक पक्षांची सरकारे आहेत. ओडीशात बिजु जनता दलाने उघडपणे भाजपची पाठराखण करण्याची भूमिका घेतलेली आहे आणि तीच स्थिती तेलंगणात आहे. आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी हे असंख्य आर्थिक गैरव्यवहारात अडकलेले आहेत. त्यामुळे मोदी-शहांच्या धाकात ते राहणे स्वाभाविक आहे. म्हणजेच आता बावीसवरुन भाजपची राज्ये 14 पर्यंत खाली घसरली आहेत.

पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ या राज्यात काँग्रेसची पूर्ण बहुमताची सरकारे सत्तेत आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आहेत तर केरळमध्ये मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखाली डाव्या आघाडीचे सरकार आहे. या मालिकेत आता महाराष्ट्राचाही समावेश होत आहे. नरेंद्र मोदी यांनी 2013पासून व 2014 मध्ये विजय मिळाल्यानंतरही सातत्याने 'काँग्रेसमुक्त' भारतासाठी मतदारांना आवाहन केलेले होते. उदारमतवादी मंडळींनी त्यांचे हे आवाहन एकाधिकारवादी मनोवृत्तीचे द्योतक असल्याचे म्हणून त्यावर टीका केली होती. परंतु विजयाच्या धुंदीत असलेल्या मोदींनी त्याची दखल घेतली नाही. त्यानंतरच भाजपला राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगढमध्ये पराभव स्वीकारावा लागला होता व तेथे काँग्रेसची सरकारे स्थापन झाली. त्यांचे सहकारी अमित शहा यांनी एक पाऊल पुढे जाऊन 'विरोधी पक्ष - मुक्त' भारताचा पुरस्कार केला. या दोन्ही नेत्यांच्या या संकल्पनांना भाजपची पालकसंस्था रा.स्व.संघाने देखील विरोध केला होता आणि ही भूमिका लोकशाही संकेतांना धरुन नसल्याचे म्हटले होते. परंतु विजयाची नशा काही और असते. महाराष्ट्रात तर विरोधी पक्षांना संपविण्यासाठी वाटेल त्या मार्गाने काँग्रेस व



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांना 'टार्गेट' करण्यात आले होते. किती गेले किती परतले याचा हिशोब मांडण्याची ही जागा नाही परंतु या आसुरी संकल्पनेची परिणिती कशात होते याचा आरसा महाराष्ट्राने दाखविला. भाजपवर विरोधात बसण्याची पाळी आलीच परंतु गेली तीस वर्षे जो पक्ष निष्ठेने भाजपबरोबर राहिला त्या पक्षालाच भाजपने धोका दिला. परंतु त्याचबरोबर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने परिस्थितीचे महत्व, प्रासंगिकता जाणून शिवसेनेला सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. शिवसेना व या दोन्ही पक्षांमध्ये वैचारिक भिन्नता आहे.

परंतु भिन्नतेचे मुद्दे बाजुला ठेवून राज्यापुढील गंभीर समस्यांच्या सोडवणुकीसाठी किमान समान कार्यक्रमाच्या आधारे एकत्र येण्याचा निर्णय केला. ही केवळ राजकीय 'ॲडजस्टमेंट' नाही. किंवा राजकीय तडजोडही नाही.

अभेद्य मानल्या जाणाऱ्या भाजपच्या आघाडीतला शिवसेना हा सर्वात जुना घटक पक्ष फुटणे याचा अर्थ वेगळा आहे. याचे राजकीय तरंग व्यापक आणि दूरगामी होणार आहेत. त्याची चुणूक झारखंडमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने दिसली आहे. तेथे गेली पाच वर्षे भाजप आणि अखिल झारखंड विद्यार्थी संघटनेची युति तुटली आहे. बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल आणि नीतीशकुमार यांची युति भाजपने यशस्वीपणे तोडली होती. त्याची परतफेड महाराष्ट्रात झाली असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. भाजपच्या धाकाला, दहशतीला न घाबरता एखादा घटक पक्ष भाजपशी फारकत घेऊ शकतो हे महाराष्ट्राने, शिवसेनेने जसे दाखवून दिले त्याचप्रमाणे राजकीय लवचिकता काय असते हे देखील राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाने दाखवून दिले. संसदीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष ही देखील एक प्रमुख लोकशाही संस्था असते. भाजपने विरोधी पक्ष ही संस्था मोडण्यासाठी कंबर कसली होती. परंतु त्यात भाजपच्या सत्तांध नेतृत्वाचेच कंबरडे मोडताना आढळून आले. त्यावर महाराष्ट्राने शिक्कामोर्तब केले.

या नव्या राजकीय 'महा-समीकरणामुळे' लोकसभा व राज्यसभेतील चित्र देखील बदलणार आहे. लोकसभेत शिवसेनेचे 18 खासदार विरोधात गेल्याने विरोधी पक्षांच्या बळात वाढ झालेली आहे. राज्यसभेत तूर्तास शिवसेनेचे तीनच खासदार असले तरी पुढील वर्षी एप्रिल महिन्यात होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीत भाजपला दोनच जागांवर समाधान मानावे लागण्याची चिन्हे आहे. थोडक्यात किंवा सारांशाने सांगायचे झाल्यास या 'महा घडामोडी', हे नवे 'महा समीकरण' भारतीय राजकारणाला एक नवे, निर्णायक 'महा-वळण' देऊ शकते काय याची प्रतीक्षा करावी लागेल. कारण या 'महा-आघाडी'चे शिल्पकार, रणनीतीकार आणि नियंत्रक शरद पवार यांच्याकडे देशातील विरोधी पक्ष नव्या आशेने पहात आहेत. भाजपचा भरधाव घोडा महाराष्ट्रात अडवला जाऊ शकत असेल तर त्याचा राष्ट्रीय पातळीवरील प्रयोगही होऊ शकतो आणि मग त्यासाठी पवार ती जबाबदारी घेतील काय अशी चर्चा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. येणारा काळच त्याचे उत्तर देईल! तोपर्यंत प्रतीक्षा!



# एन.डीं.चे आयुष्य लोकांच्या सेवेसाठी

**यशवंतराव चव्हाण यांची ३५ वी पुण्यतिथी २५ नोव्हेंबर रोजी कऱ्हाड येतील सद्गुरु गाडगेबाबा महाविद्यालयात साजरी करण्यात आली. त्यावेळी शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रा. एन.डी.पाटील यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच राम खांडेकर यांनी लिहिलेल्या 'सत्तेच्या पडछायेत' या पुस्तकाचे प्रकाशनही श्री. शरद पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी केलेले हे भाषण.**



आजचा दिवस हा चव्हाणसाहेबांचे स्मरण करण्याबद्दलचा आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सातारा जिल्ह्याचे योगदान हे आगळेवेगळे आहे. त्यांचा उल्लेख आपण ज्यावेळी करतो, त्यावेळी त्यामध्ये प्रकर्षाने आपण चव्हाणसाहेबांचा उल्लेख करतो. त्यामुळे त्यांच्याबद्दलची एक कृतज्ञतेची भावना आपल्या मनात आहे. स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी कष्ट केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वातंत्र्याचा अर्थ लोकांच्या जीवनामध्ये समजावा त्यादृष्टीने प्रशासक म्हणून त्यांनी कामगिरी केली. राज्याचे नेतृत्व केले. देशाच्या अनेक विभागाचे नेतृत्व केले. आणि भारताचा परराष्ट्रमंत्री म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर काम केले. त्यामुळे त्यांच्याबद्दलची एक कृतज्ञतेची भावना आपल्या सगळ्यांच्या मनात आहे.

चव्हाणसाहेब एक चांगले उत्तम वाचक होते. कधी तुम्ही त्यांच्या घरी गेलात तर त्यांचे घर ग्रंथालयात रुपांतर झाले होते.




मला आठवतंय ते गेल्यानंतर त्यांनी काही लोकांवर जबाबदारी टाकलेली होती. त्यांच्या व्यक्तीगत काही गोष्टींची विल्हेवाट लावण्यासाठी. त्यावेळी ती माहिती घेतली असता त्यावेळी एक 70- 80 हजार रुपयांची रक्कम, पत्नीचे तेवढ्याच काही किमतीचे दागिने. याशिवाय आर्थिक म्हणून दुसरी कोणती गोष्ट त्या ठिकाणी नव्हती. फक्त होते, हजारो ग्रंथ. त्यांनी आयुष्यामध्ये जी काही कमाई केली असेल, ती गुंतवणूक फक्त ग्रंथांमध्ये केलेली होती. त्याचे कारण की, त्यांना वाचनासंबंधी आस्था होती.

मला आठवतंय की, एक दिवस मी इंग्लंडला होतो. जिथं जिथे इंग्रजांचे राज्य होते, तिथल्या तिथल्या पार्लमेंटची एक संघटना आहे, तिचे नाव आहे, कॉमनवेल्थ पार्लमेंट. त्यांची एक शाखा महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभासद त्याचे सदस्य असतात. आणि त्यांना ब्रिटीशांच्या पार्लमेंटमध्ये जाण्याची संधी मिळते. आणि मी



लंडनमध्ये असताना सहजच ब्रिटीश पार्लमेंटचे काम पाहण्याला तिथे गेलो आणि ते संपल्यानंतर पार्लमेंटमध्ये एक बैठकीची जागा असते. चहापान, गप्पा गोष्टी होतात. त्या सभागृहामध्ये जाऊन बसलो. आणि मला आठवतंय की, एका कोपऱ्यामध्ये एक गृहस्थ वाचत होते. मला वाटलं की, त्या गृहस्थांना मी कुठे तरी पाहिले आहे. म्हणून मी एकाला विचारले, तर ते म्हणाले की, ते ब्रिटनचे माजी पंतप्रधान आहेत. आणि त्यांचे नाव सांगितले. तर मी विचारले की, हे इथं कसे आहेत. तर ते म्हणाले की, ते या ग्रंथालयाचा पुरेपूर लाभ घेतात. प्रधानमंत्रीपद गेल्यानंतर त्यांचा जास्तीत जास्त वेळ इथं वाचण्यात जातो. मी माझ्या जागेवरून उठलो. त्यांना नमस्कार केला आणि त्यांना सांगितले की, मी भारतातून आलेलो आहे. त्यांनी मला विचारले की, भारतातून कुठून. मी त्यांना सांगितले की, मी मुंबईतून आलेलो आहे. तर त्यांनी विचारले की, माझे मित्र चव्हाण कसे आहेत. मलाही आश्चर्य वाटले. त्यांना सांगितले की, असं असं झाले आहे. तर त्यांनी सांगितले की, ते दोघेही परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री म्हणून ज्यावेळी युनायटेड नेशनमध्ये जायला मिळतं, मीही कधी काळी गेलो होतो, पण परराष्ट्रमंत्री म्हणून नाही, तर भारताचा प्रतिनिधी म्हणून. त्या ठिकाणी एखाद्या देशासंबंधी चर्चा सुरू असेल, आणि त्या देशाच्या प्रश्नासंबंधी रस तुम्हाला नसेल, तर सगळे लोक त्या चर्चेला थांबतातच असे नाही. तर ते ब्रिटनचे माजी पंतप्रधान सांगत होते की, आम्ही दोघे ज्यावेळी परराष्ट्रमंत्री म्हणून तिथे जात होतो, आणि आम्हाला मोकळा वेळ मिळाल्यानंतर दिवस कसा काढायचा त्याची चिंता असायची, त्यावेळी एक गृहस्थ मला भेटायचे ते भारताचे परराष्ट्रमंत्री वाय. बी. चव्हाण. की, जे जगात कुठेही प्रकाशित झालेल्या अलिकडच्या काळातील पुस्तकावर चर्चा करायची तर ते यशवंतराव चव्हाण. हे मला त्यांच्याकडून समजले.

चव्हाणसाहेब हे ग्रंथप्रेमी होते. वाचक होते. राम खांडेकरांनी आता सांगितले की, ते एक उत्तम प्रशासक होते. साहित्यिक होते आणि जीवनाच्या वेगवेगळ्या गोष्टीत योगदान देण्यामध्ये कर्तृत्व



मा. शरद पवार हे मानपत्र आणि पुरस्काराचा दोन लाख रुपयांचा धनादेश प्रा. एन.डी.पाटील यांना प्रदान करताना.

त्यांनी दिले. आणि खांडेकर भाग्यवान आहेत की, त्यांना त्यांच्या संबंधी काम करण्याची संधी मिळाली. खांडेकरांचे अजून एक वैशिष्ट्य आहे की त्यांना नरसिंहराव यांच्यासोबतही काम करण्याची संधी मिळाली. नरसिंह रावांच्या मंत्रीमंडळात मीही त्यावेळी होतो. काही गमतीच्या गोष्टी असायच्या. पार्लमेंटमध्ये काही कमिट्या असतात. म्हणजे आर्थिक प्रश्नाच्या संबधीची विचार करणारी कमिटी. देशाच्या अंतर्गत प्रश्नाचा चर्चा करणारी आणखी एक कमिटी असायची. ती अत्यंत महत्त्वाची असायची. आणि नरसिंहराव पंतप्रधान असताना त्यांचे एक वैशिष्ट्य होते की, त्यांना आठ भाषा यायच्या. ते फार उत्तम मराठी बोलायचे. उत्तम बंगाली बोलायचे. उत्तम गुजराथी बोलायचे. बाकीच्या त्यांच्या आंध्रातील भाषा बोलायचे. त्यांचा जन्म आंध्रातला. आणि ती जी कमिटी होती, त्याचे अध्यक्ष होते, नरसिंहराव. सभासद गृहमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण. संरक्षणमंत्री म्हणून मी. त्यांच्यामध्ये माधवसिंह सोळंकी म्हणून एक मंत्री होते. ते एकेकाळी विशाल मुंबई म्हणून राज्य होते, त्यावेळी मुंबई व गुजरात एक राज्य होते, त्याच्या विधानसभेचे ते अध्यक्ष होते. गृहसचिव म्हणून माधव गोडबोले होते. आणि त्या बैठकीमध्ये मराठीमध्ये चर्चा व्हायची. आणि त्या ठिकाणी नोट्स घेण्यामध्ये राम खांडेकर हे आणखी एक मराठी असायचे. नरसिंहरावही एक चांगले वाचक होते. त्यांचे वाचनही उत्तम होते. प्रशासक तर होते, या देशाच्या



अर्थकारणामध्ये प्रचंड बदल करण्यासंबंधी काम होते. देशाचा आर्थिक दृष्टीकोन एका वेगळ्या दिशेने नेण्यासंबंधी जे काम झाले, त्यातील खरे योगदान हे नरसिंहराव यांचे आहे. आणि त्यांच्या काळात त्यांचे अर्थमंत्री होते, डा. मनमोहनसिंग. पण, त्यांची नोंद या देशाने खऱ्या अर्थाने कधी घेतली नाही. मला आनंद आहे की, राम खांडेकर यांनी नरसिंहराव यांच्या संबंधीचे अनेक पैलू आपल्या समोर सादर केले आहेत.

आज आपण प्रतिष्ठानच्या वतीने प्रा. एन. डी. पाटील यांचा सन्मान करतोय. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये कार्यवाह म्हणून त्यांनी काम केले. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस



शेजारी मीनाताई जगधने, डॉ. अनिल पाटील, श्रीनिवास पाटील, डॉ. अनिल काकोडकर, सौ. सरोज पाटील आणि अरुण गुजराथी.



म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या दोनही सभागृहामध्ये त्यांनी काम केले. सहकार खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. कुठल्याही गोष्टीमध्ये सखोल अभ्यास करणे, आणि त्याच्यामध्ये जनतेच्या प्रश्नांची मांडणी करण्यासाठी त्याचा उपयोग करणे, त्यासाठी संसदीय व्यासपीठाचा उपयोग करून घेणे, ही कामगिरी एन. डी. पाटील यांनी अखंडपणाने केली. अनेक गोष्टी त्यांच्याबद्दल सांगता येतील. उत्तम वक्ते होते. माझी मोठी अडचणीची परिस्थिती असायची. ते विरोधी पक्षाचे पुढारी आणि मी सत्ताधारी पक्षाचा मंत्री. अनेक प्रश्नांवरती त्यांची दिशा एक असायची आणि आमची दिशा एक असायची. आणि यांची एकदा सुरवात झाली की, ते थांबायचे नाही. त्यांचे उत्तरे देणे हे माझ्यासारख्यालाही जड जायचे. पण, त्यांच्या त्या संबंध मांडणीमध्ये एक भूमिका असायची. शासन म्हणून आपण या गोष्टीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे, या निष्कर्षापर्यंत आम्ही लोकं पोचायचो. हे काम त्यांनी अखंडपणाने केले. संबंध आयुष्यच त्यांनी लोकांसाठी घालवले. लोकांच्या प्रश्नात घालवले. व्यक्तीगत जीवनाची त्यांना कधी आस्थाच नव्हती. त्यासाठी त्यांनी कधी वेळ दिला नाही. मला आठवतंय, आमच्या भगिनी इथं आहेत. तिचं लग्नं झालं. त्या काळात घरच्या सगळ्या कामाची जबाबदारी माझ्यावर होती. सगळी तयारी करणे, पाव्हण्यांकडे पाहणे, वगैरे वगैरे. लग्न झाल्यानंतर पहिल्यांदा बहिणीला घरी आणले. त्या काळात काय गाड्या नसायच्या. टॅक्सी करायची. नंतर बैलगाडीतून जायचं. हे असले उद्योग आम्हाला करायला लागायचे. पण, माझ्या लक्षात राहिलेली गोष्ट ही आहे की, ज्या दिवशी लग्नाचा मुहूर्त होता, काही तरी साडेचारचा मुहूर्त होता. सगळे तयारीत होते. पण नवरदेवाचा पत्ता कोठे होता. नंतर चौकशी केली की, कुठं आंदोलन वगैरे चालू आहे का. कुठं सभा चालू आहे का आणि मग कुठं तरी त्या




**मीनाताई जगधने यांच्या शुभहस्ते सौ. सरोज नारायण पाटील यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तेव्हा शेजारी शरद पवार, शरद काळे व इतर मान्यवर**

सभेमध्ये गुंतल्यामुळे थोड्या वेळाने ते आले आणि तो विवाह पार पडला. पण, त्याच्यामध्ये स्वतःचे लग्न असो. कौटुंबिक कार्यक्रम असो, याच्यापेक्षा लोकांच्या प्रश्नांसंदर्भातील एखादा कार्यक्रम असेल किंवा काम असेल तर तो अधिक महत्त्वाचा त्याला अधिक महत्व ही गोष्ट त्यांनी केली आहे. हे आपल्यापैकी अनेकांना माहिती आहे.

गेली अनेक वर्षे रयत शिक्षण मंडळाची जबाबदारी चेअरमन म्हणून त्यांनी घेतली. कर्मवीर अण्णांचे जे अत्यंत आवडते विद्यार्थी होते, त्यामध्ये हा नारायण होता. त्यांनी अण्णांचा शेवटाच श्वास असेपर्यंत त्यांची बांधिलकी सोडली नाही. अण्णांच्या नंतर हा विकासाचा कामाचा गाडा आपण पुढे न्यायला पाहिजे, त्यासाठी जे जे काही करायला लागेल, ते संस्थेचे सभासद म्हणून, चेअरमन म्हणून असो, संस्थेचा पदाधिकारी म्हणून असो किंवा नसो. हे त्यांनी अखंडपणाने केले. गेली 40- 50 वर्षे केले आणि ते काम त्यांनी आजही चालू ठेवलेले आहे. त्यांच्यामध्ये संस्थेला एक दिशा देण्याचे काम केले. शिक्षण संस्थेमध्ये बाजारीकरण आले आहे. ते आपल्या संस्थेमध्ये किंचितही असू नये, याची खबरदारी अखंडपणाने घेणे, आणि समाजातील शेवटच्या थरातील मुलामुलींना सुलभपणाने ज्ञानदानाचे काम आपण केले पाहिजे, ही जी अण्णांची भावना होती, ती तंतोतंत कृतीमध्ये आणण्यासाठी कष्ट करण्याचे काम त्यांनी अखंडपणाने केले. आणि या सगळ्या कामांची



**शरद पवार हे शाल घालून प्रा. एन.डी. पाटील यांचा सत्कार करताना. शेजारी डॉ. अनिल काकोडकर, सौ. सरोज पाटील आणि अरूण गुजराथी.**

## केवढा हा कामाचा उरक!

**२५ नोव्हेंबर. महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आलेला होता. महाविकास आघाडीने आमदारांना सुरक्षित स्थळी नेऊन ठेवले होते. भाजप आमदार फोडण्याची भिती होती. आमदारांच्या बैठकांना जोर आला होता. असा वेळी मुंबई सोडून शरद पवार कऱ्हाडला येतील की नाही याबाबत सारेजण साशंक होते. पण सकाळी ७ वाजताच पवार साहेब हेलिकॅप्टरने आले आणि थेट यशवंतराव चव्हाण यांच्या प्रितीसंगमावरील समाधीस्थळी जाऊन त्यांनी दर्शन घेतले. प्रतिष्ठानच्या दोन बैठका केल्या. प्रा.एन.डी.पाटील यांना पुरस्कार प्रदान करुन सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या गळीताचा मोळी टाकून शुभारंभ केला व दुपारी दोनला निघून हयात हॉटेलात आमदारांच्या बैठकीला उपस्थित राहिले. वयाच्या ८० व्या वर्षी केवढा हा कामाचा उरक !**

नोंद प्रतिष्ठानने घेतली. मी अनिल काकोडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मनापासून धन्यवाद देतो की, योग्य व्यक्तीची निवड त्यांनी प्रत्येक वेळेला केली. आणि अशाच सुयोग्य व्यक्तीची भर त्यांच्या निवडीतून त्यांनी केली. आणि राष्ट्रीय पुरस्कारासाठी अभिजीत बॅनर्जी या मोठ्या अर्थशास्त्रज्ञानाची निवड केली. ही निवड अतिशय उत्तमप्रकारची निवड आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची आर्थिक जगामध्ये एक प्रतिष्ठा वाढविण्याचे काम ज्या काही मोजक्या लोकांनी केले, त्याच्यामध्ये अभिजीत बॅनर्जी यांचा उल्लेख करावा लागेल. माझ्या मते या निवडी प्रतिष्ठानच्या प्रतिष्ठा वाढविणाऱ्या आहेत. आणि यशवंतरावांना मनापासून समाधान वाटणाऱ्या अशा या निवडी आहेत. अनिल काकोडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिजीत बॅनर्जी यांची निवड केल्याबद्दल धन्यवाद देतो.




समाधीस्थळी भजन सादर होताना.



यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीवर शरद पवार व श्रीनिवास पाटील पुष्पचक्र अर्पण करताना.







# एन.डी. पाटील यांना देण्यात आलेले मानपत्र

एन.डी. पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ढवळी या लहानशा गावांत शेतकरी कुटुंबात झाला. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे पाटलाघरी जन्मलेल्या या नारायणाची जन्म तारीख शाळेतील मास्तरांनीच निश्चित करुन टाकली. ती जन्म तारीख आहे १५ जुलै १९२९. त्यांच्या कुटुंबात औपचारिक शिक्षणाचा अभाव होता. परंतु एन.डी.नी परिश्रमपूर्वक अर्थशास्त्रामध्ये एम.ए. आणि विधी शाखेची एलएल.बी. या पदव्या प्राप्त करुन घेतल्या. ढवळी येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोज नऊ-दहा मैलांची पायपीट करुन रयत शिक्षण संस्थेने आष्टा येथे सुरु केलेल्या हायस्कूलमध्ये पुढील शिक्षणास सुरुवात केली. मॅट्रिक झाल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. राजर्षी शाहू महाराजांनी सुरु केलेल्या वसतीगृहात राहून ते राजाराम कॉलेजमध्ये जाऊ लागले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादि विषयांचे भरपूर वाचन केले. मार्क्स आणि लेनिन यांचे ग्रंथ वाचले. या सर्व ज्ञानार्जनातून त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व निर्माण होत गेले.

एन.डी. पाटील हे महाराष्ट्राला परिचित झाले ते मुख्यतः संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळे. ते संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यवाह होते. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दौरा करुन संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार केला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत धोरण ठरविणारा कार्यकर्ता म्हणून त्यांना मान्यता मिळाली. ते इस्लामपूर कॉलेजचे काही वर्षे प्राध्यापक व प्राचार्य होते. परंतु त्यांचा पिंड सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पुरोगामी चळवळीत हिरिरीने भाग घेण्याचा होता. ऑगस्ट १९४७ मध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. सांगलीत पक्षाची शाखा स्थापन करण्यासाठी १९४८ मध्ये झालेल्या बैठकीत एन.डी. उपस्थित होते. त्यानंतर ते शेतकरी कामगार पक्षात काम करु लागले. १९५७ च्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष मोठ्या संख्येने निवडून आला त्यावेळी एन.डी. विधान परिषदेत सदस्य होते. ते एकूण १८ वर्षे विधान परिषदेचे सदस्य होते. १९८५ ते १९९० या काळात ते महाराष्ट्र विधान सभेचे सदस्य होते. १९७८ ते १९८० या कालावधीत पुरोगामी लोकशाही दलाच्या सरकारमध्ये ते सहकार मंत्री होते. त्या काळात त्यांनी सहकार कायद्यात मूलगामी सुधारणा केल्या व कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे पुनरुज्जीवन करुन ती यशस्वीपणे राबविली.

एकीकडे राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतानाच त्यांनी रयत शिक्षण संस्थेमार्फत महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये लक्षणीय कामगिरी केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वतः आपल्या मृत्युपूर्वी एन.डी ना रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून सहभागी करुन घेतले. १९९० मध्ये ते रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. तेव्हांपासून कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्थापन केलेल्या या ध्येयवादी शिक्षण संस्थेचे ते. नेतृत्व करीत आहेत. गरीबातील गरीब आणि सामान्यातील सामान्य विद्यार्थी यांच्या हिताचा विचार त्यांच्या कार्यामध्ये केंद्रस्थानी राहिलेला आहे. त्यांनी या संस्थेमार्फत हाती घेतलेले अनेक उपक्रम हे त्यांच्या वरील ब्रीदाशी सुसंगत आहेत. दहावीबारावीला नापास होणाऱ्या


विद्यार्थ्यांसाठी नापासांची शाळा, दुर्गम ग्रामीण भागातील आश्रम शाळा, ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी चालविलेली साखर शाळा ही याची काही उदाहरणे आहेत. त्याचबरोबर काळाची पाऊले ओळखून संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकाचे शिक्षण मिळावे, स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठीही त्यांनी सतत परिश्रम घेतले. गरीब विद्यार्थ्यांना उत्तम व उच्च शिक्षण उपलब्ध करुन दिले तरच त्यांची व राज्याची खऱ्या अर्थाने उन्नती साधता येईल, असा त्यांचा दृढ विश्वास आहे. वंचितांसाठी शिक्षण ही कर्मवीरांची प्रेरणा घेऊन ते रयत शिक्षण संस्थेच्या कामाला भविष्यदर्शी दिशा देत राहिले. त्यातूनच रयत शिक्षण संस्थेमध्ये औद्यागिक प्रशिक्षण संस्था, संगणक प्रशिक्षण केंद्र, कर्मवीर भाऊराव पाटील नॉलेज अँड टेक्नॉलॉजी इंस्टिट्युट, गुरुकुल प्रकल्प, सावित्रीबाई फुले दत्तक पालक संस्था व विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन अशा संस्था त्यांनी स्थापन केल्या.

एन.डी.चे आयुष्य पुरोगामी चळवळी, सत्याग्रह आणि आंदोलने यांनी व्यापलेले आहे. वयाच्या १६ व्या वर्षी १९४५ मध्ये ग्रामीण भागात दारुच्या दुकानासमोर केलेले पिकेटिंग हे त्यांचे पहिले आंदोलन. गोवामुक्ती संग्राम, कापूस एकाधिकार खरेदी योजनेची अंमलबजावणी, सीमा प्रश्न, धरणग्रस्तांचे आंदोलन, जागतिकीकरणाविरोधातील आंदोलने अशा अनेक आंदोलनात त्यांनी सामान्य जनतेचे नेतृत्व केले. त्यांच्या आग्रही प्रतिपादनामुळे महाराष्ट्र सरकारने सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात नेण्याचे ठरविले व त्याची सर्व जबाबदारी एन.डी. पाटील यांच्यावर सोपविली. ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष आहेत. समाजाच्या परिघावरील किंवा परिघाबाहेरील सामान्य माणसांच्या कल्याणासाठी ज्या ज्या परिवर्तनवादी चळवळी महाराष्ट्रामध्ये झाल्या त्या चळवळींमध्ये एन.डी.चा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे ज्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय झालेला आहे अशा समाजासाठी एन.डी.चे नेतृत्व हा मोठाच आधारस्तंभ राहिला आहे.

गेल्या अनेक वर्षांच्या संघर्षात त्यांनी कधीही आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. आमदार कोट्यातून मिळणारी सदनिका आणि मुख्यमंत्री कोट्यातून मुलाला मिळालेला वैद्यकीय शाखेतील प्रवेश त्यांनी सहजपणे नाकारला. त्यांनी काही काळ राष्ट्रीय बियाणे मंडळाचे अध्यक्षपद भूषविले होते. तेदेखील या पदाशी संबंधित कोणत्याही प्रकारचा भत्ता घेणार नाही अशी अट घालून. ते संस्थेची गाडी कधी वापरीत नाहीत. त्यांच्या साध्या राहणीच्या या निष्ठावंत बांधिलकीमुळे त्यांनी आदर्श लोकप्रतिनिधी व लोकनेता कसा असावा याचे उत्तम उदाहरण समाजापुढे ठेवले आहे. त्यांच्या सत्प्रवृत्त व झुंजार नेतृत्वाला दाद देऊन स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड; भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या नामवंत संस्थांनी सन्माननीय डी. लिट. पदवी देऊन त्यांचा गौरव केला आहे. अशा या ध्येयवादी व कर्मयोगी व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करताना 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ला विशेष आनंद होत आहे.




# शरद काळे यांनी मानपत्राचे वाचन केले



# विरोधक व इजा करणाऱ्यांसाठीही मार्ग काढण्याची यशवंतरावांची वृत्ती

## एन.डी. पाटील यांचे विचार

ज्या यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने हे प्रतिष्ठान गेली काही वर्षे काम करत आहे, ते काही लोकांना सन्मानीत करत आहे. ते प्रतिष्ठान ज्यांच्या नावानी स्थापन करण्यात आले, ते यशवंतराव चव्हाण हे या सातारा जिल्ह्याचे सुपुत्र. त्यांच्या व्याख्येनुसार उत्तरेला नीरा नदी आणि दक्षिणेला वारणा नदी या दोन नद्यांमधला जो हा प्रदेश आहे, हा प्रदेश म्हणजे सातारा. त्या साताऱ्यामध्ये त्यांचे कर्तृत्व सुरुवातीला बहरले. आणि त्यानंतर ते देशपातळीवर सतत कार्यरत राहिले. आणि देशाचा जो काही कारभार नेटकेपणाने केला, तो त्यांनी केला. ते जसे कृष्णाकाठावर जन्माला आले, आणि इथं वाढले, घडले. त्याप्रमाणे मी वारणा नदीच्या काठावर जन्माला आलो. त्यावेळी मला सामान्य कुटुंबात जन्माला येणाऱ्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावं लागतं, ते तोंड देण्याचे कामही मी केले. दररोज जाताना आठ किलोमीटर आणि येताना आठ किलोमीटर असं चालून मला माझं माध्यमिक शिक्षण घ्यावे लागले. पण, यामध्ये मला माझ्या कुटुंबियांनी सर्व तऱ्हेचे सहकार्य केले आणि रयत शिक्षण संस्थेने योग्य वेळी माझ्या गावापासून आठ किलोमीटरवर जे आष्टा नावाचे गाव आहे, त्या गावामध्ये आपली पहिली फांदी रोवली. त्या ठिकाणी दुसऱ्या एका संस्थेचे हायस्कूल होते. पण, ते काही काळानी विद्यार्थ्यांच्या संख्येअभावी बंद पडले. आणि त्या ठिकाणी योगायोगाने त्या वेळेला रयत शिक्षण संस्थेने हायस्कूल काढण्याची कल्पना रयत शिक्षण संस्थेचे एक तरुण कार्यकर्ते, अतिशय अभ्यासू असे रयत सेवक आर. व्ही. खैरमोडे हे समाजातल्या सर्वात कनिष्ठ स्तरातून आलेले होते. मी त्यांचे संपूर्ण नाव सांगितले तर आपल्याला कळेल की, या मुलाच्या घरची परिस्थिती काय असेल. रामकृष्ण वेताळराव खैरमोडे, हे आम्हाला माहित असलेले त्यांचे नाव. त्यांच्या वडिलांचे नाव वेताळराव होते. या वेताळरावच्या कुटुंबाचे स्थान त्या वेळेच्या समाजाच्या स्तरामध्ये किती खालचं असलं पाहिजे आणि अशा परिस्थितीत या मुलाला कर्मवीर अण्णांनी त्याच्या गावाला जाऊन त्याला इकडे आणले. त्याचे शिक्षण केले. अतिशय हुशार विद्यार्थी. आणि तो त्यावेळी आष्ट्याला आला. कारण, त्यावेळी त्याला बीटीचा अभ्यास करण्यासाठी अण्णांनी त्याला बेळगावला पाठवला होता. परंतु, त्या हवेमध्ये त्यांना क्षयाची बाधा झाली. आणि मग बीटीला गेलेला विद्यार्थी टीबी घेऊन आष्ट्याला आला. आणि अण्णांनी त्याला त्याच्या आत्याच्या घरी आणि ती आत्या देखील जन्मांध होती. आम्ही तिच्या घरी जात असू. कारण, आम्हाला आमच्या खैरमोडे सरांचे मार्गदर्शन हवं असायचे. त्यावेळी त्यांनी त्या ठिकाणी ती शाळा सुरू केली. अशी ती शाळा आणि मी त्या शाळेचा विद्यार्थी. ती शाळा आम्हाला



सर्व काही देत होती. अभ्यास, सामान्य कुटुंबाला हवी असणारी मायेची ऊब ही त्यांनी आम्हाला सातत्याने दिली. की ज्या परिस्थितीत आम्ही शिकत होतो, त्या परिस्थितीत आम्ही कधी निराश झालो नाही. आणि त्यांनी आम्हाला मिळणार नाही, अशी संधी दिली. त्यावेळी आमचे खैरमोडे सर फर्ग्युसनमध्ये शिकत असताना युथ लिगचे कार्यकर्ते होते. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये समाजवादी तरुणांनी अशा पद्धतीची युथ लीग स्थापन केलेली आणि त्या वादविवादामध्ये अत्यंत पारंगत असलेले खैरमोडे सर आम्हाला आष्ट्याला मुख्याध्यापक म्हणून मिळाले. आणि त्या शाळेची वाढ करत असतानाच ते निधन पावले. पण, त्यांनी मला त्यावेळी महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणाची कल्पना दिली. त्यांच्याकडे चांगली चांगली पुस्तके असायची. ती पुस्तके ते आम्हाला वाचायला द्यायचे. त्यामधून त्यांनी आमची जडणघडण केली. त्या काळात त्यांनी मला डॉ. आंबेडकरांचे एक पुस्तक वाचायला दिलेले होते. जातीभेदाचा विध्वंस हे ते पुस्तक. त्याला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी होती. लाहोरला जातपात तोड नावाचे एक मंडळ काम करत होते. चांगले काम करत होते. त्या मंडळाचा एक अधिवेशनाचा कार्यक्रम होता. त्याला त्यांनी डॉ. आंबेडकरांना निमंत्रण दिले. आणि ते निमंत्रण दिल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी त्यांना आपले अध्यक्षीय भाषण लिहून पाठवले. ते भाषण त्या जातपात तोड मंडळाला आवडले नाही. त्यामध्ये त्यांनी एक भूमिका मांडली होती की, या जातीपातीने या देशाचे वाटोळे केलेले आहे. या जातीपातींचा संपूर्ण विध्वंस केल्याशिवाय राहणार नाही. अशी त्यांची भूमिका होती आणि ती त्यांनी त्या व्याख्यानामध्ये नमूद केलेली होती. त्यांनी त्या अध्यक्षीयपदाला साजेसे भाषण लिहून काढले. पण, ते भाषण आज इतिहासात एक वेगळ्या अर्थाने नमूद आहे. कारण, त्या जातपात तोड मंडळाचे आणि डॉ. आंबेडकरांचे मतभेद एवढे वाढले, की डॉ. आंबेडकरांनी आपला ड्राफ्ट सुधारायला नकार दिला. आणि जातपात तोड मंडळही तेवढेच अडून राहिले. आणि शेवटी त्यांनी डॉ. आंबेडकरांच ते अध्यक्षपद काढून घेतल्याचे जाहीर केले. परिषद त्यांनी पुढे ढकलली आणि आंबेडकरांनी त्याच्यावर एक उपाय केला की, त्यांनी जे ते भाषण लिहिलेले होते, ते आपल्या खर्चाने छापून घेऊन प्रसिद्ध केले. आणि त्याला नाव दिले की, जातपात तोड मंडळाच्या अधिवेशनासाठी तयार केलेले पण न झालेले भाषण मी आता माझ्यावतीने प्रसिद्ध करत आहे. अशा तऱ्हेचे पुस्तकही त्या काळात खैरमोडेंकडे होते. आणि ते पुष्कळ चांगल्या तऱ्हेचे ग्रंथ वाचायचे. त्यातून त्यांनी आम्हाला ही नव्या विचाराची दिशा दिली. मी त्यांचा आजही तसा ऋणी आहे. आम्ही जे घडलो की ते आम्हाला त्या काळात काँग्रेसच्या

कार्यक्रमात भाग देण्यासाठी वेळ द्यायचे. संध्याकाळचा तास ते पीटीचा तास ठेवायचे आणि परगावाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ते जाण्याची मोकळीक द्यायचे.

त्या काळात मी माझ्या गावात राष्ट्र सेवा दलाची शाखा चालवत होतो. त्या काळात माझ्या गावाची लोकसंख्या एक हजारच्या आसपास होती. तेथे सेवा दलाचे जे काही कार्यक्रम आहेत, ते मी राबवत होतो. यशवंतराव चव्हाणांशी संबंध जीवनीत प्रथम तिथे आला. आष्ट्यामध्ये 1945 सालच्या निवडणुकीची एक सभा झाली. त्या सभेचे अध्यक्ष खैरमोडे सर होते. त्या काळात असेंबली इलेक्शन झाले. त्या काळात मी स्वयंसेवक म्हणून काम करत होतो. त्या काळात मी इंग्रजी पाचवीमध्ये होतो. त्या काळात मी या राजकारणाशी थोडी ओळख झालेला आणि काम करणारा विद्यार्थी होतो. आणि त्या पद्धतीने काम करत होतो. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांसोबत काम करत होतो. त्यावेळी चौसदस्यीय मतदारसंघ होता. त्यावेळी चार उमेदवार काँग्रेसने ठरवले होते. यशवंतराव चव्हाण, व्यंकटराव पवार, बाबूराव गोखले आणि





गौरीहर सिंहासने हे खटावचे होते. ही निवडणूक त्यावेळी 1935 च्या कायद्याने झालेली. ही सिस्टीम त्यावेळी होती. आता ती नाही, त्यामध्ये अल्पसंख्यांक लोकांना देखील निवडणुकीमध्ये निवडून येण्याची शक्यता असायची. कारण, चार सभासदाला चार मते. ती चार मते कशी पण विभागून द्यावीत, अगदी एकाला पण चार मते देता येत होती. त्यावेळी घडले असे की, आमच्या वाळवा तालुक्यातून उमेवार होते, के. डी. पाटील. त्यावेळी ते जेलमध्येच होते. त्यांची सुटका झालेली नव्हती. बाकीचे उमेदवार सुटलेले होते. त्यामुळे आमच्या तालुक्यातील लोकांनी शंका उपस्थित केलेली. आम्ही विद्यार्थ्यांच्या वतीने खुद्द यशवंतरावांना भेटलो. त्यांना म्हटलो की, तुम्ही प्रचारात आहात आणि तुम्हाला प्रचार करता येतोय, पण आमच्या के. डी. पाटलांचे तुम्ही काय करणार. जर आम्हाला त्यांना एकापेक्षा अधिक मते द्यायची असतील तर तुमची काही आडकाठी आहे का. तर त्यांनी सांगितले की, माझी काहीच आडकाठी नाही. ते अधिक लोकशाहीचे पाउल ठरेल. मी त्याला माझा आशीर्वाद देतो आणि त्या निवडणुकीत आमचे





चारही उमेदवार निवडून आले. तेव्हापासून यशवंतरावजींच्या जीवनातील या घडामोडी होत्या. त्या घडामोडी त्या काळात वाढत गेल्या.



यशवंतरावांची जडणघडण या भूमीत झाली आणि त्या काळामध्ये 26 जानेवारीचा दिवस स्वातंत्र्यदिन साजरा करून आणि मामलेदार कचेरीवर झेंडे लावून ते तुरुंगात गेले. तो दिवस त्यांच्या वयाच्या मानाने त्यांनी फार मोठे काम केले. त्यामुळे त्यांच्याबद्दल समस्त लोकांमध्ये आदराची भावना निर्माण झाली. आणि त्यांनी जेलमध्ये जी साधना केली, तिला तोड नाही. आचार्य भागवतांसारखे एक अत्यंत कोपीष्ठ अभ्यासू त्यांना त्या ठिकाणी मार्गदर्शनाला लाभले. त्यांनी त्या काळात त्यांची तयारी करून घेतली. आणि जे यशवंतराव जेलमध्ये गेले त्यांनतर ते दीड वर्षांनी जेव्हा परत आले, तेव्हा ते पूर्णपणे बदललेले होते. मोठमोठ्या राजकारणी लोकांसोबत वाद घालण्याची त्यांची ताकद वाढलेली होती. ती तयारी त्यांनी त्या जेलमध्ये एक तपश्चर्या करावी तशी केलेली होती. तेथून पुढे ते अनेक वेळा जेलमध्ये गेले. त्यानंतर त्यांची आणि आमची केव्हा तरी भेट व्हायची. त्यानंतर ते सत्तेत गेल्यानंतर त्यांची आणि आमची फारशी गाठ पडण्याची वेळ नव्हती. पण, आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्षांनी 1980 साली बॅरिस्टर अंतुले यांच्या मनमानी आणि अनियंत्रित कामाविरोधात जी काही पावले उचलेली त्यामध्ये जळगावपासून नागपूरला एक शेतकरी दिंडी काढलेली. त्यामध्ये मी एक जाणता कार्यकर्ता म्हणून सहभागी झालेलो होतो. त्यावेळी ते या दिंडीमध्ये भाग घेण्यासाठी पार्लमेंटमधून आलेले होते. त्यामध्ये अन्यायाचा भाग हा होता की, आम्हाला सनदशीर मार्गाने निषेध नोंदवायचा होता. त्यांनी आम्हाला गुन्हा करण्याचा संभव आहे म्हणून अटक केले. जो फटका त्यांनी आम्हाला अटक करताना दिला, तोच फटका त्यांनी यशवंतराव चव्हाणांनाही अटक करताना दिला. आणि त्यानंतर तो दिवस आणि रात्र आम्ही एकत्र राहिलो भंडारा जेलमध्ये. मी त्यांना म्हणालो की, तुम्हा या सर्व क्षेत्रातून बाहेर सत्तेत गेलात. पण, आज सत्तेत असतानाही परत आलात. ती अशा ज्या लोकांची होती, त्यांच्यासाठी आज बायबलमधील प्राडिबल सन इज रिटर्न, असं आहे. त्यांना माझा तो शेरा खूप आवडला. आणि त्यांनी मला सांगितले की, एन. डी. तुझा हा शेरा मला आवडला. आणि त्यानंतर संध्याकाळी जाबजवाब देऊन ते परत गेले. त्यांच्या स्वभावात एक उदार भाव होता. तो मला खूप भावला.

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने इस्लामपूरला कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज चालते. पाच हजार विद्यार्थी आहेत. त्या केंद्रामध्ये एक कॉलेज काढण्याचा कर्मवीर अण्णांचा एक मनोदय होता. त्यांना असं वाटायचे की, माझ्या सामाजिक जीवनामध्ये, शैक्षणिक कार्यामध्ये इस्लामपूरला मी एक दूरदर्शी पाऊल टाकलेले होते. ज्याला मला अभिमान वाटतोय. आता संयुक्त महाराष्ट्र होतोय. त्याच्यामध्ये कॉलेज निघतील. तर इस्लामापूरला कॉलेज असावे आणि ते रयत शिक्षण संस्थेने काढावे. त्याप्रमाणे ते ठरले आणि त्यांनी मला ससूनमध्ये बोलावून घेतले. आणि मला म्हणाले की, अरे नारायण माझे या शहराशी नाते आहे. पण, तुम्ही तिथे काही तुमची एखादी शाखा काढू शकाल, असं मला दिसत नाही. पण, मला असं वाटतंय की, तिथे रयतने एखादे कॉलेज काढण्याची संधी घ्यावी. मी त्यांना म्हटलो की, काही झाले तरी मी ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन माझ्या सहकाऱ्यांच्या वतीने. ते मी रयत शिक्षण संस्थेच्या मिटींगमध्ये मांडले. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेचे जे सिनीअर मेंबर होते त्यांनी वाळवा तालुक्यात जाऊन दोन चार जाहीर सभा घेतल्या. वातावरण तयार केले. येते रयत शिक्षण संस्थेचे कॉलेज का निघावे, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. आणि मग नंतर कॉलेज काढण्याची कल्पना सुरू झाल्यानंतर पुणे विद्यापीठाचे नोटिफिकेशन आले की, अमुक तारखेला तुम्ही अर्ज केले पाहिजेत. त्यानुसार आम्ही प्रयत्नाला लागलो. तोपर्यंत इस्लामपुरात जे वरिष्ठ नेते होते, ते सारे यशवंतरावजींना येऊन भेटले. आणि त्यांनी विनंती केली की, तुम्ही जर येथे अर्ज केला, तर पुणे विद्यापीठ तुम्हाला परवानगी देईल. आमच्या कुठल्या सहकाऱ्यांना देणार नाही. तिथे 21 वर्षे नगराध्यक्ष असणारे यशवंतरावजींचे जिगरी दोस्त होते एम. डी. पवार. ते तहहयात नगराध्यक्ष आहेत, असं वाटायचं. त्यांचे आणि यशवंतरावजींचे संबंध एकदम घनिष्ठ होते. त्यांनी सांगितले की, महादेवराव तुम्ही हे काम अंगावर घ्यायचे. मग त्यांनी सांगितले की, साहेबांनी आपल्याला आशीर्वाद दिला आहे. तोपर्यंत आम्ही आमच्या हालचाली सुरू केल्या होत्या. अण्णा हयात नव्हते. अण्णांचे नुकतेच निधन झाले होते. मी त्यांना मृत्यूशय्येवरच हे कॉलेज काढण्याचा शब्द दिला होता. त्याचे कारण काय की, अण्णांचे वडिल हे इस्लामपूरला मामलेदार कचेरीत कनिष्ठ लिपीक होते. त्यांना भेटायला अण्णा आले होते आणि त्यांना कोल्हापूर शहरामध्ये जे दृश्य कधीच दिसले नाही, ते तिथे दिसले. तिथे

आतमध्ये जी एक प्राथमिक शाळा होती, त्या शाळेमध्ये घोलप नावाचा महाराचा मुलगा बाहेर बसून फळ्यावरचे लिहून काढणे, फळ्यावर शिक्षकांनी लिहिलेले बघायचे, ते पाटीवर लिहायचे, पुन्हा उठायचे, पुन्हा बघायचे, पुन्हा बसायचे, असं चाललं होतं. ते अण्णांच्या लक्षात आले. ते म्हणाले, हे काय आहे. त्यांनी चौकशी केली. त्यांनी विचारले की, अरे तु इथं का बसतोस. तर तो ज्ञानदेव घोलप नावाचा विद्यार्थी होता. वडिलांनी त्याचे नाव ज्ञानदेव ठेवले होते. पण, त्याला ज्ञान देवो, अशी समाजाची मानसिकता नव्हती. अण्णा त्याला म्हणाले की, तू इथं का बसतोय. तर तो म्हणाला की, मी नेहमीच इथं बसतो. तर अण्णा म्हणाले की, का. तर तो म्हणाला की, मी महाराचा मुलगा आहे. त्यामुळे मला वर्गात बसायची परवानगी नाही. अण्णा म्हणाले, की हे मला मान्य नाही. मी हे विचारतो. मास्तरांनी त्यांना सांगितले की, असे सल्ला देणारे आमच्याकडे खूप लोकं येतात. ह्याला बाहेर का बसवता म्हणून. पण, आम्ही त्यांचे ऐकतो आणि सोडून देतो. तुम्ही यामध्ये काही जास्त लक्ष देण्याचे काम करू नका. मग अण्णांचे आणि त्यांचे नेहमीप्रमाणे भांडण झाले. अण्णांनी त्या मुलाची पाटी उचलली आणि म्हणाले की, ही व्यवस्था काही तुझं शिक्षण करणार नाही. तुझ्या शिक्षणाची व्यवस्था मी करतो. तो मुलगा मूळचा शाहूवाडी तालुक्यातील सरूर गावचा. पेठला त्याचे मामा होते. पेठवरून तो इस्लमापूरला शाळेला यायचा. अण्णांनी त्याला घेतले. मग काही वेळ चालत आणि काही वेळ खांद्यावर, अशी चालत त्यांची वरात शाहू महाराजांच्या वाड्यावर गेली. शाहू महाराजांनी त्याला पाहिले आणि म्हणाले की, भाऊ पाटील अरे हे काय रे. का आलास. त्यांनी तो सारा प्रकार सांगितला. त्यावर शाहू महाराज त्याला म्हणाले नाही की, तुला कोणी असले उद्योग सांगितले. कारण, शाहू महाराजांचे मन मोठे. शाहू महाराजांनी सांगितले की, बरं झालं लेका त्याला इकडं आणलं. मी त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करतो. आणि त्यांनी त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याचा आदेश काढला. तो मुलगा पुढे मॅट्रीक झाला आणि मुंबईच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलमध्ये सरकारनियुक्त एमएलसी झाला. रयत शिक्षण संस्थेचा तो पहिला कार्यकर्ता की ज्याला पहिला एमएलसी होण्याची संधी मिळाली. त्याने त्या कौन्सिलमध्ये चांगले निर्णय घेतले. चांगले ठराव घेतले. ठराव मांडून त्यावर चांगले भाषण करत असे. अभ्यासू होता. तो एवढा अभ्यासू होता की, जेव्हा डॉ. आंबेडकर अमेरिकेला शिकायला गेले, त्यावेळी ते जे मुखपत्र चालवत होते, त्याचे संपादक त्याला केले. त्या प्रमाणे तो मूकनायकचा संपादक झाला. मूकनायकमध्ये खाली एक टीप असायची, द लीडर आफ अनटचेबल्स. आता आपल्या लक्षात येत नाही की, आपल्या देशात आपण अस्पृश्यांना अस्पृश्य ठरवले. अमेरिकेतील निग्रोची स्थिती त्यापेक्षा वाईट आहे. पण, एक अर्थाने अशी आहे की, आपल्या लक्षात आले पाहिजे की, निग्रो हा अनटचेबल नाही. इथे अस्पृश्यता होती, ती अजून गेलेली नाही.

अण्णांना त्यामध्ये एक कौतुक होते की, आपण हाताशी घेतलेला एक मुलगा की, ज्याला आपण खांद्यावर घेऊन कोल्हापूरच्या राजवाड्यात नेला. त्याने नाव कुठे तरी काढावे, असं त्यांना वाटायचे, पण ते काही शक्य झाले नव्हते. त्यामुळे

**एन.डी.पाटील यांनी मिळालेली पुरस्काराची दोन लाखाची रक्कम रयत शिक्षण संस्था, सातारा आणि इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनी या दोन संस्थांना देऊन टाकली.**



त्यांना वाटले की, आपण येथे काही तरी शाखा काढूयात. त्याप्रमाणे आम्ही कॉलेज काढले. त्यावेळी यशवंतरावांना वाटले की, संस्थेच्या लोकांना बोलावून घ्यावे. त्यांना काय वाटतंय बोलावं. त्यामुळे संस्थेच्या लोकांनी मला बरोबर घेतलं. त्यांना वाटले की, आपण यशवंतरावांसमोर एवढ्या स्पष्ट बोलणार नाही. आपण नारायणला घेतलेले बरं. त्यामुळे त्यांनी मला बरोबर घेतलं. तिथे गेल्यानंतर आम्ही विचारले की, कशा करता आम्हाला बोलावले आहे. तर त्यांनी विषय काढला की, हे हे कॉलेज आहे आणि ही मंडळी आहेत. यांना कॉलेज काढायचे आहे. एस. व्ही. पाटील आहेत. राजारामबापू आहेत. यांना कॉलेज काढायचे आहे. तर मी म्हटलो की, काढा की मग. आमचा काय विरोध आहे का. तर ते म्हणाले की, तू मला असं वाकडं बोलू नकोस. मी म्हटलो की, तुम्हीही अर्ज करा. मीही केला आहे. ते मला म्हणाले की, एन. डी. तुझं मला हे कळतंय. पण, तुझ्या यामध्ये वातूडपणा आहे. तर मी म्हणालो की, वातूडपणा असला तर असूद्या, पण आमचे हे म्हणणे असे आहे. मी याबाबतीमध्ये थोडासा हळवा आहे. अण्णांना मी त्यांच्या मृत्यूशय्येवर शब्द दिलेला आहे. तो मला पाळायचा आहे. तर ते म्हणाले की, मीही शब्द दिला आहे आमच्या एम. डी. पवारांना त्यांचे काय करायचे. तर ते म्हणाले की, आपण यातून मार्ग काढू. तुम्ही तासगावला आणि दुसरीकडे अर्ज करा. तर मी म्हणालो की, आम्ही दुसरीकडे गेलो तरी तुम्ही संधी देणार नाही. तर ते म्हणाले की, असं का? तर म्हणालो की, आम्ही कुठंही गेलो तरी तुमचे कार्यकर्ते असणारच. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी तुम्हीच आहे. दुसरं कोण असणार आहे. तर ते म्हणाले, हो नारायण तसंच झालं आहे. विट्यालाही आम्ही अर्ज केला, तर तिथल्याही लोकांची इच्छा होती की, आमचं कॉलेज आम्ही काढतो. त्यावेळी रयत शिक्षण संस्थेने एक कॉलेज काढलं, पण त्यावेळी योगायोग असा झाला की त्या विट्याच्या कॉलेजचे प्रकरण मागे पडले. तिथं बळवंतराव पवार असे कॉलेजला नाव दिले. हा नंतरचा विषय आहे. पण, वाळव्यासाठी मी आणि ते प्रयत्न करत राहिलो. मला त्यांनी सांगितले की, रयतने अर्जच करू नये. तर मी म्हणालो की, मला माझा शब्द पाळायचा आहे. त्यामुळे तुम्ही मला संधी ठेवा. मग आमच्या दोघांची तडजोड झाली. मी म्हणालो, मला दुसरं काही नकोय. रयत शिक्षण संस्थेचा अर्ज असेल तर तुमचा अर्ज मंजूर होणार नाही, असं तुम्ही म्हणताय ना. त्यावेळी संस्थेने निर्णय घेतला की, रयत शिक्षण संस्थेने अर्ज करू नये. त्यावेळी मी यशवंतरावजींना विनंती केली की, तुम्ही मला अशी परवानगी द्या की, रयत शिक्षण संस्थेची मदत न घेता माझी जी काही सार्वजनिक पत आहे, तेवढ्या जोरावर प्रयत्न करण्याची तुम्ही मला मुभा द्यावी. मग ते म्हणाले की, ठिक आहे. तू जर हे स्वतःच्या जबाबदारीवर रेटणार असणार आणि रयत शिक्षण संस्थेची मदत घेणार नसणार, तर माझी काही हरकत नाही. त्यानुसार त्यांनी मला आश्वासन दिले. मोकळीक दिली. त्यानंतर मी माझ्या कॉन्टॅक्टनी पुणे विद्यापीठात असणाऱ्या कॉन्टॅक्टनी, ग. प्र. प्रधानांपासून अनेकांच्या माझ्या ओळखी होत्या. आणि ते गृहस्थ जे आले, ते अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रिन्सीपॉल थॉमस बारनाप्स या नावाचे होते. त्यांचे अमेरिकेत शिक्षण झालेले. ते खूप विचार करायचे. त्यांना जाऊन मी भेटलो. त्यावेळी बापूसाहेब भारस्कर नावाचे आमच्या पक्षाचे आमदार होते. ते नगरला राहायचे. त्यांचा आणि माझा परिचय होता. त्यांना मी म्हणालो की, तुमची आणि या बारनाप्स साहेबांची काही ओळख आहे का. तर ते म्हणाले की, आम्ही चांगले मित्र आहोत. तर मी त्यांना म्हणालो की, माझं एक छोटसं काम आहे.



त्यांनी त्याविषयी सहानभूतीने विचार करावा. आम्ही कॉलेज सुरू करतोय आणि आमची महात्मा फुले शिक्षण संस्था आहे. ते म्हणाले की, तुम्ही काही काळजी करू नका. तुम्ही विद्यापीठाचे नियम काटेकोरपणे पाळा. आम्ही तुमचा सहानभूतीपूर्वक विचार करू. आम्ही कोणाला झुकते माप देत नाही की कोणावर अन्याय करत नाही. त्यामुळे आम्ही ते सर्व नियम पाळले. कारण, आम्ही नियम पाळले तरच आम्हाला काहीतरी मिळणार होते. ते म्हणाले, आम्ही तुमच्या अर्जाची शिफारस करू. आम्हाला तुमच्यावर अन्याय करता येणार नाही. आमच्याकडे दातावर मारायला पैसा नव्हता. आम्ही इस्लामपूरला बँकेच्या शाखेत जाऊन बसलो. येणाऱ्या लोकांना विनंती करू लागलो की, तुम्ही डिपॉझीट बँकेत करण्यापेक्षा आमच्याकडे करा. लोकांना आमचे कौतुक वाटले. त्यांनी आम्हाला दोन दिवसांत 78 हजार रुपये दिले. ते बँकेत भरून त्याच्या रिसीट विद्यापीठात दाखल केल्या. त्यानंतर आम्ही जमीन मिळवली. जमीन देणाऱ्यांनी आम्हाला 10 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर खरेदीखत करून दिले. नंतरच्या काळात आम्ही ती जमीन वाटाघाटी करून खरेदी केली. आणि आमचे कॉलेज निघाले. त्यावेळी आमचे जे प्रतिस्पर्धी होते, त्यांना वाटायचे की, हा नारायण एकटा काय करणार आहे. पण, मी एकटा नव्हतो. माझ्यासोबत तालुक्यातील अनेक माणसे होती. आमच्या समोरच्यांनी मोठ्या उत्साहाने कमिशनरचे एक मोठ्या हॉलमध्ये स्वागत केले. सगळे कडक इस्त्रीचे पुढारी होते. त्यांनी जिलेबीचे जेवन दिले. मी म्हणालो की, आम्ही फाटके लोकं आहोत. आमच्याकडे हॉलचे भाडे द्यायला पैसे नाहीत. आम्ही एक फाटका तुंबूवाला आणला. एक पोते शेंगदाण्याचे आणले. एक पोते चुरमऱ्याचे आणले. म्युनसीपालटीचा एक टँकर बोलावला आणि आम्ही त्यांच्यासमोर भाषण केले. गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आम्ही प्रयत्न करतोय आणि हा प्रयत्न आम्ही यशस्वी करणार, तुमच्या सर्वांच्या पाठिंब्यावर. लोकांनी सांगितले की, तुमच्या मुलांचे शिक्षण कोल्हापूर, साताऱ्याला जाऊन नाही तर इथेच तुमचा घरचा भाकरी तुकडा खाऊन केले तरच होणार आहे. आणि लोकांनी ती मागणी उचलून धरली. ती कमिशनने आमची तयारी पाहिली. त्यांना विचारले की, तुम्ही जागा घेतली की, डिपॉझीट भरले का. तर आम्ही म्हटले की, तुम्ही फक्त परवानगी द्या. आम्ही ही सगळी सर्कस एका रात्रीत उभी करू. पण, त्या कमिशनच्या अध्यक्षांना सर्कसची उपमा आवडली नाही. विद्यापीठाचा माणूस म्हणाला, आज हातात काहीच नाही आणि हे म्हणतात की, एका रात्रीत उभे करू. मग त्यांना जो काही धडा शिकवायचा तो त्यांनी शिकवला. पण,



आमचंही जमीन वगैरे सगळं खोटंच होतं. आज काय सांगायला हरकत नाही आणि आता त्यात काही बदल होत नाही. त्यावेळी कमिशन गेल्यावर आम्ही लोकांचे पैसे परत केले आणि मोकळे झालो. आणि कमीशनने आमच्या अर्जाची शिफारस केली. त्यांनी सांगितले की, यांनी जमीन घेतलेली आणि त्यांचे हायस्कूलची इमारत आहे. त्यात ते सकाळी कॉलेज भरवणार आहेत. यातला सांगण्याचा उद्देश हा की, पुणे विद्यापीठाने कॉलेज आमच्या महात्मा फुले शिक्षण संस्थेला दिले. त्याचा सिनेटमध्ये निर्णय झाला आणि आठ दिवसांनी यशवंतरावांनी मला बोलावले. त्यांना मी कौन्सिलमध्ये भेटलो. ते म्हणाले की, मी त्या लोकांना सांगितले होते, पण मी त्यांना काही मदत करू शकलो नाही. मला कॉलेज कधी दाखवणार.

मी म्हणालो, केव्हाही. ते कॉलेजमध्ये आले. त्यांना काय विचार मांडायचे होते, ते त्यांनी मांडले. ते म्हणाले, हे कॉलेज येथे निघाले आहे, ते वाढले पाहिजे. त्याला मी शुभेच्छा देतो. आणि त्यांनी मला मुख्यमंत्री फंडातून 10 हजार रुपयांचा चेक दिला. बाकीचे काहीही त्यांनी मनात ठेवले नाही. त्यानंतर आज तिथे पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या स्वभावाचा हा एक कंगोरा आहे. इजा करणाऱ्यांसाठीही मार्ग काढण्याची त्यांची वृत्ती होती. ती मला आपल्या नजरेला आणायची होती. नंतरच्या काळात आमचे कधीही वितुष्ट आले नाही. त्याचे श्रेय यशवंतरावांना दिले पाहिजे. ते श्रेय मी त्यांच्या पायवर टाकतो. मी हा पुरस्कार स्वीकारतो. या पुरस्काराचे एक लाख रुपये मी माझी मातृसंस्था असलेल्या रयत संस्थेला देतो. आणि एक लाख रुपये इचलकरंजीला समाजवादाचे काम करणारे आहेत त्या प्रबोधिनीला देतो.

# यशवंतराव-नरसिंहराव यांच्या

## 'सत्तेच्या पडछायेत' या पुस्तकाचे लेखक



१९५६ साली भाषिक राज्याच्या निर्मितीमुळे माझी बदली नागपूरहून मुंबई प्रकाशन विभागात झाली. मी हिंदी स्टेनोग्राफर होतो. मला इथे फारसे कामच नव्हते. या सुखाच्या नोकरीला सप्टेंबर १९५८ मध्ये ग्रहण लागण्याची शक्यता होती. मला बोलावणे पाठविण्यात आले. मी तेव्हा २३ वर्षांचा होता. पेहराव नागपुरी शर्ट पायजमा होता. खोलीमध्ये शिरताच माझा हा अवतार पाहून खोलीतील दोघांना थोडा धक्काच बसल्याचे दिसले. निजी सचिवांनी मला गहन प्रश्न विचारला. तो होता, मुख्यमंत्र्यांचे मराठी स्टेनोग्राफर म्हणून तुम्ही याल का? त्यामुळे जबरदस्त झटका बसण्याची माझी पाळी होती. घाम सुटलेला माझा चेहरा आणि माझा केविलवाणी चेहरा पाहून निजी सचिव म्हणाले, विचार करून पहा. माझ्यासाठी विचार करण्याच्या दोन गोष्टी होत्या. पहिली म्हणजे मराठी प्रशिक्षण घेतले नसल्यामुळे कोणत्या निकषावर माझी निवड केली, हेच मला समजत नव्हते. एक गोष्ट मात्र खरी होती की, हे पद स्वीकारण्याचे मला धाडस होत नव्हते. पण, महिन्यानंतर जेव्ही निजी सचिव आले, तेव्हा सर्व गोष्टींचा विचार करून हे धाडस करण्याचे ठरवून होकार दिला. येथूनच पुढे माझा सत्तेतील पक्षासोबत ४२ वर्षांचा प्रवास सुरू झाला. हा निर्णय माझ्या आयुष्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला. कारण, मी स्टेनोग्राफरपासून जॉइंट सेक्रेटरी पदापर्यंत पोचलो.

# छत्रछायेमुळे आयुष्याचे सार्थक

## राम खांडेकर यांचे कृतज्ञतापूर्ण उद्‌गार



मी यशवंतरावांपासून सुरुवात करून पंतप्रधान नरसिंहरावांपर्यंत वाटचाल केली. दोघांचाही अत्यंत विश्वासाचा कर्मचारी राहिल्यामुळे अनेक घटना जवळून पाहिल्या आणि अनुभवल्या आहेत.

मुंबईत असताना यशवंतरावांचा व माझा संबंध फक्त डिक्टेशनपुरताच होता. खरं सांगू का, पत्रलेखन करावे ते यशवंतरावांनीच. पत्र कितीही मोठे असले तरी मुद्देसुद, जास्तीत जास्त १० ओळींपेक्षा कधीच जास्त नव्हते.

१९४२ साली यशवंतरावांनी मला दिल्लीला नेले. काही दिवसांतच मला त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून स्थान मिळाले. मी दिल्लीला नेहमीच त्यांच्या संपर्कात असल्यामुळे मला तिथेच खरे यशवंतराव समजले. श्रद्धा आणि विश्वास ठेवून आपण देव मानतो. पण, यशवंतराव आणि नरसिंहराव यांच्यात मी देव पाहू लागलो. मंत्री म्हणून दोघांचीही शिस्त फार कडक होती. आणि त्याचबरोबर वचक होता. ४३ वर्षांतील सरकारी नोकरीतील अनुभवावरून मी ते सांगू शकतो. यशवंतरावांचे राहणे अगदी साधे होते. कोठेही बडेजाव दिसून येत नव्हता. त्यांच्यासोबत वावरताना आपण कधी मंत्र्यांसोबत वावरतोय, असं वाटतच नव्हतं.

यशवंतराव भाग्यवान होते. कारण, त्यांच्या आचार



राजहंस प्रकाशनचे मालक दिलीप माजगावकर यांचा शरद पवार पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना. शेजारी मीनाताई जगधने, डॉ. अनिल पाटील व श्रीनिवास पाटील.

विचारांची पत्नी वेणूताई या त्यांच्या आयुष्यात आल्या होत्या. वेणूताई कधी सरकारी कामात दखल देत नव्हत्या. तर संसारात लक्ष द्यायला यशवंतरावांना वेळच मिळत नव्हता. तरीही वेळ मिळेल तेव्हा दोघेही प्रत्येक गोष्टीवर मत मांडत होते. यासाठी वेळ मिळत होता, दुपारी जेवताना व रात्री जेवन झाल्यावर. त्यानंतर वेणूताई झोपी जात आणि यशवंतराव सरकारी कामाला सुरवात करत ते झोपी जाईपर्यंत. हे पतीपत्नी विपरित होते. एखाद्या गोष्टीवरून त्यांच्यात मतभेद होत आणि त्यातून खटका उडाला, असे कधी होत नसे. वेणूताईंना कोणत्याही गोष्टीचा लोभ नव्हता. त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे आणि शांतीप्रिय होते. आपल्या वैवाहिक जीवनात त्यांना कुठलीच उणीव भासली नाही. दोघेही माणुसकीचे महामेरू होते. वेणूताईंनी यशवंतरावांना विचारल्याशिवाय कधीही कुठलीही गोष्ट केली नाही. वेणूताई बंगल्यातील कामगारांच्या बायकांच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत. वेणूताई साक्षात अन्नपूर्णाही होत्या. कितीही संकटे आली तरी वेणूताई आणि यशवंतराव यांच्या चेहऱ्यावर उदासिनता, चिंता कधी दिसली नाही. काही घडलेच नाही, असं त्यांचे असायचे.

यशवंतरावांकडे मनाची संस्कृती जोपासली जायची. त्यांचे निवासस्थान मराठी माणसांसाठी पवित्रस्थान होते. दिल्ली दर्शनाला आलेली माणसे यशवंतरावांना भेटल्याशिवाय दिल्ली सोडत नसत. असा अनुभव नंतर फारसा आलेला नाही. यशवंतरावांकडे संगीताच्या, काव्याच्या मैफिली भरत असत. पुस्तक प्रकाशनाच्या वेळी साहित्यिकांशी वेळेच भान न ठेवता चर्चा होत असे. वेणूताईंच्या निधनानंतर मात्र हा धीरोदत्त पुरुष पार खचला. ते सत्तेवर नसताना मी नोकरी सांभाळून नियमीतपणे त्यांच्याकडे जात असे. वेणूताईंच्या निधनानंतर मी जास्त वेळ जाऊ लागलो. त्यावेळी अनेक गोष्टी यशवंतराव मनमोकळेपणाने सांगत असत. पण, कधी कधी वेणूताईंच्या आठवणींनी ढसाढसा रडलेले यशवंतराव पाहण्याचे दुर्भाग्य मला लाभले होते. मग ऑफिसला जायचे आहे, असं सांगून त्यांना मोठ्या मुश्कीलीने भानावर आणायला लागत असे. पत्नी वियोगाने सतत दीड वर्षे अश्रू गाळणारा पती कोणी पाहिला नसेल.






**राम खांडेकर यांचा शरद पवार शाल व श्रीफळ देवून सत्कार करताना.**
**शेजारी श्रीनिवास पाटील व सौ. सरोज पाटील.**

जवळपास वीस वर्षांचा काळ माझा नरसिंहरावांबरोबर गेला. हा काळ माझ्यासाठी सुवर्णयुग होता. रामटेक मतदारसंघातून निवडून आल्यानंतर त्यांना मराठी माणसाची गरज होती. म्हणून त्यांनी मला वसंतराव साठे यांच्याकडून बोलावून घेतले. त्यांच्या विद्वत्तेबद्दल मी ऐकून होते. त्यांचे मंत्रीमंडळातील अलिखित दुसरे स्थान होते. त्यांचा प्रत्येक शब्द आदेश मानला जात होता. अशा व्यक्तीसोबत काम करणे किती शक्य होईल, याबद्दल मी साशंक होतो. पण, नरसिंहरावसारख्या व्यक्तीस नकार देणे शक्य नव्हते. पण, आतापर्यंतच्या अनुभवावरून कोणतेही काम करण्याची माझी मानसिकता तयार झाली होती. ते अतिशय विचारी होते.



**पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग**

त्यांना दूरदृष्टी होती. त्यांना अनुभव होता. कुशल प्रशासक होते. अनेक विषयात ते पारंगत होते. त्यांना १४ भाषेंचे ज्ञान होते. सात भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. कराडमधील साहित्य संमेलनातील त्यांच्या भाषणावरून त्यांच्या विद्वत्तेला कराडकर कधी विसरले नसतील. तरीपण ते शांत स्वभावाचे, सरळ प्रवृत्तीचे, देवावर श्रद्धा असणारे होते. आपण बरे आणि आपले काम बरे, असे ते अनमोल व्यक्तीमत्व होते. देशात पहिला कॉम्प्युटर राजीवजींकडे आणि नरसिंहरावांकडे आला होता. मानव संसाधन मंत्री असताना शिक्षण खाते त्यांच्याकडे होते. तेव्हा १९८६ सालचा नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रारूप त्यांनी स्वतः आपल्या कॉम्प्यूटरवर टाईप केला होता. सरकारी शाळांमध्ये कोणता कॉम्प्यूटर योग्य आहे, याचे मार्गदर्शन ते सचिवांना करत असत. काम्प्यूटर हे त्यांच्या दैनंदिन जिवनाचे एक महत्त्वाचे अंग होते. त्यांच महत्त्वाची कागदपत्रे कॉम्प्यूटरच्या मेमरीत वर्षानुवर्षे साठवली गेली होती. त्यांचा बहुतेक वेळ कॉम्पूटरवरच जायचा. नरसिंगराव आर्थिक क्रांतीचे जनक होते.

यशवंतराव आणि नरसिंहराव यांच्या छत्रछायेत माझे आयुष्य समाधानकारक गेले. आयुष्याचे सार्थक झाल्याचा आनंद झाला. म्हणून मी दोघांना सत्तेवर नसताना कधी एकटे सोडले नाही.

अनेकांनी मला माझे अनुभव लिहावे, असे सुचविले होते. आग्रह केला होता. पण, पत्नीने निवृत्तीनंतर राजकारणावर लिहायचे आणि बोलायचे नाही, अशी अट घातली होती. तिचे काही चुकले नाही. कारण, दिल्लीकरांनी माझ्या नावाने केलेले गैरप्रकार तिच्या कानावर गेल्याने ती शंकाखोर झाली होती. एवढंच

काय माझ्या नावानी मुख्यमंत्री, राज्यपालांना फोन जात होते. पण, आनंदाची गोष्ट ही की, मी कधीही टेलीफोन करणार नाही, याची त्यांना खात्री होती. मध्यमवर्गीय व साधी राहणी असलेल्या स्त्रीसाठी हे कठीण होते. मी दिल्लीत असताना तिने बऱ्याच यातना सोसल्या होत्या. त्यामुळे आता सुखी संसारात मिठाचा खडा पडू नये, अशी तीची भावना होती. मी जवळपास ६० ते ७० लेख लिहिले. त्याचे संपादन ती करत असे. सुधारणा सुचवत होती. ही लेखमाला लिहिताना व आज प्रकाशन होत असताना तिची उणीव जाणवत आहे.




आपण नेहमी म्हणतो की, कोणत्याही गोष्टीला वेळ लागतो. या लेखमालेबाबतही असेच झाले. लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर हे २५ नोव्हेंबर २०१७ ला स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमासाठी नागपूरला आले असताना मला भेटले. त्या दिवशी मी ही लेखमाला लिहिण्याचा संकल्प सोडला. आज २५ नोव्हेंबर २०१९ म्हणजे बरोबर दोन वर्षांनी तो संकल्प पूर्ण होत आहे. याचा मला आनंद आहे. शब्दांची मर्यादा ठेवून मी लेखन करत नाही. कारण, आपण काय लिहितो, हे वाचकांच्या अंतःकरणाला भिडले पाहिजे. म्हणून ही लेखमाला हजार शब्दांपासून सुरू करून दोन हजार शब्दांवर कधी गेली, हेच कळले नाही. लेखमालेच्या यशाचे हेच गमक आहे. सत्तेच्या पडछायेत मी जे पाहिले, अनुभवले तेच मी लिहिले. कोठेही अतिशोक्ती नाही. या लेखमालेमुळे मनावरील ओझे कमी होऊन ते हलके झाले. तसेच, नेहमीच्या सवयींप्रमाणे टाईप केल्यावर सुरवात केल्यावर मनातील आठवणींना चालना भेटायची. ही लेखमाला लिहिण्यासाठी मी फारसे प्रयत्न केले नाही. पण विचार करायला सुरवात केली. ही लेखमाला देशाबाहेरही लोकप्रिय झाली. विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक लेखमाला म्हणून त्याचे स्वागत केले. ते कळवलेही. इतके समाधान लेखकाला क्वचितच मिळाले असेल. अनेक वाचकांच्या इच्छेनुसार ही लेखमाला प्रसिद्ध करत आहे. विशेषतः कराड, सातारच्या लोकांनी मला आग्रह केला होता. मला भेटण्याची अनेकांची इच्छा पूर्ण करता येत नाही. कारण, मी नागपूरला असतो. अनेकांनी मला शुभेच्छा दिल्या. पण, अनेकांनी साधू, संत, रामशास्त्री अशा मानाच्या पदव्याही दिल्या. मी लेखक नाही. लेखक कल्पनेचा मौज करतो, तसे मला कधीच शक्य झाले नाही. २०१७ च्या शेवटच्या रविवारी ४००-५०० ईमेल आल्या.

ही लेखमाला प्रसिद्ध केल्याबद्दल लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर आणि ही लेखमाला पुस्तकरूपाने छापण्याबद्दल राजहंसने आपणहून स्वीकारल्याबद्दल धन्यवाद. प्रकाशन यशवंतराव प्रतिष्ठानने करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी धन्य झालो. विशेष म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेल्या पवारसाहेबांसारख्या योग्य व्यक्तीकडून पुस्तकाचे प्रकाशन होत आहे, हे माझे भाग्यच. आणखी काय पाहिजे. त्यांच्या शुभेच्छा मला दिल्लीत असताना सदैव मिळत. त्या मला नेहमीच मोलाच्या होत्या. यशवंतरावांच्या स्मृतीस आदरांजली.



**डॉ. सदानंद बोरसे यांचा शरद पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**


# ‘अभिजीत बॅनर्जी’ यांना चव्हाण प्रतिष्ठानचा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांची घोषणा



डॉ. अभिजीत बॅनर्जी

मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनी म्हणजे १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पारितोषिक प्रदान करण्यात येते. २०२० सालचा हा राष्ट्रीय पुरस्कार नोबेल पारितोषिक विजेते आणि जागतिक कीर्तीचे नामवंत अर्थतज्ज्ञ डॉ. अभिजीत बॅनर्जी यांना जाहीर झाला आहे. श्री. बॅनर्जी यांचा जन्म मुंबईत झाला असून महाविद्यालयीन शिक्षण कलकत्ता येथे झाले आहे. हॉर्वर्ड विद्यापीठात त्यांनी पीएच.डी. केली असून सध्या ते अमेरिकेतील मॅसॅच्युसेटस् विद्यापीठामध्ये फोर्ड फाऊंडेशन चेअरचे सन्माननीय प्राध्यापक म्हणून कार्यरत असून गरिबीचे निर्मूलन या विषयावर त्यांनी प्रचंड काम करून विविध प्रकारची मॉडेल्स तयार केली आहेत.




डॉ. अनिल काकोडकर

गरिबी निर्मूलनाच्या त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक नुकतेच जाहीर झाले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर अध्यक्ष असलेल्या राष्ट्रीय पुरस्कार समितीने २०२० सालचा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार अभिजीत बॅनर्जी यांना जाहीर केला आहे. या पुरस्काराची घोषणा डॉ. काकोडकर यांनी २५ नोव्हेंबर २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्त कऱ्हाड येथे झालेल्या समारंभात केली.

यावेळी बोलताना श्री. काकोडकर म्हणाले की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा मा. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराच्या निवड समितीचा अध्यक्ष म्हणून मी आज आपल्या पुढे उभा आहे. या समितीत माझ्या व्यतिरिक्त डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. सुहास पेडणेकर, प्रा. रुपा शहा, डॉ. नरेंद्र जाधव, श्रीमती शिरूमल्ली श्रीनिवासन, आर्किटेक्ट आय. डी. कादरी, अशी अनेक मान्यवर मंडळी या समितीत सदस्य आहेत. समितीतर्फे दरवर्षी विविध क्षेत्रातील आणि विविध राज्यातील मंडळींशी संपर्क साधून त्यांना नावे सुचविण्यासाठी आपण सांगतो. मागील पुरस्कार विजेत्यांनाही आपण अशी विनंती करतो. आणि त्यांच्याकडून आलेल्या प्रस्तावांचा आणि त्याच बरोबर निवड समिती स्वतःसुद्धा एक शोध समिती म्हणून काम करून कोणाकोणाची निवड करावी, याची एक यादी तयार करते. त्यावर सांगोपांग चर्चा करते आणि त्या चर्चेअंती एक नावाची शिफारस आपण प्रतिष्ठानला करतो. आणि त्याची घोषणा आजच्या दिवशी केली जाते.

आतापर्यंत हे पुरस्कार रिझर्व बँकेचे माझी गव्हर्नर रघुराम राजन, आधार कार्डचे जनक नंदन निलेकणी, कोकण रेल्वे आणि मेट्रो रेल्वेचे व ज्यांना रेल्वे मॅन म्हणून ख्याती आहे असे श्रीधरन, अर्जनसिंग, रतन टाटा, अशा अनेक नामवंत व्यक्तींना आपण राष्ट्रीय पुरस्कार दिलेले आहेत.

# चव्हाटा


घंटाकर्ण, नवी दिल्ली

## महा-घडामोडी व महा-गमती-जमतीही

महाराष्ट्रातल्या सरकारस्थापनेच्या घडामोडींनी जी काही वर-खाली, उलट-सुलट वळणे घेतली ती एखाद्या रोमांचकारक सिनेमा किंवा कथा-कादंबरीप्रमाणेच ठरली.

लोकांची भरपूर करमणूक झाली.

रहस्य, रोमांच, उत्कंठा व श्वास रोखून धरायला लावणारे प्रसंगही लोकांनी अनुभवले.






पण अशा रोमांचकारी सिनेमांमध्ये अधूनमधून हास्याची कारंजी फुलविणारे प्रसंगही असतात.

असाच कानोकानी समजलेला एक किस्सा.

महाराष्ट्रातील भाजप-शिवसेनेमधील वाद मिटता मिटत नव्हता.

भाजपच्या दोघाही सर्वोच्च नेत्यांनी तोंडाला कुलुप घातलेले होते.

अखेर कधी नव्हे ते ही कोंडी फोडण्यासाठी नावडते मंत्री नितिन गडकरी आणि राजनाथसिंग यांना काहीतरी प्रयत्न करुन पहा म्हणून सांगण्याची पाळी सर्वोच्च नेत्यांवर आली. नाईलाजाने त्यांना यात ओढण्यात आले.

नितिन गडकरींना निरोप गेल्यावर ते राजनाथसिंग यांच्याकडे सकाळीच दाखल झाले.

आगत-स्वागत झाल्यावर नितिन गडकरींनी विषयाला तोंड फोडण्याचा प्रयत्न केला....... 'राजनाथजी वो महाराष्ट्र के बारे में........!'

पण तेव्हाच राजनाथजींना मध्येच कसली तरी आठवण झाली. त्यांनी एकदम आतल्या बाजुला तोंड करुन, 'अरे वो आझमगढ का भुजिया ले आओ!' अशी ऑर्डर दिली. गडकरींकडे वळून ते म्हणाले, 'अरे गडकरी जी क्या गजब का भुजिया है, बढिया! अरे ले आओ ले आओ हां खाइये!'

गडकरी चूप! काही वेळ भुजिया खाण्यात! तेवढ्यात चहा पण येतो!

आता संधी मिळेल असे पाहून गडकरी पुन्हा बोलायला सुरुवात करतात, 'राजनाथ जी वो महाराष्ट्र के बारे में......!'

राजनाथ जी, अचानक ... 'अरे, नितिन जी मै पॅरिस गया था. वो निंबू रफाल पर रखा क्या बवाल मचा दिया मीडिया ने....' वगैरे वगैरे.

काही काळ राजनाथसिंग रफाल विमानाचे कौतुक करण्यात घालवतात.

गडकरी आणखी एक प्रयत्न करतात...... 'राजनाथ जी महाराष्ट्र के बारे में जरा......!'

पुन्हा राजनाथसिंग गडकरींना रशियाला घेऊन जातात. त्यांच्या रशिया दौऱ्याच्या गोष्टी सांगू लागतात.

गडकरींना इशारा समजलेला असतो. ते निरोपादाखल नमस्कार करतात, ठीक है चलता हूँ!

राजनाथसिंग -- अरे हां, आप वो महाराष्ट्र के बारे में बोल रहे थे ना? अरे हो जाएगा ठीक, चिंता मत करिये!

गडकरी निरोप घेऊन निघतात.

## एक दुई तीन... बीजेपी के बिदाई दिन...

महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसच्या महाआघाडीचे सरकार स्थापन झाले.

शिवतीर्थावर झालेल्या उध्दव ठाकरे यांच्या शपथविधी सोहळ्यास त्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनाही बोलाविले होते. परंतु ममतादीदी येऊ शकल्या नाहीत.

कारण त्यादिवशी पश्चिम बंगालमध्ये देखील एक महत्वाची घटना घडलेली होती.

शिवतीर्थावर जमलेल्यांना आनंदित करणारीच ती घटना






ममतादीदी म्हणाल्या की भाजपला त्यांचा अहंकार नडला.

परंतु यामागची खरी गोष्ट अशी की भाजपच्या केंद्रीय नेतृत्वातर्फे सातत्याने 'एनआरसी' म्हणजे 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स' सर्व देशात लागू करण्याचा जो धोशा लावला जात आहे त्याचा हा परिणाम आहे. हे प्रकरण आपल्या विरोधात चालले आहे याची भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला अजुनही कल्पना येत नसल्याचे हे उदाहरण आहे.

आसाम, पश्चिम बंगाल आणि संपूर्ण ईशान्य भारतात या विषयावर तीव्र प्रतिक्रिया आहेत.

परंतु एकदा चुका करीत सुटलेल्याला भान रहात नाही.

किमान या तीन निकालांनंतर तरी ते भान भाजपनेतृत्वाला आले तर ठीक!

होती.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या तीन जागांसाठी पोटनिवडणुका झाल्या होत्या.


भाजपने त्या जिंकण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावलेली होती कारण त्यांना पुढच्या विधानसभा निवडणुकीत दीदीचा पाडाव करायचा आहे.

पण झाले भलतेच!


तिन्ही जागा ममतादीदींच्या तृणमूल काँग्रेसने जिंकल्या.

आश्चर्याची गोष्ट ही होती की तीनपैकी खरगपूर सदर आणि कालियागंज या दोन जागा तृणमूल काँग्रेसने पूर्वी कधीही जिंकलेले नव्हते तेदेखील या पक्षाने जिंकून कमाल केली. तिसरी जागा करीमपूर त्यांनी पुन्हा जिंकली.

पण हे घडले कसे?



NRC exposing Mamta & co?




## येद्युरप्पांची परीक्षा?

पोटनिवडणुकांचाच विषय निघाला म्हणून जाताजाताची ही कानावर आलेली गोष्ट!

कर्नाटकात काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दलाशी फितुरी व बंड करुन भाजपमध्ये प्रवेश केलेल्या आमदारांचे सदस्यत्व गेले. त्या 13 जागांवर पोटनिवडणुका होत आहेत.

येद्युरप्पा यांचे सरकार यामुळे स्थिर होणार असले तरी या सर्व जागा जिंकल्या तर काय या शक्यतेने ते धास्तावलेले आहेत. या पोटनिवडणुकात भाजपला या सर्व जागा जिंकता आल्यास त्यांचे सरकार तेथे स्थिर होणार आहे. परंतु सरकार स्थिर झाल्यास भाजप हायकमांड आपल्याला डच्चू देईल अशी येद्युरप्पांना भीती वाटत आहे. ती भीती साधारही आहे कारण भाजपने येद्युरप्पांच्या बरोबरीने नलिनकुमार निरंजनकुमार शेट्टी कतील नावाच्या दुसऱ्या

एका लिंगायत नेत्यास ताकद देण्यास सुरुवात केली असून प्रदेश भाजपचे अध्यक्ष केले आहे.

येद्युरप्पा यांनी 75 पार केले आहे व त्यामुळे पक्षाच्या नियमानुसार आता ते निवृत्तीच्या कक्षेत आले आहेत. पण आजही लिंगायत लीडर म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते व अस्थिर सरकार सावरण्याची व चालवण्याची कसरत तेच करु शकतात म्हणून त्यांची खुर्ची अद्याप शाबूत आहे.



पण या पोटनिवडणुकांमुळे सरकार मजबूत झाले तर मात्र त्यांची उचलबांगडी होऊ शकते.

पण येद्युरप्पा हे बंडखोर असल्याने हा जुगार भाजप हायकमांड खेळणार काय हाही प्रश्न आहे. त्याचप्रमाणे बाहेरच्या आमदारांना महत्व दिल्याने खुद्द कर्नाटक भाजपमध्ये प्रचंड असंतोष आहे.

थोडक्यात कर्नाटकातही भाजपमध्ये सर्व काही आलबेल नसल्याची स्थिती आहे. तेथील असंतोषाचा भडका कधीही होऊ शकतो.

# नवे पायंडे? नव्या प्रथा? सगळे नवेच नवे?





अण्णा द्रमुकचे सदस्य संसदेत बोलायला उठले की सर्वप्रथम त्यांच्या नेत्या 'अम्मा, पुरुच्चि थलैवी' म्हणजेच जयललिता यांना आणि त्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांना धन्यवाद देऊन बोलण्यास सुरुवात करीत असत.

बऱ्याचदा त्यावर हंशाही पिकत असे. हा हांजीहांजीचा प्रकार असल्याची भावना अन्य सदस्यांमध्ये असे. परंतु कधीकधी चेष्टा किंवा मजेची बाब सवयीची होते व तिचे रुपांतर प्रथेतही होऊ लागते. आजही काही सदस्य पंतप्रधानांचे नाव घेऊन बोलण्यास प्रारंभ करताना आढळतात. यात आणखी एक भर पडली आहे. सदस्य लोकसभेच्या अध्यक्षांचे आभार मानतानाच, त्यांच्यामुळे बोलण्याची मिळालेली संधी तसेच अध्यक्षांतर्फे सभागृहाचे प्रभावी संचालन याच्या प्रशंसेने ते बोलायला सुरुवात करु लागले आहेत.

हा एक नवाच प्रकार अनुभवाला येत आहे.

अध्यक्षांनी आणखी एक अभिनव प्रयोग यावर्षी केला.

15 ऑगस्टला लाल किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते झेंडावंदन केले जाते.

लोकसभा अध्यक्ष ओम बिडला यांनी संसद परिसरात समांतर झेंडावंदनाचा कार्यक्रम यावर्षीपासून सुरु केला.

आता असे ऐकण्यात आले की अध्यक्ष महोदय जेव्हा परदेशात जातात तेव्हा ते पंतप्रधानांच्या धर्तीवर तेथील भारतीयांना भेटण्याचे कार्यक्रम आयोजित करीत असतात.

मध्यंतरी एका परदेश दौऱ्यात संबंधित देशातील प्रमुखांबरोबर त्यांच्या झालेल्या भेटीला त्यांनी 'इनफॉर्मल समिट'ची उपमा दिली.

तुम्हाला आठवेलच की मोदी व चीनचे



अध्यक्ष शि जिन पिंग यांच्या अशा अनौपचारिक शिखर बैठका चांगल्याच प्रकाशझोतात आल्या आहेत.



अलीकडेच पर्यावरण व प्रदूषणाशी संबंधित चर्चेत हस्तक्षेप करताना अध्यक्षांनी पंतप्रधानांप्रमाणेच 'सिंगल यूज प्लॅस्टिक' हद्दपार करण्यासाठी संसदसदस्यांनी शपथ घेण्याचा प्रस्ताव केला.

लोकसभा देशातल्या 139 कोटि जनतेचे प्रतिनिधित्व करते आणि त्या जनतेच्या प्रतिनिधींनी अशी शपथ घेण्याचा एक वेगळाच परिणाम दिसून येईल असा विश्वास त्यांनी प्रकट केला.

या प्रकारची शपथ घेण्यासाठी लवकरच आपण दिवस निश्चित करु असेही त्यांनी सदस्यांना सांगितले.

अध्यक्षांचाही हिंदीवर विलक्षण कटाक्ष आहे. त्यामुळे लोकसभेचे कामकाज अधिकाधिक हिंदीत करण्याबाबत विशेष पावले उचलली जातात.

एक कविता पूर्वी ऐकली होती...... नवे नवे चि तत्वच वेगळे!

## निव्वळ जाहिरातबाजी?

अलीकडेच एक बातमी वाचनात आली असेल.

'पंतप्रधानांनी उच्च अधिकाऱ्यांना सुनावले', 'पंतप्रधानांकडून उच्च अधिकाऱ्यांची कान उघाडणी' वगैरे वगैरे.

पंतप्रधानांना ते ज्या कार्यक्रमांच्या गगनभेदी घोषणा करतात त्याच्या प्रगतीची मधूनमधून आठवण येते.

मग ते सचिव पातळीवरील अधिकाऱ्यांशी संवाद साधतात आणि संबंधित कार्यक्रम, योजना यांच्या प्रगतीचा आढावा घेतात.

येथपर्यंत ठीक आहे.

परंतु अलीकडेच झालेल्या बैठकीत पंतप्रधानांना नाराज होण्याचे कारण काय घडले?

पंतप्रधानांनी त्यांच्यातर्फे जाहीर योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी अपेक्षित गतीने होत नसल्याची तक्रार या अधिकाऱ्यांकडे केली. त्यांना आपली नाराजी सुनावताना त्यांनी त्यांच्या 'स्वच्छ भारत योजने'चे उदाहरण दिले.

या योजनेच्या सफलतेसाठी सरकारने पैसा दिला परंतु



# DIRTY PICTURE....







प्रत्यक्षात त्याची फलनिष्पत्ती अपेक्षेप्रमाणे आढळत नाही. या योजनेची वाट लावली एवढेच बहुतेक पंतप्रधानांनी या अधिकाऱ्यांना सुनावणे बाकी उरले होते असे कानावर आले. पंतप्रधानांनी अशा वरिष्ठ व उच्च पातळीवरील अधिकाऱ्यांवर आपला राग काढल्यानंतर त्याची प्रतिक्रिया होणे अपेक्षितच होते.

या अधिकाऱ्यांनी बैठकीतून बाहेर आल्यानंतर त्यांच्या नाराजीला वाट मोकळी करुन दिली. त्यांनी सांगितले की पंतप्रधानांनी त्यांच्या कार्यक्रम व योजनांच्या अंमलबजावमीसाठी मोठा पैसा खर्च केला जात असतो

असे मारे सांगितले खरे पण त्यांना हे माहिती नाही की त्या निधीतील बहुतांश वाटा हा केवळ जाहिरातबाजी व प्रसिध्दीवर खर्च केला जात असतो आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी तुटपुंजा निधीच हाती उरतो.

परंतु संतप्त पंतप्रधानांना हे ऐकविण्याचे धाडस, साहस, हिंमत एकाही नोकरशहाकडे नसल्याने त्यांनी मुकाट्याने त्यांची बोलणी खाल्ली आणि बाहेर येऊन आपल्या संवेदनेला वाट करुन दिली.

तात्पर्य काय?

पंतप्रधानसाहेब त्यांच्या अभिनव भारतासाठीच्या ज्या नवनव्या योजना व कार्यक्रमांच्या गगनभेदी घोषणा करीत असतात त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी काहीच होत नाही.

नुसता फेसच फेस! हातात काहीच नाही!

असे म्हणतात की जेव्हा नेत्याकडून नोकरशाही नाराज व्हायला लागते तेव्हा त्या सरकारचा पडता काळ सुरु झालेला असतो.

नोकरशहा सध्या या प्रकाराने भरपूर नाराज झाल्याचे कानावर येते. जेव्हा दहशतीने तोंडे बंद केली जातात तेव्हा ही तोंडे बाहेर येऊन बोलू लागतात. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अवघड होऊ लागते.

सध्या तो प्रकार सुरु होऊ लागला आहे!

# बदलती हवा??

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ हे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात रहात असते.

डाव्या, प्रागतिक विचारांकडे झुकलेल्या विद्यार्थी संघटनांचे वर्चस्व या विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर राहिलेले आहे.

साहजिकच प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात येथील विद्यार्थी नेहमी संघर्षशील असतात. कन्हैयाकुमारचे उदाहरण सर्वांना माहिती झाले आहे.

2014 मध्ये देशात सत्तेत आलेल्या राजकीय शक्तींच्या डोळ्यात हे विद्यापीठ आणि तेथील विद्यार्थी खुपणार हे अपेक्षितच होते. त्यामुळे या विद्यापीठावर वरवंटा फिरविण्यास सुरुवात झाली होती.

तरीदेखील विद्यार्थ्यांनी आपल्या वैचारिक भूमिका सोडणे दूरच परंतु ताज्या निवडणुकातही डाव्या संघटनांनाच त्यांनी निवडले.

मग काय चवताळलेल्या केंद्रीय सत्तेने या विद्यार्थ्यांविरुध्द फी-वाढीचे अस्त्र उपसले. हे विद्यापीठ केंद्रीय निधीवर चालते व त्यामुळे केंद्र सरकारच्या अधिकारकक्षेत येते.

विद्यार्थ्यांनी फी-वाढीविरुध्द आंदोलन सुरु केले.

केंद्रीय राजवटीने ते मोडून काढण्याचा प्रयत्न केला पण तो असफल ठरला.

मीडिया किंवा विशेषतः इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर केंद्रीय राजवटीचा पगडा असल्याने या विद्यार्थ्यांना नेहमीच बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्यामुळे सत्तापक्षाच्या मीडिया मॅनेजरांनी या त्यांच्या खास पुरस्कृत व उपकृत वाहिन्यांना या विद्यार्थ्यांच्या विरोधात सोडले.

विद्यार्थी आंदोलनामुळे रस्ते बंद झाल्याने नागरिक संतप्त होतील व ते विद्यार्थ्यांना शिव्या घालतील या अपेक्षेने या बटीक वाहिन्यांनी लोकांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात केल्यावर त्यांनी सरकारच्या नावाने बोटे मोडण्यास सुरुवात केली. फी-वाढ केली का? मग विद्यार्थ्यांनी करायचे काय? अशा प्रतिक्रिया येऊ लागल्या.

लहान मुलांच्या पालकांनी तर या आंदोलनकारी विद्यार्थ्यांना धन्यवाद दिले आणि ते आमच्या मुलांच्या भविष्यासाठी लढत असल्याचे म्हटले.

आता आली का पंचाईत? सरकारच्या चमचेगिरीसाठी दाखवायचे काय?

नाईलाजाने मग थातूरमातूर बातम्या दाखवण्यास सुरुवात झाली.

संघ-भाजपची विद्यार्थी संघटना अभाविपचा तर चांगलाच पचका झाला. त्यांना नाईलाजास्तव फी वाढ मागे घेण्याच्या मागणीसाठी मोर्चा काढावा लागला.

कहर म्हणजे या मोर्च्याला संरक्षण पुरविणाऱ्या एका पोलिस अधिकाऱ्याने या अभाविपच्या नेत्याला सुनावले, तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेत आहे, ते असे निर्णय कशासाठी करतात की ज्यामुळे तुम्हाला संरक्षण देण्याची पाळी यावी?

आता शंका येऊ लागली आहे की जनमत फिरायला लागले आहे.

या सरकारला लवकर जाग आली तर ठीक अन्यथा?



# Nanded City, Pune
*The Maximum City*

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

## प्रत्येक घराला एक मन असतं.
## प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

### आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

### CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

### जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्के. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY
*The pride of Pune*

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com




# अनागोंदीच्या दिशेने वाटचाल?

गहिनीनाथ

माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी राजीव गांधी प्रतिष्ठानतर्फे आयोजित आर्थिक परिषदेत बोलताना देशातील आर्थिक, राजकीय व सामाजिक वातावरण चांगले नसल्याची टिप्पणी केली. सर्वसाधारणपणे अनिश्चितता, दहशतीचे वातावरण आढळून येत असल्याचे ते म्हणाले. देशाच्या अर्थव्यवस्थेत मंदी आलेली असली तरी उद्योगपति त्याबाबत बोलायला तयार नाहीत आणि ते बोलायला घाबरतात असे त्यांनी आपल्याकडे बोलून दाखवले असे काहीसे खळबळजनक विधानही केले. त्यांच्यासारख्या सचोटीच्या आणि प्रामाणिक अशा व्यक्तीकडून ही टिप्पणी केली गेल्याने त्याचे गांभीर्य आणखी वाढते. मनमोहनसिंग बोलले त्याच्या दुसऱ्याच दिवशी मुंबईच्या एका आर्थिक वृत्तपत्राच्या विशेष कार्यक्रमात बोलताना उद्योगपति राहूल बजाज यांनी मनमोहनसिंग यांच्या भावनांचाच पण काहीशा वेगळ्या शब्दात पुनरुच्चार केला. त्यांच्या भाषणाचे वैशिष्ट्य हे ठरले की त्यावेळी व्यासपीठावर शक्तिशाली गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि वाणिज्य व रेल्वेमंत्री पियुष गोयल हेही उपस्थित होते. सरकारला काही सूचना करण्यास उद्योगपति कचरतात कारण त्यांच्या सूचनांचा स्वीकार करण्याऐवजी त्यांच्यामागे तपास संस्थांचा ससेमिरा तर लावला जाणार नाही अशा भीतीने ते पछाडलेले आहेत. हे तुम्हाला कुणी स्पष्ट सांगणार नाही परंतु आपण ते सांगू इच्छितो असे या उद्योगजगतातील वयोवृध्द भीष्माचार्याने मंत्र्यांना सुनावले. त्यांच्या नंतर बोलताना अमित शहा यांनी त्यांच्या शंकांचे व चिंतांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. राहूल बजाज यांनी भाजपच्या खासदार साध्वी प्रज्ञा




यांच्याकडून महात्मा गांधींचा मारेकरी नथुराम गोडसेला देशभक्त म्हणण्याच्या प्रकाराचाही उल्लेख करुन यातून आपण देशात कोणते वातावरण निर्माण करु इच्छितो असा सवालही केला.

या दोन दिग्गजांच्या विधानांच्या पार्श्वभूमीवरच देशाची सद्यःस्थिती काय आहे याची दखल घेतल्यास काय आढळते ? राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत(जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर) विकासदर साडेचार टक्क्यांपर्यंत उतरल्याचे जाहीर केले. त्या आधीच्या तिमाहीत म्हणजेच या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत(एप्रिल-मे-जून) तो पाच टक्के होता. थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या सततच्या घसरणीचा हा आलेख आहे. सहा वर्षातील ही नीचांकी आहे. अर्थव्यवस्थेत तेजी येण्याची अद्याप फारशी चिन्हे आढळून येत नाहीत. मनमोहनसिंग यांच्याच व्याख्यानाचा संदर्भ द्यायचा झाल्यास अर्थव्यवस्थेची अवस्था हा त्या समाजाचा आरसा असतो. अर्थाकरण व्यवस्थित असेल तर समाज सुस्थितीत असल्याचे ते चिन्ह मानले जाते. परंतु सध्याची स्थिती त्यास विपरीत आहे. सरकारी यंत्रणांनी उद्योग-व्यावसायिकांमध्ये दहशतीची भावना निर्माण केलेली आहे. बँका नवीन कर्जे देईनाशा झाल्या आहेत. कारण कर्जे दिली व ती वसूल न झाल्यास त्याची सजा मिळण्याची भीती बँकेला आहे. खुद्द उद्योजकही बँकांकडून कर्ज घेण्यास धजावत नसल्याचे चित्र आहे. जर त्यांनी कर्ज घेतलं आणि धंद्यात खोट आली तर त्यांच्याविरुध्द कारवाईची भीती त्यांना भेडसावते. उद्योगजगतावर सतत नजर आणि पाळत ठेवली जात असल्याची स्थिती आहे. या भीतीच्या व दहशतीचा वातावरणाचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर होत आहे.

मनमोहनसिंग यांनी अगदी अचूकपणे देशाच्या आर्थिक दुखण्याचे निदान केले. परंतु प्रत्यक्षातील काही उदाहरणेही लक्षात घ्यावी लागेल. एका उच्च मध्यमवर्गीय हाऊसिंग सोसायटीचा हा किस्सा पुरेसा बोलका आहे. सोसायटीतील घरांच्या नियमित रंगरंगोटीचा निर्णय करण्यात आला. प्रत्येक घराकडून बारा हजार रुपयांचा अंदाज देण्यात आला. परंतु त्या हाऊसिंग सोसायटीला रंगरंगोटीचा निर्णय स्थगित करावा लागला कारण लोकांनी बारा हजार रुपये देता येणे शक्य नाही काही काळ रंगरंगोटी स्थगित करा, थोडी परिस्थिती स्थिरस्थावर होऊ द्या असे व्यवस्थापनाला सांगितले. हा किस्सा किती बोलका आहे हे लक्षात येईल. ही सोसयाटी उच्च मध्यमवर्गीय व घरात मोटारी असलेल्यांची आहे परंतु घराच्या रंगरंगोटीसाठी ते बारा हजार रुपये देण्यास तयार



नाहीत कारण त्यांना रंगावर पैसे खर्च करण्या ऐवजी वाचवून ठेवण्याला प्राधान्य द्यायचे आहे. आता हे काम रद्द झाल्याने हे काम करणाऱ्यांचा रोजगार बुडाला ही बाबही तेवढीच लक्षात घ्यावी लागणार आहे. बाजारातील मागणीचा अभाव आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेची चाके कशी थंडावत चालली आहेत याचे हे एक उदाहरण!

सरकारतर्फे अर्थव्यवस्थेत सुरु असलेले प्रयोग सामान्यांच्या मनात शंका निर्माण करीत आहेत. सर्वात मोठा लहरी प्रयोग 8 नोव्हेंबर 2016 रोजी करण्यात आला. त्या प्रयोगाचे नाव होते 'डिमॉनिटायझेशन' उर्फ 'नोटाबंदी'. या प्रयोगाचे सूत्रधार अर्थातच पंतप्रधान नरेंद्र मोदी होते. या प्रयोगात सुमारे शंभराहून अधिक निरपराध सामान्य नागरिकांचा बळी गेला. त्यांचा अपराध हा होता की त्यांना नोटा बदलण्यासाठी रांगांमध्ये उभे रहावे लागले होते. या बळींना जबाबदार कोण या प्रश्नाचे उत्तर या प्रयोगाच्या सूत्रधारांनी दिलेले नाही. सोयीस्करपणे त्यांनी जबाबदारी टाळलेली आहे. त्या पाठोपाठ लहरी पंतप्रधानांनी




जीएसटीचा आघात केला. योग्य पूर्वतयारीअभावी घाईघाईने करण्यात आलेल्या या प्रयोगात देशातील ऐंशी टक्के असंघटित लहान उद्योग-व्यावसायिक देशोधडीला लागले. आज जी मंदगति, लोकांमध्ये पैसे खर्च करण्याबद्दल आलेले धास्तावलेपण, वाढती बेकारी या सर्व समस्यांच्या मुळाशी हे दोन निर्णय आहेत. नोटाबंदीच्या वेळी संसदेत बोलताना मनमोहनसिंग यांनी देशाचा विकासदर किमान दोन टक्क्यांनी कमी होईल असे भाकित केले होते. आज ते खरे ठरले. परंतु तेव्हा या अनुभवी अर्थतज्ञाची भर संसदेत टर उडविण्याचे नेतृत्व खुद्द पंतप्रधानांनी केले होते. आता त्या परिस्थितीत देश पोहोचल्यानंतर पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी खुलासे करीत फिरत आहेत परंतु त्यांच्यावर कुणाचा विश्वास बसले अशी स्थिती नाही.

असे अनेक चिंता उत्पन्न करणारे प्रश्न समोर येत आहेत. अर्थमंत्र्यांनी रिझर्व बँकेचाच हवाला देऊन नुकतेच संसदेत सांगितले की गेल्या सहा महिन्यात म्हणजेच 'मोदी-2'मध्ये सरकारी बँकांमध्ये 95 हजार सातशे कोटि रुपयांच्या घोटाळ्यांची नोंद झालेली आहे. हे कसे घडले याचे उत्तर त्यांनी दिलेले नाही. परंतु 'न खाऊंगा न खाने दूंगा' असा जबरदस्त सिनेमास्टाईल डायलॉग फेकणाऱ्या पंतप्रधानांच्या राज्यात असे घडावे हे नवलच आहे. प्रत्येक वाईट गोष्टीचे खापर आधीच्या 70 वर्षातील सरकारांवर फोडणाऱ्या पंतप्रधानांना एवढे घोटाळे लक्षात येऊ नयेत हे आश्चर्यकारक आहे.

वरील उदाहरण सोडा आता प्रत्यक्षात अर्थमंत्री काय म्हणतात तेही पाहू! अर्थमंत्र्यांनी मध्यंतरी काही निवडक पत्रकारांना वार्तालापासाठी बोलावले होते. अलीकडेच सोशल मीडियावर एक मेसेज सर्वत्र फिरत होता की बँकांमध्ये ज्यांनी पैसे गुंतवलेले असतील त्यापैकी केवळ एक लाख रुपयांचीच हमी किंवा विमा कवच लाभलेली असेल. म्हणजे तुम्ही ज्या बँकेत पैसे किंवा ठेवी ठेवलेल्या असतील आणि त्या बँक समजा बुडीत होऊ लागली तर तुम्हाला तुमचे सर्व पैसे मिळणार नाहीत परंतु त्यातील फक्त एक लाख रुपयांची रक्कम संरक्षित असेल म्हणजे ती तुम्हाला मिळेल. पण समजा पाच लाख रुपयांची ठेव असेल तर उर्वरित चार लाख रुपयांची हमी सरकार किंवा बँक घेणार नाही. हा नियम नवा नाही. हा आधीपासूनच लागू आहे. परंतु सरकारतर्फे पध्दतशीरपणे सध्या त्याचा प्रचार केला जात आहे. यामुळे लोकांनी बँकातून पैसे काढावेत व खर्च करावेत असा हेतु त्यामागे असू शकतो. परंतु त्याहीपलीकडे सरकारचा आणखी एक हेतु दिसतो आणि अर्थमंत्र्यांनी त्याचे संकेत या वार्तालापात दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार दोन-तीन वर्षांपूर्वी सरकारने एक विधेयक तयार केले होते. त्या विधेयकानुसार जर एखादी बँक बुडीत निघाली तर त्या बँकेतील ठराविक मर्यादित रक्कमच खातेदारांना परत मिळेल आणि त्यांच्या उर्वरित रकमेचे रुपांतर त्याच बँकेच्या इक्विटि किंवा बाँडमध्ये करण्यात येईल आणि जेव्हा ती बँक सुस्थितीत येईल तेव्हा ते पैसे त्यांना परत मिळतील. परंतु या विधेयकाला प्रचंड विरोध झाला होता व सरकारला ते मागे घ्यावे लागले होते. आता सरकारने पुन्हा त्या विधेयकासाठी तयारी सुरु केली आहे. म्हणजेच हे सरकार आता जनसामान्यांच्या घामाच्या पैशावरही डल्ला मारायला निघाले आहे. रिझर्व बँक, एलआयसी, विविध सरकारी तेलकंपन्या, सेबी आणि तत्सम वित्तीय संस्थांकडून या सरकारने सक्तीने पैसे वसुली केली आहे. आता हे सरकार विविध सरकारी उद्योग (एअर् इंडिया, भारत पेट्रोलियम इ.) विकायला निघाले



आहे. या सरकारची पैशाची भूक वाढत चालली आहे. हे पैसे कुठे चालले आहेत हे कळेनासे झाले आहे. कारण कल्याणकारी योजनांची बाब लक्षात घेतली तर मनरेगासारख्या योजना, रस्तेबांधणी यासारख्या प्रकल्पांमधील सरकारी तरतूद व गुंतवणूक वाढण्याऐवजी कमी होताना दिसते. सरकारी उद्योगांच्या विक्रीबरोबरच रस्तेबांधणी आणि अगदी रेल्वेसारख्या सेवा मानल्या जाणाऱ्या विभागांचया खासगीकरणाचा सपाटा लावण्यात येत आहे. या सरकारने सरकारी सेवा ही संज्ञाच बहुधा राज्यकारभारातून काढून टाकण्याचे ठरविलेले दिसते. पंतप्रधानांनी सरकारचे काम उद्योग चालविण्याचे नाही असे सांगून खासगाकरणाचा सपाटा लावला आहे. भारतात गरीबी शिल्लक आहे आणि या देशातील गरीब जनता अजुनही सरकारवर अवलंबुन असते. ते या खासगीकरणात आणि त्यातून येणाऱ्या महागाईत केवळ पिचणार नाहीत तर त्यांचे अस्तित्वच संपणार आहे. अंध-खासगीकरण देशाला आर्थिक रसातळाला नेल्याखेरीज राहणार नाही.

अर्थव्यवस्थेची मंदगति आणि आर्थिक समस्या याबद्दल भरपूर लिखाण होत आहे. परंतु या खऱ्या धगधगत्या ज्वलंत मुद्यांकडे लक्ष जाऊ नये यासाठी या सरकारने नाना चलाख्या करण्यास सुरुवात केली आहे. जेणेकरुन लोकांचे लक्ष इतरत्र वळविता येईल असे मुद्दे पुढे आणण्याचे प्रकार या सरकारने सुरु केले आहेत. अयोध्या व राममंदिर उभारणी हा एक मुद्दा त्यांनी सुरु केलेला आहे. पाकिस्तान व दहशतवाद हा मुद्दाही त्यांच्या हातचा आहेच! याखेरीज नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स किंवा 'एनआरसी' हा मुद्दाही भाजपचे हायकमांड सातत्याने आळवत आहे. ही योजना लागू करुन नागरिक नसलेल्या व भारतात बेकायदेशीरपणे रहात असलेल्यांना देशाबाहेर काढण्याची ही योजना आहे. आसाममध्ये या मुद्यावर तोंडावर आपटून देखील भाजपनेतृत्वाला शहाणपण आलेले नाही. गृहमंत्री तर आख्ख्या देशालाच ही योजना लागू करण्याची भाषा बोलत आहेत. पश्चिम बंगालमध्ये या योजनेच्या मुद्यावरुन भाजपने पोटनिवडणुकात जो सपाटून मार खाल्ला आहे त्यानेही त्यांना शहाणपण आलेले नाही. खुद्द भाजपच्या प्रादेशिक नेत्यांनी या मुद्यामुळे पराभव झाल्याचे सांगूनही अद्याप या मुद्याचा आग्रह थांबताना दिसून येत नाहीत.

भाजपच्या घसरत्या प्रतिमेच्या संदर्भात आणखी दोन उदाहरणांचा उल्लेख आवश्यक ठरेल. 'द वायर' नावाच्या एका नावाजलेल्या न्यूजपोर्टलने भाजपला मिळालेल्या देणग्यांबाबत एक गौप्यस्फोट नुकताच केला आहे. विशेष म्हणजे केवळ गुळमुळीत इन्कार करण्याखेरीज पक्षाने त्याबाबत मौन बाळगलेले आहे. यासंदर्भातील प्रकाशित माहितीनुसार मुंबई बाँबस्फोटातील एक सूत्रधार इक्बाल मिर्ची याच्याशी संबंधित 'आरकेडब्ल्यू डेव्हलपर्स' या कंपनीकडून भाजपला दहा कोटि रुपयांची देणगी मिळाली आहे. दहशतवाद्यांना पैसा पुरविण्याचा आरोप या कंपनीवर असून त्याची चौकशी एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट - ईडी कडून सुरु आहे. या प्रकाराबद्दल भाजपने सोयीस्कर मौन पाळले आहे. आणखी एक दुसरे प्रकरण असेच संवेदनशील आहे. या प्रकरणातही सरकारने तोंडाला कुलुप लावले आहे. मोबाईल हॅक करु शकणारे एक सॉफ्टवेयर इस्रायलच्या 'एनएसओ' नावाच्या कंपनीने तयार केले आहे. याला 'स्पायवेयर' असेही म्हटले जाते. व्हॉट्सअॅप किंवा मोबाईलवर येणाऱ्या विविध एसएमएसच्या मार्गाने मोबाईल हॅक करण्याची क्षमता या स्पायवेयर मध्ये आहे. भारतातील अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारच्या 'हिटलिस्ट'वर असलेल्या अनेकजणांचे मोबाईल हॅक करण्यात आल्याची माहिती खुद्द फेसबुक व व्हॉट्सअॅपच्या मालकांनीच जाहीर केली. या कंपन्यांनी ही माहिती मोदी सरकारला मे महिन्यात दिली होती व त्यानंतर सप्टेंबर महिन्यात पुन्हा देऊनही भारत सरकारने त्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. त्यामुळे मोदी सरकार चांगलेच अडचणीत आले आहे. इस्रायलच्या या सॉफ्टवेयर कंपनीच्या म्हणण्यानुसार ते हे सॉफ्टवेयर फक्त सरकारी संस्थांनाच विकतात. म्हणजेच भारतातील कोणत्या सरकारी संस्थांनी ते विकत गेतले हा प्रश्न उपस्थित होतो व सरकारने त्याचा इन्कार केला आहे. कुठेतरी पाणी मुरते आहे कारण सरकार याबाबत टाळाटाळ करीत आहे.

या सर्व घडामोडींचा उल्लेख अशासाठी की सरकारची दिशा लक्षात यावी. मोदी सरकारची दिशा एकाधिकारशाहीपेक्षाही धाक व भीती घालून राज्यकारभार करण्याकडे कललेली आढळते. अर्थव्यवस्थेतील घसरणीकडे दुर्लक्ष करण्यासाठी लोकांना धार्मिक ध्रुवीकरणाचे मुद्दे व भावनिक मुद्दे दाखवून संभ्रमित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा तिन्ही आघाड्यांवर गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. ही अनागोंदीची स्थिती आहे. अराजक यातूनच निर्माण होते हेही येथे लक्षात ठेवावे लागेल!

Best

Compliments




ये त्या १२ डिसेंबर २०१९ ला आदरणीय साहेब ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. नुकत्याच राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत सर्व विरोधकांवर मात करत साहेबांचा झंजावाती प्रचार आणि त्यानंतर राज्याला स्थिर सरकार देण्यासाठी प्रत्यक्षात आणलेली महाविकास आघाडी हे केवळ साहेबांच्या अहोरात्र प्रयत्नांना मिळालेले यश आहे. वयाच्या ३८व्या वर्षी १९७८ साली साहेब राज्याचे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले आणि १९७८ ते आज २०१९ म्हणजे जवळ जवळ ४० वर्षे महाराष्ट्राचे राजकारण साहेबांशिवाय होऊच शकत नाही हे पुन्हा एकदा लोकांच्या समोर आले. साहेब म्हणतात त्याप्रमाणे या प्रदीर्घ वाटचालीत त्यांनी जास्तीत जास्त काळ विरोधी पक्षाची भुमिका बजावली आणि जेंव्हा जेंव्हा सत्तेमध्ये राहीले त्या-त्या वेळेला एकूणच व्यापक समाजहित, देशहित जपण्याचा त्यांचा निश्चय हा अधोरेखीत झाला. शेवटी समाजातल्या सर्व थरातील लोकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावण्याकरीता मग ते शेतकरी असतील, शेतमजुर असतील, कामगार असतील, नोकरदार असतील किंवा वेगवेगळे समाज घटक असतील त्या सगळ्यांशी समरस होऊन गेल्या ५ दशकांपासून साहेबांनी अविश्रांत कष्ट घेतले आहेत. सातत्याने नेतृत्वाची नवीतरुण पिढी समोर आणण्यात साहेब यशस्वी झाले आहेत. निवडणुका असल्या तर तेवढ्या काळात साहेब निश्चीतच बेरजेचे राजकारण करीत अवघा महाराष्ट्र पिंजून काढतात. पण एकदा निवडणूका संपल्या की, मग त्यांचा ध्यास असतो अडचणीत असलेल्या शेतकरी, शेतमजुर, कष्टकरी यांना मदत करण्यासाठी जिवापाड मेहनत करण्याचा म्हणूनच निकाल लागल्यानंतर साहेब शेतकऱ्यांच्या बांधावर जातात त्यांच्याशी संवाद साधून त्यांचे दुःख समजावून घेतात. आजपर्यंत केंद्रात व राज्यात काम करताना साहेबांनी देश घडविण्यासाठी घेतलेले निर्णय हा आपल्यासाठी अनमोल ठेवा आहे. या सगळ्यावर कळस चढवला, या वर्षीच्या राज्यातील विधानसभा निवडणूक प्रचार दौऱ्यामध्ये साताऱ्यात जोरदार पाऊस कोसळत असताना साहेब प्रकृतीची तमा न बाळगता ज्या जिद्दीने कणखरपणे लोकांसमोर आले हे पाहुन अवघा महाराष्ट्र भाऊक झाला. या राज्याचे भवितव्य घडविण्यात साहेबच सर्वात महत्वाची भूमिका बजावत आहेत याचा आज महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेला प्रचंड विश्वास आहे. इतक्या प्रचंड तपश्चर्येने पवार साहेबांसारखा माणूस नेता म्हणून आपल्याला मिळतो हे आपले भाग्यच आहे आणि साहेब स्वतः सभेत बोलताना सांगतात मला वृध्द म्हणून बोलू नका, '**अभी तो मैं, जवान हूँ।**' हा अखंड स्त्रोत भविष्यात आपणा सर्वांना मार्गदर्शन करेल असा मला विश्वास वाटतो. एक कार्यकर्ता म्हणून साहेबांपुढे नतमस्तक होतो.

## शेवटचे पान

